म. ग्रं. सं. ठाणे.
विषय भू. प्रवास
सं. क्र. ७७०

REFBK-0025909
REFBK-0025909

संदर्भ भूप्रवास
७१० ७१०
२५९०९
३०।५।८९

# संपूर्ण मध्यप्रदेश

वासंती घैसास

REFBK-0025909
REFBK-0025909

उन्मेष प्रकाशन, पुणे

उन्मेष प्रकाशन (१३)

संपूर्ण मध्यप्रदेश

© वासंती घैसास
६४/२० 'सुमन' कर्वे रोड,
एरंडवणे, पुणे ४११००४

प्रथमावृत्ती : मार्च ८९

प्रकाशक :
मेधा राजहंस
उन्मेष प्रकाशन
२६ पर्वती, पुणे ४११००९

मुद्रक :
सौ. कमल रामचंद्र घळसासी
संजीव मुद्रणालय
४६९, सदाशिव पेठ, पुणे ४११०३०

मुखपृष्ठ :
धनंजय सस्तकर

मूल्य ३० रुपये

## अनुक्रम


पान उघडण्याआधी...

१. माझीया माहेरा–इंदौर १

२. नर्मदातटीचे ओंकारेश्वर–महेश्वर ७

३. आनंदनगरी मांडू १३

४. अवन्तिकानगरी–उज्जैन २१

५. राजधानी भोपाळ–सांची, विदिशा, भोजपूर २९

६. वैभवशाली शिंदेशाहीचे ग्वाल्हेर, शिवपुरी ३८

७. मध्ययुगकालीन विश्वात–ओर्च्छा ५०

८. अजरामर झांशी ५४

९. जगभराचं कुतुहल–खजुराहो ५६

१०. मौल्यवान ‘पन्ना’ ६४

११. संगमरवरी चमत्कार–भेडा घाट ६९

१२. चुकलेलं ‘कान्हा’ ७४

१३. अल्हाददायक निसर्गरूप–पचमढी ७८

१४. सहलीचे पान मिटताना... ९१

## पान उघडण्याआधी...

ऐतिहासिक, सांस्कृतिक, भौगोलिकदृष्टया समृद्ध असूनही पर्यटनदृष्टया विशेष गाजावाजा न झालेले आपल्या शेजारील एक राज्य म्हणजे मध्यप्रदेश. भारतातील या सर्वांत मोठया राज्याचा आमचा प्रवास अवघड नसला तरी नियोजनबद्धही नव्हता. याचं महत्त्वाचं कारण म्हणजे मध्यप्रदेशच्या पर्यटनासंबंधीची उपलब्ध होऊ शकलेली अतिशय तुटपुंजी माहिती.

तरी सुद्धा हाती असलेल्या तीन आठवडयांचा अवधीत मुलांसकट मध्यप्रदेशचा जास्तीत जास्त भाग बघणं शक्य झालं ते यजमान डॉ. विजय यांच्या उमेदीमुळे. या प्रवासात आम्हाला भेडसावलेल्या अडचणींना इतरांना परत तोंड द्यावं लागू नये; त्याचबरोबर या विलोभनीय राज्याच्या पर्यटन चेहऱ्याचे दर्शन घडावे म्हणून पुस्तकाचा प्रपंच मांडला. त्याला सुयोग्य आकार देण्याच्या कामाबद्दल प्रकाशिका मेधा राजहंस हिला धन्यवाद.

या आधी मध्यप्रदेशची ही सहल पर्यटनप्रेमींपर्यंत पोहोचली होती, श्री. सदा डुंबरे यांच्या प्रोत्साहनाने लिहिलेल्या पुण्याच्या रविवार सकाळमधील लेखमालेमुळे. त्या लेखांचा उपयोग या पुस्तकात करण्याची अनुमती दिल्याबद्दल संपादक, सकाळ यांचे आभार.


सम्राट अशोक, राजा विक्रमादित्य, महाकवी कालीदास, संगीतसम्राट तानसेन, मोगल-ब्रिटिशांशी प्रखर झुंज दिलेले मराठा सरदार यांच्या अभिमानास्पद आठवणींशी नातं सांगणारा आणि खजुराहोची शिल्पे, नर्मदेचा संगमरवरी भेडा घाट, ओंकारेश्वर-उज्जैन-सांचीसारखी धार्मिक क्षेत्रे, कान्हा-बांधोगडसारखी अभयारण्ये इत्यादी नानाविध स्मृतिस्थळांनी समृद्ध अशा हिंदी-मराठी भाषिक मिश्र संस्कृतीच्या मध्यप्रदेशला भेट देण्याचं स्फुरण या पुस्तकाद्वारे यावं.

–वासंती घैसास

# मध्य प्रदेश



सुहानीया
भिंड
पधवली
मोरेनो
ग्वाल्हेर
नरेसर
नरवार
दातिया
शिवपुरी
सुरवया
झांसी
हरपालपूर
छत्रपूर
चित्रकुट
चाची
ओरचा
खजुराहो
पन्ना
धासन
रेवा
सिधि
रिहांद
मंडसोर
चांदेरी
बीना
सागर
उदयपूर
गयारसपूर
विदिशा
उदयगीरी
सांची
भोपाळ
उज्जैन
नर्मदा नदी
नरसिंहपूर
जबलपूर
भेडाघाट
अमरकंटक
शाहडोल
अंबिकापूर
इंदूर
धार
बाघ
मंडू
महेश्वर
ओंकारजी
पचमढी
मांडला
धर्मजय गड
सेवनी
बिलासपूर
खांडवा
अरसीगड
बऱ्हाणपूर
रायपूर
महानदी
तंडुला तलाव
मानपूर
बस्तर
जगदालपूर
उ
सूची
प्रेक्षणीय स्थळे
विमानतळ
प्रमुख रस्ते
रेल्वे
नदी



इंदौर–जुना राजवाडा एकेकाळचे वैभव ↑

↓ पचमढी–वृक्षांच्या गर्दीत लपलेले...



७७०
ग्रं.प्र. २५९०९
३०५१८९

# १. माझीया माहेरा–इंदौर

बहुरंगी, बहुढंगी भारतवर्षाची नानाविध रूपे जेथे एकवटलेली दिसतात अशा आपल्या देशातील काही मोजक्या राज्यांपैकी एक म्हणजे मध्यप्रदेश. भारतमातेच्या हृदयरूपी कोंदणात असलेले हे ४,४२,८४१ चौ. कि. मी. क्षेत्रफळाचे भारतातील सर्वात मोठे राज्य.

विंध्य, सातपुड्याच्या हिरव्या पर्वतराजींमधून आपल्या वळणदार नक्षीकामांचे मनोहारी देखावे निर्माण करत वाहणाऱ्या नर्मदा, तापी, चंबळ, बेटवा, क्षिप्रा, इंद्रावती यासारख्या नद्यांनी समृद्ध झालेल्या मध्य-प्रदेशाचा १/३ भाग जंगलांनी व्यापलेला आहे. येथील दाट जंगलांतून तऱ्हेतऱ्हेचे वन्यप्राणी वास्तव्य करून असल्याने तेथील अभयारण्यांचे निसर्गप्रेमींना फार आकर्षण वाटते.

मध्यप्रदेशला अतिशय समृद्ध असा सांस्कृतिक वारसा लाभलेला आहे. अतिव सुंदर कारागिरीची मंदिरे, शिल्पे, स्तूप, किल्ले, राजवाडे यासारख्या असंख्य ऐतिहासिक प्राचीन वास्तू या राज्यात आहेत. सम्राट अशोक, चंद्रगुप्त, विक्रमादित्य, राजा भोज, महाकवी कालीदास, संगीत सम्राट तानसेन, शिंदे, होळकर, पवारांसारखे अनेक शूर मराठा सरदार यांच्या अनंत स्मृति या राज्याने मोठ्या अभिमानाने जपलेल्या आहेत.

मध्य प्रदेशची मला वैयक्तिक ओढ होती ती माहेरच्या रक्ताच्या

नात्यामुळे. माझं माहेर खांडेकर. आमच्या घराण्यातील एक कर्तृत्ववान पूर्वपुरुष श्री. गोपाळ संभाजी यांनी पानिपतच्या युद्धात अतुलनीय पराक्रम गाजविल्यामुळे श्रीमंत माधवराव पेशवे यांनी त्यांना पानिपतच्या युद्धानंतर माळव्यातील पंथ पिपलोदा व आसपासची ८।। गावे मिळून एकंदर ९।। गावांचा सरंजाम इ. स. १७६५ मध्ये एका सनदेद्वारा बहाल केला. पराक्रमी वाडवडिलांच्या कर्मभूमीचे विशेषत: पंथ पिपलोदाचे दर्शन घेऊन त्यांना आदरांजली वाहवी ही इच्छा मनात ठेऊन मी मध्यप्रदेशला निघाले होते. बरोबर होते फक्त कुटुंबीय. पती डॉ. विजय, चौदा वर्षांची मुलगी मनाली आणि आठ वर्षांचा मूलगा निरंजन.

फक्त मध्यप्रदेशचा प्रवास करायचा झाल्यास इंदौर हे शुभारंभासाठी सुयोग्य ठिकाण. मुंबईहून इंदौरला जाणाऱ्या जलद रेल्वेगाडया असल्या तरी पुण्याहून जायचं म्हणजे बदलाबदलीत तेवढाच वेळ जातो. म्हणून सोयीस्कर वाटली झेलमच. दिवाळीच्या सुट्टीतील आक्टोबरचा दुसरा पंधरवडा होता तो. हा सुट्टीचा सिझन मध्यप्रदेशमध्ये प्रवास करायला फार छान म्हणावा असा. ऑक्टोबरची उष्णता संपून नोव्हेंबरची गुलाबी थंडी पडायला सुरुवात होणारा. डिसेंबरअखेर ते जानेवारीच्या मध्यापर्यंत मध्यप्रदेशमध्ये थंडीचा कडाका असतो आणि उन्हाळयात सूर्याजीरावांनी बाराही डोळे सतत वटारलेले असतात.

पहाटे साडेपाचचे सुमारास खांडवा आले. इंदौरला जाणारी रेल्वे होती सकाळी दहा वाजता. वेळेवर सुटली तरी मीटर गेज म्हणजे डकाव् डकाव् करत सहा-सात तास तरी खाणारच. म्हणजे इंदौरला पोचायला सायंकाळ. संपूर्ण दिवस गेलाच की. तातडीने सामान उचलून स्टेशनबाहेर उभी असलेली बस पकडली सकाळी साडेसहाची. लवकरची वेळ असल्याने गर्दीही नव्हती.

खांडवा–इंदौर रस्त्याने अंतर फक्त १३० कि. मी आणि लागतात तीन–साडेतीन तास. त्या दिवशी खांडवा दु:खद अंत:करणाने वाट बघत होतं त्याच्या मातीत विलीन होण्यासाठी येत असलेल्या अचेतन किशोरकुमारची. वाटेत किशोरकुमारचा मृतदेह खांडव्याकडे जाताना दिसला. त्या विनोदवीर गायक नटसम्राटाला मूकपणे श्रद्धांजली वाहून

आमचा मध्य प्रदेशाचा प्रवास सुरू होत होता.

बडवाह नावाचे बऱ्यापैकी मोठे गाव वाटेत लागताच मध्यप्रदेश-मधील खाण्यापिण्याच्या सुबत्तेची झलक दिसायला लागली. मोठाली केळी होती फक्त दोन रुपये डझन. याच रस्त्यावरील मोरटक्का किंवा रेल्वेमार्गावरील ओंकारेश्वर रोडपासून प्रसिद्ध तीर्थक्षेत्र ओंकारेश्वर फक्त १० कि. मी. वर आहे. विशेष सामान नसल्यास इंदौरला जाता जाताही करता येण्यासारखे हे तीर्थस्थान.

अहिल्यादेवी होळकरांनी वसविलेल्या इंदौरमध्ये आम्ही सकाळी दहा वाजता प्रवेश करत होतो. मराठमोळ्या संस्कृतीच्या चेहऱ्यामोहऱ्याचं इंदौर आपल्या गणगोतांपैकी एक वाटतं. मला तर फारच वाटतं, कारण माझे आजोबा, वडील याच दिलदार गावाचे. एकेकाळची ही संस्थानी राजधानी आज तिच्या वेगाने होणाऱ्या औद्योगिकरणामुळे गल्लाभरू बाजारीपणाच्या विळख्यात हळू हळू गुरफटत चालल्यासारखी वाटली. मला तर इंदौरच्या बाह्यांगातील बदल फारच जाणवला. जवळ जवळ दोन दशकांनी मी येथे येत होते. त्यातल्या त्यात नजरेला चटकन बोच-लेली गोष्ट म्हणजे अनोळखी पदव्यांचे शेपूट लावलेल्या चर्मरोग, गुप्त-रोग, संतती प्राप्त करून देणाऱ्या तथाकथित डॉक्टर लोकांचे त्यांच्या ठळक फोटोनांवानिशी मोक्याच्या जागी असलेले भले मोठे फलक. एके ठिकाणी टेलिफोनवरून सापाचे वीष उतरविले जाईल अशीही पाटी होती.

इंदौर आणि मध्य प्रदेशात बरेच नातलग असले तरी कोणाच्या घरी उतरल्यास हालचालींवर फार नियंत्रण येतं. म्हणून हॉटेलमध्येच रहायचं आधीच ठरवून टाकलं होतं. बस स्टॅंडसमोर अनेक हॉटेल्स असली तरी स्वच्छता अगदी बेताचीच. त्यातून उघडी गटारे. पण हॉटेल शोधण्यात फार वेळ घालवला तर दिवस वाया जायचा म्हणून त्यातल्या त्यात बऱ्या अशा ‘चंद्रलोक’मध्ये बाडबिस्तरा टाकला. भाडं होतं डबल रूमला ५५ रु. आणि चार बेडस्‌ना रोजी १०० रु. खांडव्या-हून येताना बसमध्ये ओळख झालेले देसाई दांपत्यही बरोबर होते.

स्नान करून थोडं उदरभरण करून बाहेर पडलो. मुलांना हे भरगच्च वस्तीतील निवासस्थान अजिबात आवडलं नव्हतं. मध्य प्रदेश पर्यटन

खात्याच्या इंदौर येथील निवासस्थानासाठी दोन पत्रं पाठवूनही उत्तर न आल्याने प्रत्यक्ष जाऊन दाद मिळते का ते पहावे म्हणून पहिल्यांदा रवींद्र नाट्य मंदिराशेजारील त्यांच्या ऑफिसमध्ये गेलो. आमची पत्रं मिळालीच नसल्याचं अपेक्षित उत्तर तेथे मिळालं. सरकारी ऑफिसेस्‌ची अशी काही गंमत आहे की रजिस्टर पत्राचीच फक्त बहुतेक वेळा पोच मिळते. कमी पैशातील कार्डा-पाकीटावर सहसा काम व्हायचंच नाही.

यावेळी तेथे जागा मिळण्यासाठी एक युक्ती वापरायची ठरविली होती. त्यानुसार मी पर्यटनविषयक मराठीतून लिखाण करत असल्याचे सांगून प्रकाशित पुस्तके दाखविताच त्यांनी एक रूम द्यायचे ताबडतोब कबूल केले. परंतु दोनच दिवसांनी इंदौरला रिलायन्स कपची क्रिकेटची मॅच असल्याने फक्त एकच दिवस ते खोली देऊ शकत होते. रोजी १३० रुपयात अतिशय स्वच्छ, सुंदर डबलरूम होती. एक दिवसासाठी सामानाची ने-आण नको म्हणून आहे त्या हॉटेलमधेच कसंतरी राहण्यासाठी मुलांचं मन वळवलं.

मध्यप्रदेश टुरिझमच्या (एम्. पी. टी.) अधिकाऱ्यांनी इंदौर आणि मध्य प्रदेशची प्रवासविषयक खूपच माहिती दिली.

औद्योगिक शहर असल्याने खुद्द इंदौरमध्ये खास प्रेक्षणीय अशी विशेष स्थळे नाहीतच. मराठा वास्तुशिल्पशास्त्राचा उत्कृष्ट नमुना समजला जाणारा शहराच्या मध्यवर्ती भागात असलेला होळकर घराण्याचा जुना नऊ मजली ऐतिहासिक राजवाडा काही वर्षांपूर्वी लागलेल्या आगीत जळाल्याने सध्या इंदौरमध्ये आवर्जून पहावं असं राहिलंय फक्त दिगंबर जैन पंथियांचे विलक्षण चित्ताकर्षक काचमंदिर. या राजवाड्याच्या जीर्णोद्धाराच्या कामाचा शुभारंभ नुकताच करण्यात आला. जीर्णोद्धारासाठी अंतिम आराखडे तयार करण्यापूर्वी जुन्या आराखड्यांचा बारकाईने अभ्यास केला जाईल. जुन्या आकाराबर-हुकूम जीर्णोद्धार केला जाईल. त्यासाठी अनेक वर्षे लागतील आणि कित्येक कोटी रुपये खर्च येईल.

विविधरंगी काचेचे तुकडे, आरसे, मणी यांचे अप्रतिम नक्षीकाम काच मंदिराच्या भिंती, छत आणि खांबांवर केलेले आहे. आत प्रवेश केल्या-

नंतर भिंतीवर एका बाजूला जैन धर्मातील सत्य, अहिंसा यासारख्या निष्ठा तर दुसरीकडे जैनांची तीर्थक्षेत्रे दाखविलेली आहेत. मंदिराच्या पहिल्या मजल्यावर शीतल भगवान, वर्धमान भगवान आणि पुष्पदत्त भगवान या तीन जैन तीर्थंकारांच्या ब्राँझच्या मूर्ती आरशांचे असे कोन साधून बसविण्यात आलेल्या आहेत की कडेनी बघितले असता त्यांच्या अगणित प्रतिमा दिसतात. मंदिरासारखी सुंदर वास्तू म्हणजे फोटो काढायला मनाई हे गृहीतच धरलं होतं; परंतु तेथील रखवालदाराने गळ्यातील कॅमेऱ्याची आठवण करून दिली. मनाई असली तरी खुशाल फोटो काढा, पण मला दोन रुपये द्या. फोटो काढायला बंदी असणे हा काहींना पैसे कमविण्यासाठीचा जणू एक मार्गच उपलब्ध झालाय.

मध्य वस्तीत असलेले जैन मंदिर बघून ऑटोरिक्षाने वस्तू संग्रहालय पहायला गेलो. भारताचा गाभा असलेला मध्य प्रदेश पुरातत्वाच्या दृष्टीनेही समृद्धशाली आहे. या प्रांतातील काही शिल्पे, मूर्ती, पुरातत्वाचे नमुने या संग्रहालयात बघायला मिळत असले तरी त्यात खास असं काही वाटलं नाही. इंदौरचे हे म्युझियम सोमवार खेरीज १० ते ५ उघडे असते.

छत्री बागेतील होळकर राजवंशीयांच्या समाध्या, अन्नपूर्णा मंदीर ही इंदौरमधील आपापल्या आवडी-निवडी, वेळेप्रमाणे भेट देण्यासाठीची इतर काही ठिकाणे.

इंदौरच्या आसपास जी प्रेक्षणीय व धार्मिक स्थळे आहेत त्यातील प्रमुख म्हणजे मांडू, ओंकारेश्वर, महेश्वर आणि उज्जैन. (याशिवाय इंदौरपासून १६० कि. मी. वर विंध्य पर्वताच्या जंगलात दडलेल्या ५ ते ७ व्या शतकातील वाघ गुंफाही बघण्यासारख्या आहेत. या लेण्यांतील भित्तीचित्रांचे अलंकृत कोरीव काम गतकालीन महान कलाकारांच्या कुशल कारागिरीचे दर्शन घडविताना अजिंठा लेण्यांची आठवण करून देते.) शादीआबाद किंवा आनंदनगरी म्हणून ओळखण्यात येणाऱ्या मांडूला पहिल्यांदा जायची इच्छा होती. एम्. पी. टी. च्या मांडू ट्रिपच्या सर्व जागा भरल्या असल्याने कोणी खासगी पर्यटन कंपन्या इंदौरच्या आसपासची स्थळे दाखवितात का याच्या शोधार्थ भटकंती केली. तेव्हा विजयंता ट्रॅव्हल कंपनीच्या फक्त मांडूच्या ट्रिप्स दर रविवारी असतात

असे कळले. ताबडतोब विजयंता ट्रॅव्हल कंपनीच्या ऑफीसमध्ये जाऊन जागा राखून ठेवल्या. त्यांचा दर होता प्रत्येकी रु. ४० तर एम्. पी. टी. चा दर होता माणशी ७० रु. मांडूसाठी स्पेशल खासगी टॅक्सीही ३७५ रुपये दराने मिळत होत्या. इतरत्र मात्र त्यांचा दर होता २.५० रुपये प्रति किलोमीटर.

मांडूसाठी रविवारचं आरक्षण झाल्याने उरलेल्या मधल्या एका दिवसात ओंकारेश्वर-महेश्वर ही तीर्थस्थाने करायचे ठरविले. या ठिकाणांना जाण्यासाठी म. प्र. पर्यटन खात्याच्या बसेस नसल्याने जनता एस. टी. बसला पर्याय नव्हता. ओंकारेश्वर, महेश्वर थोड्याशा धावपळीने एक दिवसात सहज करता येतात.

• • •

## २. नर्मदातटीचे ओंकारेश्वर–महेश्वर

सकाळच्या पहिल्या बसने ओंकारेश्वर गाठायचं ठरवून सहा वाजताच बस स्टँडवर येऊन दाखल झालो. बरोबर देसाई दांपत्य होतंच. इंदौर–ओंकारेश्वर थेट बस साडेसातला असल्याने तिच्यासाठीन थांबता दुसऱ्याच एका बसने साडेसहाला ९० कि. मी. वरील ओंकारेश्वरकडे निघालो. काल आलो, तोच इंदौर-खांडवा रस्ता होता हा. मोरटक्का गावी उतरताच ओंकारेश्वरची बस उभीच होती. भरलेली असली तरी आत शिरायला आणि नंतर थोडी टेकायला जागा मिळाली. दहा किलोमीटर्स तर जायचं होतं फक्त.

नर्मदेच्या पात्रातील एक मैल लांब आणि अर्धा मैल रुंदीच्या बेटावर ओंकारेश्वरातील महादेवाचे मुख्य मंदिर आहे. या बेटाचा आकार 'ओम्' या अक्षराप्रमाणे असल्याने तेथील महादेवाला ओंकारेश्वर हे नाव प्राप्त झालं आहे. या क्षेत्राला ओंकारेश्वर नाव पडण्यामागची आख्यायिका अशी सांगितली जाते–

पुराणकाळात या प्रदेशात विंध्य नावाचा राजा राज्य करत असताना तेथे एकही देवदेवता नव्हती. विंध्य राजाने यासाठी नारदमुनींची प्रार्थना केली. नारदमुनींनी त्याला ओंकाररूपी महादेवाची आराधना करण्यास सांगितले. त्यामुळे 'ओम्' हे अक्षर उच्चारून महादेव तेथे प्रकट झाला. तेव्हापासून महादेवाचा निवास असलेल्या या क्षेत्राचे

ओंकारेश्वर असे नामाधिकरण झाले. पुढे त्रिपुर नावाचा राक्षस आणि त्याच्या पुत्रांनी लोकांना त्राही भगवान करून सोडले, तेव्हा ब्रह्मा व विष्णू शिवाच्या मदतीला धाऊन आले आणि त्या तिघांनी त्रिपूर व त्यांच्या मुलांचा नाश केला. तेव्हापासून शिवाबरोबर ब्रह्मा व विष्णु यांचाही निवास या स्थळी आहे असे श्रद्धाळू मानतात.

या ओंकारेश्वरला मांधाता नाव पडण्यामागची कथाही अशीच चमत्कृतिपूर्ण आहे. या भागावर राज्य करत असलेल्या युवनाश्य राजाला अनेक राण्या असूनही संतती नव्हती. त्यामुळे दु:खीत होऊन तो वनातील भृगू ऋषींच्या आश्रमात गेला. एका रात्री राजाला तहान लागल्याने त्याने एका मडक्यातील पाणी प्यायले. भृगू ऋषींनी ते पाणी राजाच्या राणीसाठी संतानोत्पत्तीच्या मंत्रांनी मंतरून ठेवले होते. राजाने ते प्राशन केले तरी मंत्राचा परिणाम होऊन त्याला पुत्र झाला. या चमत्कारिक पुत्रप्राप्तीने तो व इतरेजन घाबरले. पण इंद्राने त्याला ' मां धास्यति ' असे आश्वासन देऊन सर्वांची भीती घालविली आणि बालकालाही वाचविले. या मुलाचे नाव मांधाता असे ठेवण्यात आले. या मांधाता राजाच्या दोन मुलांनी शंकराला प्रसन्न करून घेण्यासाठी यज्ञयाग केला. यज्ञवेदी असलेल्या खडकामध्ये एक शिवलिंग प्रगट झाले. हेच पुढे ' ओंकारेश्वर मांधाता ' या नावाने ओळखले जाऊ लागले.

ब्रह्मा, विष्णू, महेश या तिन्ही देवांचे वास्तव्यदर्शक म्हणून ओंकारेश्वर गाव ब्रह्मपुरी, विष्णुपुरी आणि शिवपुरी अशा तीन भागात वसलेलं असून येथील मुख्य मंदिर म्हणजे ओंकारेश्वर महादेवाचं. हे बारा ज्योतिर्लिगांपैकी एक असल्याने त्याला धार्मिक क्षेत्रात फार महत्त्वाचे स्थान आहे.

ओंकारेश्वर मांधाताच्या मुख्य मंदिरात जाण्यासाठी नदी ओलांडून जावं लागतं. आज तेथे चांगला पूल असला तरी पूर्वी होडीने नर्मदा पार करावी लागत असे. वाटेवर अनेक मंदिरे, पूजा-साहित्याची दुकाने लागतात. या दुकानातून नर्मदेतील गोटे–विशेषकरून शिवलिंगाच्या आकाराचे विकायला होते.

कार्तिकी पौर्णिमा, शिवरात्री यासारख्या दिवशी लाखांनी फुलणारं ओंकारेश्वर आज संथ होतं, त्यामुळेच सुलभतेने दर्शन होऊ शकलं.

ओंकारेश्वरचे शिवलिंग स्वयंभू असून त्याच्या भोवताली पाणी आहे. जवळच पार्वती व गणपती यांच्या मूर्ती आहेत. ओंकारेश्वर मंदिराच्या आवारात एकावर एक शिवलिंगे असलेलें तीन मजली मंदिर आहे. अरुंद अशी जिन्याची शिडी चढून सर्वात वरच्या मंदिरात गेल्यावर तेथून नर्मदा परिसराचा अतिशय रमणीय देखावा दिसतो. समोर नर्मदामाई एखाद्या तृप्त मातेसारखी हळुवारपणे संथगतीने पुढे चाललेली; तीवरील धार्मिक स्थळी नेहमी असणाऱ्या गडबड, गोंधळापासून बराचसा मुक्त असा निसर्गरम्य घाट, मागे 'ओम्' आकाराची पर्वतश्रेणी, टेकडीच्या पार्श्वभूमीवर गतकालीन वैभवाच्या खुणा जपत उभा असलेला राजवाडा. काही वेळ निवांत बसावं अशी ही जागा.

शैव मंदिरांबरोबर ओंकारेश्वरमध्ये अनेक वैष्णव आणि जैन मंदिरेही आहेत. सर्व धर्मपंथीयांनी या निसर्गरम्य स्थळाला भेट द्यावी हाही मंदिरे बांधण्यामागचा उद्देश असावा. ओंकारेश्वरजवळ नर्मदेला दोन फाटे फुटतात; त्यापैकी एका प्रवाहाचे कावेरी असे नाव आहे.

ओंकारेश्वर परिसराला मराठ्यांच्या दृष्टीने आगळे ऐतिहासिक महत्त्वही आहे. थोर शूर सेनानी पहिले बाजीराव पेशवे यांच्या संचाराने हा प्रदेश पुनीत झालेला असून त्यांचा अंतही याच भागातील रावेरखेडी येथे झाला.

वरून उन्हाचा चटका बसायला लागला तरी थंडगार पाण्याच्या शांत नर्मदातटावरून उठवत नव्हतं; परंतु महेश्वरही करायचे असल्याने निघायला हवे होते. ओंकारेश्वर–महेश्वर ही थेट बस दुपारी असल्याने इंदौर मुक्कामी पोचता येणे अवघड झाले असते; म्हणून बारा वाजताच ओंकारेश्वर सोडलं.

मोरटक्क्यावरून इंदौर मार्गावरील बडवाहला उतरून तेथून दीडची महेश्वरला जाणारी बस पकडली. चकचकीत सूर्यप्रकाश असला तरी दुतर्फा असलेल्या वृक्षांमुळे प्रवास तसा त्रासदायक झाला नाही. इंदौरपासून ९१ कि. मी.वर असलेले महेश्वर म्हणजे रामायण–महाभारतकालीन महिष्मती. महाप्रतापी राजा कार्तवीर्यार्जुन याची राजधानी. राणी अहिल्यादेवींनी ही आपली राजधानी केल्याने त्याचे पूर्वापार महत्त्वाचे स्थान पुन्हा एकदा उंचावलं गेलं.

बडवाहपासून ४० कि. मी.वरील महेश्वर हे अगदी छोटं रुक्ष वाटावं असं गाव. एस्. टी. स्टँड असा नव्हताच. वर ऊन रणरणत होतं तरी वाटेतील एका दुकानात फक्त पाणी पिऊन अहिल्यादेवींच्या वाड्याकडे निघालो. दहा-पंधरा मिनिटांच्या चालीनंतर किल्लेकोट दिसू लागला. वेशीच्या दरवाज्यातून आत शिरताच एका पडवीवजा घरावर 'म्युझियम' अशी पाटी दिसली. त्या संग्रहालयाचं रूप इतकं जुनाट, अनाकर्षक होतं की येताना वेळ उरला तर बघू म्हणून आधी वाड्यात गेलो.

प्रवेशद्वारातून आत जाताच सिंहासनवजा उच्चासनावरील घोंगडीवर बसलेली अहिल्यादेवींची बिनकाठी पांढऱ्या पातळातील धीरगंभीर सात्त्विक भावमुद्रेची मूर्ती दिसली. दरबारासाठी समोर पांढरी बैठक पसरलेली. सजावट साधी, सहजसुंदर, त्यात कुठेही उथळ भपकेबाजपणा नाही.

अहिल्याबाईंवर संकटांचे पहाड कोसळूनही त्यांनी मोठ्या खंबीरपणे राज्य चालविले. मात्र हा राज्यकारभार त्यांनी अतिशय निस्पृह भावनेने राणी म्हणून नव्हे, तर दौलतीवर बिल्वपत्र ठेऊन एक विश्वस्त या नात्याने केला.

एका विशाल राज्याची स्वामिनी, करोडो रुपयांचे निर्माणकार्य, दानधर्माचा वर्षाव करणारी महाराणी इतक्या छोट्या, साध्या महालात रहात असे यावर चटकन् विश्वासच बसत नाही. अहिल्याबाईंच्या नि:स्वार्थ, समर्पित, सेवावृत्तीमुळे त्यांचा राजवाडा महाल वाटत नाही, तर घर वाटतं, नतमस्तक व्हावं असं तीर्थस्थान वाटतं.

वाड्यात एका बाजूला असलेल्या देवघरात अहिल्यादेवींचे रोजचे पूजा साहित्य असून त्यात बावीस किलोचा सोन्याचा पाळणा, चांदीचे नवरत्नजडीत शिवलिंग, उजव्या सोंडेचा शंख, इ. वस्तू पहायला मिळतात. हा वाडा अशा रीतीने बांधून घेतलेला आहे, की कुठल्याही सज्जा, तट, अगर घुमटाच्या झरोक्यातून पवित्र नर्मदामाईचं दर्शन घडावं.

महेश्वरला नर्मदा जास्त रुंदावली असल्याने आणखी संथ, भारदस्त वाटत होती. अहिल्यादेवींच्या पुण्याईचे तेजाने नर्मदेचे पाणी आजही झळाळून गेल्यासारखं दिसत होतं. दूरवर नर्मदा अनेक भागात विभागलेली

आहे. अशी आख्यायिका आहे की, कार्तवीर्यार्जुन राजाने नर्मदेला आडवायचा प्रयत्न केला, तेव्हा ती हजारो वाटांनी विभागून पसार झाली. त्यावरूनच त्याला सहस्रधारा नाव पडले. या ठिकाणी नदीच्या पात्रात अनेक खडक आडवे आल्याने तिचे अक्षरशः हजारो फाटे झालेले आहेत.

वाड्यासमोरून नदीच्या घाटाकडे जाण्यासाठी पायऱ्या आहेत. मध्येच डावीकडे महेश्वरी साड्यांचे उत्पादन व विक्री केंद्र दिसताच पाय तिकडे वळले. अहिल्यादेवींनी १८ व्या शतकात मांडव आणि सुरतमधील शरण आलेल्या वीणकरांना महेश्वरला बोलावले. १७७० मध्ये महेश्वर एक महत्त्वपूर्ण विक्री केंद्र होते. आजच्या विणकऱ्यांमधेही आपल्या पूर्वजांसारखी चतुराई आहे हे जाणून काही वर्षांपूर्वी थंडावलेल्या या हस्तकला व्यवसायाला रेवा सोसायटीने पुनर्ज्जीवन दिले. अहिल्यादेवींचे राज्यात एक हजारहून अधिक माग होते. आज फक्त साडेतीनशे आहेत. चित्तवेधक मुलायम गर्भरेशमी, निमरेशमी, सुती महेश्वरी साड्या खिशाला थोड्या भारी वाटल्या तरी स्त्रीवर्गाच्या मनात वर्षानुवर्षे आपला भाव टिकवून आहेत. येथे साड्यांच्या किमती विशेष स्वस्त न वाटल्याने नुसती नजर टाकून पुढे निघालो.

घाटावर जाताना वाटेत महादेव, कळेश्वर, राजराजेश्वर, विठ्ठलेश्वर, इ. मंदिरे लागतात. प्रवेशद्वार, सज्जे, खांब यावरील नाजूक कोरीव कामामुळे सर्वच मंदिरे सुरेख असली तरी महादेवाचे मंदिर फारच प्रेक्षणीय आहे. याच शिवालयाच्या नक्षीकामाने सुशोभित अशा झरोक्यातून अहिल्याबाई नर्मदामातेचं दर्शन घेत असत. या मंदिरासमोर हत्तीच्या पायी बळी गेलेल्या मालोजीरावांची छत्री आहे. एके ठिकाणी दगडावर कोरलेली सापाच्या वेटोळ्याची इतकी गुंतावळ दिसते, की त्याचा तोंडापासून ते शेपटापर्यंतचा माग काढणं मुष्कील व्हावं.

पेशवे घाट, फणसे घाट, अहिल्या घाट अशा तीन घाटांचा मिळून झालेला महेश्वरचा दगडी बांधकामाचा प्रशस्त नर्मदा घाट अतिशय स्वच्छ आणि प्रसन्न आहे. या घाटाला नुसत्या पायऱ्या नाहीत, तर कोरीव नक्षीकामाचे झरोके, बुरुज, नक्षीदार भव्य प्रवेशद्वाराच्या तटबंदीने तो सुशोभित झालेला आहे. त्यातून सकाळचे स्नान, कपडे धुण्याची गडबड–गोंधळ नसल्याने शीतल वातावरणात तो आणखीनच

रम्य वाटत होता. घाटाच्या एका बाजूला अहिल्यादेवी आणि राजघराण्यातील इतर काही स्त्रियांच्या छत्र्या (दहनस्थाने) आहेत.

कलत्या उन्हात नर्मदेच्या नितळ, गार पाण्यात उतरताच दिवसभरचा थकवा कुठल्या कुठे पळाला. मग किनाऱ्यावरील बोटीमधून पैलतीर गाठून येण्याच्या मोहाला आवरणं कसं शक्य होतं ? येथील संथ पाण्यातील नौकाविहार ही आगळीच अनुभूती आहे.

अहिल्यादेवींच्या वास्तव्याने, कर्तृत्वाच्या तेजाने शुचिर्भूत झालेल्या परिसरातील नर्मदा घाटावर काही घटका निवांत बसून रहावं असं फार वाटत होतं, पण प्रवासाचा आराखडा आगावू आखलेला असल्यावर असा निवांतपणा कुठून सापडणार. दुसऱ्या दिवशी सकाळची मांडूची रिझर्व्हेशन्स केलेली असल्याने इंदौरला परतणे आवश्यकच होते; नाहीतर महेश्वरला अहिल्या ट्रस्टच्या गेस्ट हाऊसमध्ये किंवा सरकारी विश्रामधामात निवासाची चांगली सोय होती.

नव्वद कि. मी. वरील इंदौर गाठायचे वेध लागले होते. त्यात इंदौरपर्यंत दुपारनंतर थेट बस नसल्याने बदलाबदली करून जावं लागणार होतं. म्हणून चहा घेण्यातही वेळ न घालवता थेट बसथांबा गाठला. एक भरलेली बस उभी होती. तीत कसंतरी आत जाऊन बारा कि. मी. वरील धामनोद गाठलं. येथेही इंदौरला जाणारी दुसरी एक बस तयारच होती. तिथून इंदौर मुक्कामी पोहोचेपर्यंत चांगलीच रात्र झाली. वाटेत लष्करी छावणी असलेले महू लागले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे हे जन्मगाव.

इंदौर हे एके काळच्या राज्यकर्त्या कर्तृत्ववान राणीचं गाव. पण आज मात्र स्त्रियांना अंधार पडल्यानंतर बाहेर पडण्यासाठीही धोक्याचं झालं आहे, असं अनेकांकडून पुण्याला ऐकलं होतं. त्यामुळे आता उदरभरणार्थ रात्री हॉटेल शोधण्याची वेळ आली तेव्हा थोडी भीतीच वाटली. आमचं वास्तव्य एस्. टी. स्टँडसमोरच असल्याने बरेच मद्यपी धुंदीत असलेले दिसले, म्हणून आत शिरावे की नाही याची धाकधुक वाटू लागली. शेवटी शुद्ध शाकाहारी गुजराथी खानावळी मदतीला आल्या.

• • •

## ३. आनंदनगरी मांडू

सकाळ उजाडली तीच मुळी झिमझिम पाऊस घेऊन. एरवी ट्रिपमध्ये पाऊस आला की नाक मुरडलं जातं, पण आजच्या वरुणराजाचं आगमन शुभशकुनी वाटलं. कारण मोगलसम्राट जहांगिरपासून अनेकांनी म्हणून ठेवलेलं आहे, की पावसाळ्यातील मनमोहक सृष्टीसौंदर्याने नटलेलं मांडू पाहण्यातच खरी मजा आहे.

आम्ही चाललो होतो मांडूलाच, पण पावसाळा संपतेवेळी. तरीही पावसाळ्यातील नाही तरी पावसातील मांडवगडचे दर्शन होणार म्हणून खुषीत होतो.

बाजबहाद्दूर–रूपमतीच्या अतूट निस्सीम प्रेमाने अजरामर झालेली; इतिहासकार, पुराण वस्तू संशोधकांचे माहेरघर म्हणावी अशी मांडू ही आनंदनगरी इंदौरपासून ७० कि. मी. वर विंध्याचल पर्वतश्रेणीत ६१० मीटर्स उंचीच्या माथ्यावर आहे.

इंदौरहून मांडूकडे जाणारा जवळचा रस्ता धारवरून जातो. याच धारच्या किल्ल्यात कारावासात असताना आनंदीबाई पेशवे प्रसूत होऊन दुसऱ्या बाजीरावाचा जन्म झाला. आता ती खोली त्यांचे स्मारक म्हणून राखून ठेवण्यात आली आहे. धारजवळ एका बसला अपघात झाल्याने तो रस्ता बंद झाला होता, म्हणून आम्हाला दुसऱ्याच एका रस्त्याने मांडूला नेण्यात येत होते.

पावसाच्या हलक्या शिडकाव्यात आसमंत न्हाल्याने सर्वत्र ताजा टवटवीतपणा भरून राहिला होता. नयनरम्य हिरव्या देखाव्यांच्या महिरपी ओलांडत दऱ्याखोऱ्यातील दोन तासांच्या चढउताराच्या प्रवासानंतर समोर ठाकली ती घाटमाथ्यावरची किल्लेवजा दणकट तटबंदी. आलमगीर दरवाजा, भांगी दरवाजा पार करून सर्पाकार रस्ता घेऊन आला सँडस्टोनच्या दिल्ली दरवाज्यापाशी. मांडू किल्ल्याच्या बारा दरवाज्यांपैकी हा प्रमुख दरवाजा.

ऐतिहासिक दरवाजे एका मागून एक उघडू लागताच मनही नकळत मांडूच्या भूतकाळात शिरू लागलं.

या मांडूने ६ ते १८ शतकातील राज्यकर्त्या घराण्यांचे अनेक चढ-उतार पाहिले. परमारांच्या राजछत्राखाली माळवा स्वतंत्र राज्य झाल्यावर ११ व्या शतकात मांडूचं महत्त्व वाढू लागलं. १४०१ ते १५२६ या काळात प्रथम घोरी आणि नंतर खिलजी यांनी मांडू ही आपली राजधानी ठेऊन माळव्यावर राज्य केले. मोठ्या परिश्रमाने काळजीपूर्वक बांधलेली गावाभोवतालची तटबंदी, सात मजली विजय-स्तंभ, होशांग शाहचे थडगे, जामा मशिद, जहाज महाल यासारखी मांडूतील बरीचशी स्मारके याच काळात बांधली गेली. सहा दशके चाललेली ही बांधकामाची प्रक्रिया त्या काळातील हिंदू–इस्लामिक वास्तूशिल्पशास्त्राचे मनोहारी रूप प्रतित करते.

सगळ्यामधे मांडूचे दोन बाप-बेटे राज्यकर्ते जास्त लक्ष वेधून घेतात. महंमद शाह (१४३४–१४६९) याने आपल्या कारकिर्दीचा मोठा काळ गुजराथ, जुनापूर, दिल्ली आणि दक्षिणेकडील शेजाऱ्यांबरोबर लढाया करण्यातच घालविला. त्याचे सामर्थ्य एवढे होते, की बगदादचा खलीफा आणि मध्य आशियातील सत्ताधिश यांनी आपले वकील त्याच्या दरबारात पाठविले होते. मात्र महंमद शाहचा मुलगा घियासुद्दिन खिलजी हा आपल्या वडिलांच्या युद्ध प्रेमाला इतका विटला, की त्याने युद्ध न करण्याची शपथच घेतली.

घियासुद्दिनची ३१ वर्षांची कारकिर्द शांततेची गेली. त्याच्या जनानखान्यात १५,००० बायका होत्या. असं म्हणतात की समारंभप्रसंगी पुरुष वेषातील पाचशे सुंदर सशस्त्र तुर्की मुली त्यांच्या सिंहासनाच्या

एका बाजूला उभ्या असत; आणि तेवढ्याच संख्येने दुसऱ्या बाजूला ऑबिसिनियन बायका असत. स्वतःच्या मुलाने केलेल्या विषप्रयोगामुळे घियासुद्दिनचा अंत झाला.

मांडूचा शेवटचा सत्ताधिश बाझ बहाद्दूर याने आपली राजवट काही विशिष्ट हेतूंनी सुरू केली. परंतु त्याला राजपूत राणी दुर्गावतीकडून लाजिरवाणा पराभव पत्करावा लागला. त्यानंतर संगीत हेच त्याचे जीवन झाले. या संगीत वेडापायी रूपवान गायिका रूपमतीवर त्याचे प्रेम जडले. आजही या प्रेमी युगुलाची काव्ये लोकगीतातून गायली जातात. १५६१ मध्ये अकबराच्या सैन्याने मांडूवर हल्ला करून ताबा मिळविला. राणी रूपमती शत्रूच्या हाती पडली. परंतु तिने अप्रतिष्ठित, अवमानकारक जीणे जगण्यापेक्षा आत्महत्येचा मार्ग चोखाळला.

आज मांडूत ७५ च्या वर स्मृतिस्थळे आहेत. त्यातील काही फक्त अवशेष रूपाने शिल्लक असली तरी त्यातील प्रत्येकाला स्वतःची अशी खास कहाणी आहे. या अवशेषांची ढोबळमानाने तीन समुहात विभागणी करता येते. (१) शाही महालांचा समूह-रॉयल एन्क्लेव्ह (२) मांडू गावातील मध्यवर्ती समूह आणि (३) रेवाकुंड समूह.

पावसाळी कुंद वातावरणातील मांडूतील स्मारके आपापल्या कथा–व्यथा मार्गदर्शकाच्या मुखातून सांगण्यासाठी आतूर झाली होती आणि आम्हीही होतो ऐकण्यासाठी मोठे उत्सुक. बाझ बहादूर आणि रूपमतीच्या प्रेमविलापांनी धुंद झालेल्या परिसरातील रूपमती मंडपापासून गतस्मृतिचित्रे एकामागून एक साकारू लागली.

तीनशे पासष्ट फूट ऊंचीच्या डोंगरकड्याच्या टोकावर बांधलेले रूपमती पॅव्हिलियन हे मुळात लष्कराच्या पहाऱ्याची, निरीक्षणाची जागा म्हणून बांधले गेले असावे. रूपमतीच्या नावाशी हे निगडीत झाले असण्याचे कारण म्हणजे ही हिंदू स्त्री पवित्र नर्मदामाईचे दर्शन घेण्यासाठी येथे रोज येत असे. नर्मदेच्या दर्शनाशिवाय ती अन्न ग्रहण करत नसे. काहींच्या मते येथील दालनांत राणी रूपमतीचे निवासस्थान होते. तेथून ती बाझबहादूर महाल आणि खालील निमार खोऱ्यातून वाहणाऱ्या नर्मदेला पहात असे.


रूपमती मंडपाच्या गच्चीवरून दिसणारे सभोवतालचे विलोभनीय दृष्य भान हरपून टाकणारे होते. धरणीमातेने ल्यालेल्या हिरव्यागार शालूवर नर्मदेच्या कलाकृतीसारख्या दिसणाऱ्या बारीक रेघेने केलेले बाकदार नक्षीकाम तासन् तास पहात रहावे असे होते. सूर्यास्ताचे वेळी अगर चांदण्या रात्री तर हे दृष्य फारच अप्रतिम दिसते. यासमयी सर्व मांडवगडच एक स्वप्ननगरी असल्याचा आभास होतो.

बाझ बहादूरचा महाल म्हणजे आफगाण वास्तूशिल्पशास्त्राचा एक उत्तम नमुनाच. याच्या प्रवेशद्वाराच्या कमानीवर कोरलेल्या पर्शियन भाषेतील शिलालेखानुसार हा महाल नसरुद्दीन खिलजी याने इ. सन १५०८ मध्ये बांधला. तो रेवा कुंडाजवळ असल्याने बाझ बहादूरच्या मनात भरला. कारण या रेवा कुंडात स्नान करण्यासाठी त्याची प्रेयसी रूपमती बरेचदा येत असे. रेवा कुंडातील पाणी महालाच्या कमानीवरून फिरवून त्याच्या मध्यवर्ती भागात असलेल्या तलावात सोडण्यात आलेले आहे. मोठमोठाली दालने, गच्च्या यांनी वेढलेले प्रशस्त अंगण हे राज-प्रासादाचे वैशिष्टच. आत हिंडत असताना मधूनच गाण्याची लकेर ऐकू आली, मधुबनमे राधिका नाचे रे... आमच्या गाईडने सूर लावला होता.

बाझ बहादूरच्या महालासमीप असलेल्या रेवा कुंडात नर्मदा प्रगट झाली आहे असं मानलं जातं. त्यामुळे त्यात स्नान केल्याशिवाय नर्मदा प्रदक्षिणा पूर्ण होत नाही अशी भाविकांची श्रद्धा आहे. या कुंडाकाठी असलेल्या मंडपात जहांगिरने आपला ४५ वा वाढदिवस साजरा केला होता.


नयनरम्य परिसरातील सागर तलावाजवळ दाईका महाल हे मांडूतील एक स्मृतिस्थान. या इमारतीनजिकच्या रस्त्यावर 'एको पॉईंट' आहे. आपण काढलेल्या आवाजाचा एक अगर दोन वेळा प्रतिध्वनि उमटतो. मात्र हा प्रतिध्वनि काढणे फक्त गाईडला शक्य झालं.


'निळकंठ' हे मांडूतील भगवान शंकराचे पवित्र तीर्थस्थान. बऱ्याच पायऱ्या उतरून गेल्यावर खोल दरीच्या कड्यावर असलेल्या शिवमंदिरा-बाहेरून अतिरम्य देखावा दिसतो. एका जिवंत झऱ्यामुळे येथे एक छोटे कुंड तयार झाले असून आजही अनेक भाविक या ठिकाणी शिव-



मांडू-रूपमती मंडप ↑


↓ सांची-स्तूप नं. १





शिवपुरी- सख्याराजे शिंदे यांची समाधी ↑

↓ ग्वाल्हेर-ग्वाल्हेर किल्ला-मानमंदीर राजप्रासाद



दर्शनासाठी येतात. शिवमंदिराजवळ मोगल सरदार शाह बडगाहखान याने अकबराच्या हिंदू पत्नीसाठी बांधलेला लाल वाळूच्या दगडातील निळकंठ महाल आहे. तेथील भिंतीवर असलेल्या अकबरकालीन शिलालेखात ऐहिक सत्ता, संपत्तीचा गर्व करणे मिथ्या आहे अशा आशयाचा मजकूर कोरलेला आहे. खानदेशवर विजय मिळवून परततेवेळी बादशाह अकबर या स्थळी थांबला होता. मुस्लीम आक्रमकांनी येथील शिवलिंग नष्ट केलं होतं. परंतु पहिले बाजीराव पेशवे या ठिकाणी आले असता त्यांनी त्याची पुनर्प्रतिष्ठापना केली.

मांडू गावाच्या मध्यात होशांग शाहचे थडगे आहे. या होशांग शाहने स्वतःच आपल्या थडग्याच्या बांधकामास सुरुवात केली. त्याच्या मृत्यूनंतर त्याचा मुलगा महंमदशाह खिलजी याने ते इ. स १४०० च्या सुमारास पूर्ण केले. भारतातील ही पहिली संगमरवरी वास्तू. अफगाण वास्तूशिल्पशास्त्राचा एक उत्तम नमुना ठरावा अशा या वास्तुवर हिंदू शिल्पशास्त्राचा ठसा आहे. अप्रतिम संगमरवरी जाळीदार नक्षीकाम, प्रमाणबद्ध घुमट आणि चार कोपऱ्यांतील लक्षणीय समचतुष्ण कोन ही या वास्तूची वैशिष्टये. याच्या पश्चिमेकडील भागातील खांबांची रांग हिंदू धर्मशाळेच्या धर्तीची असून तेथे भोज राजाचा दिवाण-ए-आम असावा. भोज राजाचे अष्टप्रधान आणि दरबारातील नवरत्नांना बसण्यासाठीच्या कमानदार जागा आणि सिंहासनासारखे एक व्यासपीठही या ठिकाणी दिसते. शहाजहानने होशांग शाहच्या थडग्याला भेट दिली होती आणि तेथील लक्षणीय काम पाहून त्याने आपल्या चार शिल्पकारांना या वास्तूच्या आराखड्याचा अभ्यास करण्यासाठी पाठविले होते. त्या चौघांत ताजमहालच्या बांधकामाशी संबंधित असलेला उस्ताद हमीदही होता.

दमास्कसच्या वैभवशाली मशिदीवरून प्रेरणा घेऊन बांधलेली जामी मशीद ही मांडूतील आणखी एक भव्य वास्तू. भारतातील या एका मोठ्या मशिदीच्या बांधकामास होशांग शाह घोरी याने सुरुवात करून ते महंमद शाह खिलजी याने १९५४ मध्ये पूर्ण केले. या मशिदीचा प्रचंड आकार आणि बांधकामातील दणकट साधेपणा लक्षात राहतो.

भव्य प्रार्थनेचे दालन आणि आवार असलेल्या या मशिदीला ५८ छोटे आणि तीन मोठे घुमट असून प्रत्येक कमानीवर एक छोटा घुमट आहे. मशिदीच्या दोन्ही बाजूंना खांबांच्या रांगा असून स्त्रियांसाठी वरच्या बाजूला वेगळ्या दालनाची व्यवस्था आहे. जामी मशिदीचे सौंदर्य तिच्या मुख्य दरवाजासमोर असलेल्या अश्रफी महालातून जास्त चांगल्या प्रकारे दिसते.

हा अश्रफी महाल होशांग शाहचा उत्तराधिकारी महंमद शाह खिलजीने बांधला. शैक्षणिक संस्थेची इमारत म्हणून बांधण्यात आलेल्या या सुवर्णमुद्रा महालाचे रुपांतर नंतर महंमद शाहच्या थडग्यात करण्यात आले. मारवाडच्या राणा कुंभावरील विजयाप्रीत्यर्थ बांधलेला सात मजली विजयस्तंभ याच महालाचे आवारात होता. फक्त प्रवेशद्वार आणि अवशेषरूपाने उरलेले थडगे असलेले मांडूतील हे सर्वांत मोठे बांधकाम घाईगर्दीतील चुकीच्या बांधणीमुळे लवकर कोसळले असावे.

गावाच्या मध्यवर्ती भागातील स्मृतिस्थळांच्या दर्शनानंतर उदरभरणासाठी थोडा वेळ देण्यात आला. जवळच असलेल्या एक-दोन छोट्या हॉटेलसपैकी एकात कसे तरी उदरभरण करून परत भटकंती सुरू झाली.

मांडूतील शाही वास्तूंच्या परिसरातील सर्वाकर्षक आहे–जहाजमहाल. मुंज आणि कपूर या दोन कृत्रिम तलावांमधील अरुंद पट्टीवर उभा असलेला हा दोन मजली जहाजमहाल घियासुद्दिन खिलजीने आपल्या भल्यामोठ्या जनानखान्यासाठी बांधला असावा. असं म्हणतात की, या महालातील नोकरवर्गातही सर्व स्त्रियाच होत्या. प्रशस्त खुले मंडप, घुमट, पाण्यावर पुढे आलेले सज्जे, गच्च्या यांनी सजलेला जहाजमहाल म्हणजे राजे लोकांना आपण जणू जहाजातून सफर करत आहोत असा आभास करविणारी दगडातील कल्पित निर्मिती. याचे सर्व बांधकामच नाजूक आणि हवेशीर आहे. महालाशेजारच्या तळ्यातील संथ पाण्यात पडलेले त्याचे प्रतिबिंब पाहून एखादे जहाज संथपणे चालले असल्याचा भास होतो. यंदा मात्र दुष्काळामुळे तलावात विशेष पाणीच नसल्याने आम्हाला मात्र नुसत्या कल्पनेवरच समाधान मानावे लागले.

खास मुलाखती, भेटीगाठींसाठी घियासुद्दिन खिलजीने हिंदोळा महालाची निर्मिती केली. हिंदोळा महालाच्या कडेच्या भिंती तिरक्या, उतरत्या असल्याने एखादा झोपाळाच बांधल्यासारखा वाटतो. या महालाचे छत वीजेमुळे पडलेले असून आतील भिंतींवर कोरलेल्या मूर्तींची मोडतोड केलेली आढळते. हिंदोळा महलाला पाया नाही असं म्हणतात. याच्या उत्तरेकडील इंग्रजीतील 'टी' अक्षराच्या आकाराचा पुढे आलेला भाग नंतर बांधला गेला असावा. या भागाचा वरचा मजला फक्त स्त्रियांच्या वापरासाठी होता.

हिंदोळा महालाच्या पश्चिमेकडे नीट ओळखता न येण्याजोग्या परंतु पूर्वकालीन दिमाख दाखविणाऱ्या अनेक इमारती आहेत. यामधे मोठ्या श्रमकौशल्याने बांधलेली विहीर—चम्पा बावडी मुंज तलावाच्या उत्तरेकडील काठावर आहे. चाफ्याच्या पाकळ्यांच्या आकाराच्या कमानी असलेली ही विहीर भुयारी मार्गांनी तळघरातील खोल्यांना जोडण्यात आलेली असल्याने तलाव आणि विहिरीवरून येणाऱ्या थंड वाऱ्यांमुळे कडक उन्हाळ्यातही आतील खोल्या थंड रहात असत. असं म्हणतात की, शत्रूपासून बचाव करायचा झाल्यास राजघराण्यातील स्त्रिया या विहिरीत उड्या घेत. शत्रूला वाटे त्यांनी विहिरीत जीव देऊन आत्महत्या केली पण त्या मात्र विहिरीतील गुप्त भुयारी मार्गांनी आपल्या महाली पोचलेल्या असत.

नवेली महाल, दिलावरखानची मशीद, नहार झरोका (टायगर बाल्कनी), इत्यादी या भागातील इतर काही भेट देण्यासाठीच्या जागा. विविध ऐतिहासिक स्मृतिस्थळांखेरीज मांडूचं आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे तेथील सुमधुर सिताफळे.

संध्याछायेबरोबर वरून पाऊसही भुरभुरू लागला. त्या भुरभुरत्या पावसातील मांडूचं आणखी ताजंतवानं झालेलं रूप वेड लावणारं होतं. येथील पुरातन वास्तूंशी थोड्या सावकाशीनं गप्पा-गोष्टी करण्यासाठी थांबावं आणि या आकर्षक परिसरात रमत-गमत मनमुराद भटकावं असं फार वाटत होतं. पण कंडक्टेड टूरबरोबर आल्यामुळे हे कसं शक्य व्हावं ! पाठीवर बिऱ्हाड घेऊन हिंडणाऱ्या आमच्या बसमधील नेंदर-

लँडस्च्या दोन परदेशी मुली मात्र काहीही विचार न करता पटकन् उतरूनही गेल्या. त्यांना सायकलवरून भटकून मांडूचा जीवनानंद लुटायचा होता. आणि आम्ही...सिताफळांची मधुर चव तोंडात घोळवत या आनंदनगरीचं मोहक रूप डोळयात साठवत इंदौरच्या वाटेला लागलो.

• • •

## ४. अवन्तिकानगरी–उज्जैन

मोठ्या प्रवासात बरेचदा वेळप्रसंग पाहून आधी ठरविलेला प्रवासमार्ग बदलावा लागतो खरा; परंतु कुठलाही प्रवासमार्ग न आखता किंवा रिझर्व्हेशन्स न करता लांबच्या प्रवासाला घराबाहेर पडलेले लोक–तेही म्हातारे-कोतारे पाहिले की आश्चर्य वाटतं. आताही बसमधे असाच ५–६ जणांचा ग्रुप चढला. दोन परदेशी मुली उतरल्याने थोडी जागा झाली होती. सामानसुमान घेऊन हे लोक मांडूपर्यंत कसे आले होते कोण जाणे? ड्रायव्हरशेजारच्या जागेत कसंतरी जमवून घेतलं त्यांनी. पण पावसामुळे बस काही ठिकाणी गळत होती. त्यांच्यापैकी एका आजोबांच्या डोक्यावर सतत अभिषेक होत होता. इंदौरला आलो तो पाऊस कोसळत होता. त्या लोकांनी कुठल्याशा धर्मशाळेजवळ उतरायला सांगितलं असल्याने कंडक्टरने त्यांना भर पावसात एका चौकात उतरविलं. जवळपास एखादं झाडसुद्धा नव्हतं. एवढ्या पावसात सामानाचं ओझं घेऊन तो उतारवयीन हौशी पर्यटकांचा चमू कोणाच्या आश्रयाला जाणार होता?

मुसळधार पावसामुळे सर्वच ट्रीपवर पाणी पडतंय की काय या काळजीत मोठ्या मुष्किलीने रिक्षा मिळवून हॉटेल गाठलं. सुदैवाने रात्री पाऊस थांबला आणि दुसरे दिवशी स्वच्छ सूर्यप्रकाश पडला.

राज्यसरकारी बसने सकाळीच उज्जैनीची (५३ कि. मी) वाट

धरली. एवढ्या सकाळीही गरम दूध, जिलेबी खाण्यासाठी खवय्यांनी दुकानात गर्दी केली होती.

पुराणात अवन्तिका म्हणून उल्लेखिली गेलेली नगरी म्हणजे आजची उज्जैनी. शिव देवांनी त्रिपुरी नावाच्या राक्षसावर मिळविलेल्या विजयानंतर अवन्तिकेचे उज्जैनी (म्हणजे अभिमानास्पद विजयश्री) असे नामकरण झाले. एके काळच्या या वैभवशाली नगरीवर शक, गुप्त, परमार, मोगल, मराठा यांसारख्या अनेक राजघराण्यांनी राज्य केले. सम्राट अशोकाच्या मुलाचा जन्म येथेच झाला. येथूनच त्यांनी धर्मप्रसाराला प्रारंभ केला असावा. त्यानंतर विक्रमादित्याची उज्जैनी हीच राजधानी होती. त्याच्याच दरबारातील नवरत्नांपैकी एक म्हणजे संस्कृत नाटककार महाकवी कालीदास यांनी आपल्या काव्याचा काही भाग उज्जैनीतच लिहिला. गुप्त काळ म्हणजे सुवर्णकाळ. त्यावेळी उज्जैनी म्हणजे व्यापार–उद्योग आणि विद्येचे मोठे केंद्र होते. ९ व्या आणि १० व्या शतकांत परमारांची हीच राजधानी होती. इ. स. १२३५ मध्ये इल्तुमिशने उज्जैनीचा पाडाव केल्यानंतरची ५०० वर्षे उज्जैन मुस्लीम अधिपत्याखाली होते. असे असूनही उज्जैनच्या धार्मिक स्थानात काही फरक पडला नाही. सन १७५० मध्ये ते शिंदे राजघराण्याकडे गेले आणि १८८० पर्यंत त्यांची राजधानी राहिले. शूर राज्यकर्ते आणि गाढे विद्वान व्यासंगी यांनी आपल्या कारकीर्दीच्या ठेवलेल्या अनेक खुणा या नगरीत आढळतात.

आज उज्जैन मुख्यत: प्रसिद्ध आहे ते तीर्थक्षेत्र म्हणून. येथील मोक्षदायिनी क्षिप्रा नदीत स्नान करण्यासाठी देशाच्या कानाकोपऱ्यातून हजारो भाविक वर्षभर येत असतात. दर बारा वर्षांनी एकदा क्षिप्रेच्या रम्य, भव्य घाटांवर कुंभमेळा भरतो. कुंभमेळ्यांची सुरुवात कशी झाली असावी याची आख्यायिका अशी सांगण्यात येते.

अनेक युगांपूर्वी देव मानवासारखे मर्त्य होते. त्या काळी त्यांचे असुरांशी बराच काळ युद्ध झाले. परंतु कोणीच कोणाचा पराभव पत्करू शकले नाही. यानंतर असे कळले की समुद्राच्या तळाशी एक कुंभ असून त्यात असलेले अमृत जो कोणी प्राशन करील तो अमर होईल. देव आणि राक्षसांमध्ये तात्कालिक तह होऊन त्यांनी प्रचंड सागरातून

हा कुंभ बाहेर काढण्यासाठी सर्व शक्ती एकत्रित केल्या.

देव–दानवांनी रवी म्हणून एक प्रचंड पर्वतच समुद्रात टाकला. या पर्वताच्या रवीला दोऱ्या म्हणून मोठ्ठा साप लावण्यात आला. सापाचे तोंड आणि शेपूट धरून पर्वताच्या सहाय्याने अवाढव्य सागर घुसळण्यात आला. काही काळाच्या परिश्रमानंतर ताकातून लोणी निघावे तशा चौदा मौल्यवान वस्तू समुद्राच्या पोटातून बाहेर आल्या. यातील शेवटची होती अमृत असलेला सुवर्णकलश.

देव आणि राक्षस दोघंही त्या कुंभामागे धावले. देवपुत्र जयंत याने त्या कुंभावर तावा मिळवून तो पळत सुटला. दानव त्याचा पाठलाग करू लागले. पाठलागाच्या बारा दिवसांत हा कलश एकाच्या हातातून दुसऱ्याकडे जात होता. शेवटी देव त्यातील अमृत पिऊन अमर होण्यात यशस्वी झाले.

पाठलागाचे हे बारा दिवस म्हणजे पृथ्वीवरची बारा वर्षे. पाठलागाच्या बारा दिवसांत कलशातील काही अमृतकण उज्जैन, हरिद्वार, अलाहाबाद आणि नाशिक या चार जागी पडले. या घटनेची स्मृती म्हणून वरील प्रत्येक ठिकाणी वर्तुळाकार मार्गाने दर बारा वर्षांनी कुंभ मेळा भरतो. म्हणजे दर तीन वर्षांतून एकदा वरीलपैकी एका ठिकाणी कुंभ मेळा असतो.

दीड एक तासात उज्जैनीला पोचताच प्रथम गेलो ते बारा ज्योतिर्लिंगांपैकी एक असलेल्या महाकालेश्वरच्या दर्शनाला. या महाकालेश्वरचे प्राचीन मंदीर मुस्लीम शासकांनी तोडले. वर्तमान मंदिराचे निर्माण कार्य ग्वाल्हेरच्या शिंदे घराण्याचे पहिले राजे राणोजी शिंदे यांचे एक मंत्री रामचंद्र शेणावी यांजकडून केले गेले. महाकालेश्वर मंदिराचे तीन खंड असून सर्वांत खालच्या भागात महाकालची पिंड आहे. त्यावर ओंकारेश्वर आणि सगळ्यात वरती नागचंद्रेश्वराची शिवलिंगे आहेत. देवळासमोरील कुंडात पाय धुऊन महाकालेश्वरचे दर्शन घेण्यासाठी भाविकांची रांग लागली होती. येथे तसे वर्षभर यात्रेकरू येतच असले तरी त्यांचा ओघ वाढतो तो सिंहस्थ पर्व, श्रावणी सोमवार, सोमवती अमावस्या या दिवसांत.

महाकाल मंदिराच्या पश्चिम दरवाजाने निघताच श्री बडे गणेशाचे

मंदीर लागते. त्यांच्याबरोबर ऋद्धि–सिद्धी देवींच्या मूर्ती असून देवळाच्या मध्यभागी पंचमुखी हनुमान आहे.

जुन्या महाकाल मंदिराच्या पूर्वेस रुद्रसागर नावाचा मोठा तलाव होता. आजकाल तो वाळला असून त्याच्या पश्चिम तटावर हरसिद्धी देवीचे मंदीर आहे. हरसिद्धी देवीच्या वर अन्नपूर्णादेवी आणि खाली महाकालीची मूर्ती आहे. समोरच असलेल्या वडाच्या झाडाखालील तळघरात महाकाली आणि लहामाया यांच्या मूर्ती असून तेथे अखंड ज्योत जळत असते. या मंदिरात दोन उंच दीपस्तंभ असून त्यावर नवरात्रात दीपमाला लावल्या जातात. या ठिकाणी भगवान हर (शंकर) यांना सिद्धी प्राप्त झाली होती असं म्हणतात. सम्राट विक्रमादित्याची हरसिद्धी हीच आराध्यदेवी होती. या मंदिराजवळ विक्रमादित्यांची मूर्ती पहायला मिळते. त्यांनी सुरू केलेला विक्रम संवत् आजही प्रचलित आहे.

उज्जैन शहरापासून सुमारे तीन कि. मी. दूर गढकालिका नावाच्या जागी महाकवी कालिदासांची कुलदेवता महाकालीचे देऊळ लागते. राजा हर्षवर्धनने ७ व्या शतकात या मंदिराचे नूतनीकरण केले होते. परमारांच्या काळात याची पुनर्स्थापना करण्यात आली. लंकेवर विजय मिळवून अयोध्येस परततेवेळी श्रीरामांचे पुष्पक विमान थोड्या वेळासाठी येथे थांबले होते अशी वदंता आहे. कालिका मंदिराच्या गर्भगृहात महाकालीची उग्र मूर्ती असून जवळच चामुंडा देवी आणि गिरीरुद्रची पिंड आहे. या भागात खोदकाम केल्यावर पुरातन अवंतिका नगरीचे बरेच अवशेष सापडले.

कालिका मंदिराजवळ क्षिप्रेच्या रम्य तटावरील उंचवटयावर विक्रमादित्यांचे वडील बंधू, गाढे विद्वान व्यासंगी कवी भर्तृहरी यांची गुंफा आहे. त्यांनी विक्रमादित्यांना राज्याभिषेक केला आणि स्वत: वैराग्य धारण करून या गुहेत तपस्या, योगसाधना केली. दारातच विक्रमाच्या वेताळाची मूर्ती दिसते. ही गुंफा आतून मोठी पण अंधारी असल्याने नुसते आतमध्ये गेल्यास मिट्ट काळोखाशिवाय काहीही दिसत नाही. दोन रुपये दिले असता तेथे वास्तव्य करणारे साधू रॉकेलच्या दिव्याच्या प्रकाशात आत नेऊन आणतात. भर्तृहरींच्या धुनीचा वरचा एक दगड

तुटलेला असून त्या दगडास आपल्या योग सामर्थ्याने त्यांनी खाली पडू दिले नाही अशी वदंता आहे. येथून काशीला जाण्यासाठीचा भुयारी मार्ग असल्याचे म्हटले जाते. सध्या तो दगड लावून बंद करण्यात आलेला आहे.

रम्य क्षिप्रा काठ आणखीन रमणीय होतो तो मंगलनाथ महादेवाच्या देवळापाशी. नितांतसुंदर हिरव्यागार वनश्रीतून बाकदार वळण घेत संथपणे वाहणाऱ्या क्षिप्रेवरील येथील घाट अतिशय शांत, प्रसन्न, मनोरम आहे. स्कंद पुराणानुसार मंगळाची व्युत्पत्ती याच ठिकाणी झाली. भारतीय खगोल शास्त्रवेत्त्यांच्या म्हणण्यानुसार कर्कवृत्त उज्जैनीतून जाते. आजही उज्जैनमध्ये पंचांग प्रकाशित केले जाते.

श्रीकृष्णाचे गुरु सांदिपनी ऋषींचा आश्रम उज्जैनीत बघायला मिळतो. भगवान श्रीकृष्ण आपले वडील बंधू बलराम आणि मित्र सुदामा यांच्यासमवेत या आश्रमात विद्याशिक्षणासाठी राहिले होते. जवळच गोमती कुंड असून त्यातील पाणी आश्रमाला पुरविण्यात येत असे. अजूनही उज्जैनी विद्यानगरी म्हणून ओळखली जाते.

जयपूरचे महाराजा सवाई जयसिंह (दुसरे) यांनी १७३३ मध्ये बांधलेली वेधशाळा–जंतरमंतर–उज्जैनच्या दक्षिण भागात असून त्यातील संयंत्रे आजही उपयोगात आणली जातात.

सबंध उज्जैनच अनेक लहानमोठ्या मंदिरांनी व्यापून गेलंय. गोपाळ मंदिर, क्षिप्रेतील त्रिवेणी संगम घाटावरील नवग्रह मंदिर, शनिमंदिर, चिंतामण गणपती, संतोषी माता ही त्यांतील काही उल्लेखनीय. उज्जैनच्या मंदिरातून भिकारी विशेष न दिसल्याने ती जास्त भावतात.

विक्रम कीर्ति मंदिर या सम्राट विक्रमादित्यांचे स्मृतीप्रीत्यर्थ बांधण्यात आलेल्या सांस्कृतिक केंद्रात पुराणवस्तू संग्रहालय व आर्ट गॅलरी आहे.

उज्जैनचा कालभैरव म्हणजे एक चमत्कारिक देवस्थान. कालभैरव म्हणजे नगरीचा रक्षणकर्ता, कोतवाल. या कालभैरवाला फक्त दारुचाच भोग चालतो. प्रसाद म्हणूनही दारूच देण्यात येते. मदिरेने भरलेले दारूचे भांडे मूर्तीच्या तोंडाला लावताच ते लगेच रिकामे होते अशी आख्यायिका ऐकल्याने मुद्दाम कालभैरवाचे देऊळ पहायला गेलो.

एका भक्ताचा नुकताच भोग लावून झाला होता. त्याच्या प्रसादाची

अर्धी बाटली समोरच होती. "आम्हाला दाखवा हा दारू पिण्याचा चमत्कार" असं तेथील पुजाऱ्याला म्हणताच ते महाशय म्हणाले, "ही बाटली आता उष्टी झाल्याने भोग लावण्यासाठी ती दारू चालणार नाही. तुम्हाला कालभैरवाच्या मदिराप्राशनाचा महान चमत्कार बघायचा असेल तर तुम्ही दुसरी दारूची बाटली आणा. यांनी आत्ता पांढरी दारू आणली होती; तुम्ही गुलाबी आणा."

दारूच्या बाटलीची किंमत सतरा रुपये. दोन किलोमीटर्सवर दुकान. जाजा-येये करण्यात वेळ आणि पैसा यांची बरबादी नको म्हणून "जाऊ दे" म्हटलं. पण मुलं कुठली ऐकायला! चमत्कार पहाण्यासाठी हटूनच बसली. त्यात पुजाऱ्याचं भुलवणं चालूच होतं. "महाजागृत देवस्थान हे. जादू-टोणा, भूत-पिशाच्च, इ. दुष्ट विद्या शिकणाऱ्यांना येथेच येऊन परीक्षा द्यावी लागते. ती उत्तीर्ण झाल्यावरच ते या विद्येचा उपयोग करू शकतात."

शेवटी रिक्षाने दारूच्या दुकानाकडे निघालो. रिक्षावाल्याने विचारले, "तुम्ही दारू पिता का?" "नाही."–आम्ही. "मीही पित नाही; मग प्रसादाच्या मिळालेल्या दारूचं काय करणार? उगाच पैसे वाया घालवू नका. हे बघा, हे फौजी दारूच आणायला गेले होते. आपण त्यांच्या पाठोपाठ जाऊ म्हणजे तुम्हाला विनाखर्चात हा भोग अनायसे पहायला मिळेल." आणि त्याने ताबडतोब रिक्षा कालभैरवाच्या देवस्थानाकडे वेगाने जाणाऱ्या त्या मिलिटरीच्या गाडीमागे वळविली.

फौजींचे कुटुंबीय त्यांची गाभाऱ्यात वाट बघत होते. गुलाबी दारूची शिशी पुढे ठेवली गेली. कडक इस्त्रीच्या गणवेषातील ते दोन ताठ, करडे सेनाधिकारी पुजाऱ्यापुढे नतमस्तक होऊन त्याच्या सांगण्यानुसार टोपी, चामड्याचा पट्टा काढते झाले. पुजाऱ्याने डोळे मिटून अनाकलनीय असं "ह्यॉंव, व्हाव्" असं काहीतरी खड्या आवाजात म्हणत आणि वेडेविद्रे अंगविक्षेप करत मंत्रोच्चारणाला प्रारंभ करून चांगलीच वातावरणनिर्मिती केली. नंतर त्याने अर्धी दारू ताटलीत ओतून ती कालभैरवाच्या तोंडाला लावली. मूर्तीवर तोंडाच्या जागी असलेली खांच स्पष्टपणे दिसत होती. त्यातून तो द्राव ताटली थोडी तिरकी करताच ताबडतोब आत गेला. मनात आलं, वर्षानुवर्षं हा कालभैरव दारू पीत

आला आहे. "मला फक्त दारूच हवी" असं हा कालभैरव कधी कोणाला सांगतो का ? एखादे वेळीही क्षिप्रेचं पवित्र जल याला का चालू नये ? कारण उरलेला अर्धा प्रसाद आम्हाला भक्तिभावाने चाखायचा असतो ना !

रिक्षाने हिंडल्यामुळे (दर ५० रु.) दोन–अडीच तासांत सर्व ठिकाणे आरामात बघून झाली. क्षिप्रेच्या काठावर थोडं निवांतपणे टेकताही आलं. दुपारचं जेवण झाल्यानंतर उज्जैनमध्ये थांबण्याचं तसं खास काही प्रयोजन न उरल्याने परतीचा रस्ता पकडला. इंदौर–उज्जैन दरम्यान दर १५–२० मिनिटांना बसेस आहेत. आत्ताची तर सुपरफास्ट होती. त्यामुळे दर थोडा जास्त असला तरी पटकन इंदौरला पोहोचलो. तसा या भागातील बसप्रवास अजिबात कंटाळवाणा होत नाही. कोणी ना कोणी मराठी भाषिक सहप्रवासी गप्पा मारायला सतत भेटत असतात. कोण, कुठले, इकडे कधी आलात, वगैरे चौकशी करताना वेळ पटकन निघून जातो. आत्ताही आठले नावाचे स्वतःचा लघुउद्योग असलेले गृहस्थ भेटले. ते पुण्याला काही दिवस असल्याने आत्मीयता जास्तच वाढली आणि मग इंदौरला उतरल्यावर त्यांनी घरी रबडी खाण्यासाठी चलण्याच्या आग्रहाला नाही कसं म्हणावं याचा संभ्रम पडला.

परंतु इंदौरमधील काही नातेवाईकांकडे जाणं अजून राहिलं असल्याने "जमलं तर अवश्य येऊ" म्हणून त्यांचा निरोप घेतला. भेटीगाठीच्या निमित्ताने जवळजवळ संपूर्ण इंदौरचा ओझरता फेरफटका झाला. इंदौरी रबडी, कुल्फी, मिठाईची चव चाखली. काही चांगल्या हॉटेल्सची मुद्दाम आत जाऊन चौकशी केली. त्यात हॉटेल 'श्रीमाया' हे मध्यवर्ती, सोयीस्कर आणि छान वाटलं. (दर डबल रूमला १६० रु. जादा बेडचे ५० रु.)

इंदौर आणि आसपासची प्रेक्षणीय स्थळे बघून झाली पण आंतरिक ओढीची एक मुख्य भेट राहिली होती ती म्हणजे सख्खे काका आणि त्यांचे कुटुंबीय रहात असलेल्या निम्बोतीग्रामच्या शेताची. आल्यापासून खांडवा रोडवर असलेल्या निम्बोतीग्रामला कसं जायचं ते अनेकांना विचारून झालं. पण नक्की कोणीच सांगू शकलं नाही. इच्छा असेल तर मार्ग सापडतो म्हणतात तसं हॉटेल 'चंद्रलोक' खाली काम करणारा

एक ट्रॅव्हल एजंट मदतीला आला आणि त्याने रात्री निम्बोतीग्रामचा बरोबर पत्ता आणून दिला. शहरापासून ८–१० कि. मी. वर असलेल्या कस्तुरबाग्रामपर्यंत टेम्पोही जात होता. तेथून निम्बोतीग्राम होते फक्त एक कि. मी. वर.

इंदौरमधील शेवटचा दिवस. रिक्षा करून निम्बोतीग्रामला निघालो. तेथील खांडेकरांचं घर–शेत सापडायला वेळ लागला नाही. अचानक आलेल्या आम्हाला पाहून तात्याकाका आश्चर्यचकितच झाले. कित्येक वर्षांनंतर भेटत होतो आम्ही. छोटचा पाहिलेल्या चुलत भावंडांना त्यांच्या छोट्यांसमवेत पाहताना भावना उचंबळून आल्या. सर्वांत मोठा प्रशांत तर आता गावचा सरपंच झाला होता. " चार दिवस इंदौरमधे राहूनही आत्ता येतोय, तेही असे धावत–पळत ! " काकांचा दुरावा दूर करून शेतावर गेलो. आम्हा शहरवासीयांना शेतावरचं मोकळं वातावरण फार आवडलं. निरंजनला तर शेळयांच्या कळपात, पागोटं बांधून नांगरावर, म्हशीच्या पाठीवर, कशा कशावर बसून फोटो काढून घेऊ असं होऊन गेलं. रानमेवा म्हणजे ऊस होता.

शेतावर हिंडताना मुलंच काय पण आम्हीही रमून गेलो. पाय निघत नव्हता ; पण दुपारची गाडी पकडायची असल्याने जास्त वेळ थांबणं शक्य नव्हतं. त्यात रिक्षालाही थांबवून धरले होते. तरीही तेवढ्या थोडचा वेळात भावजयांनी शिरापुरीचं जेवण तयार केलं. शेत सोडताना आजोबांनी जमिनीच्या केलेल्या कुशल पारखाबद्दल आदराने नतमस्तक झालो. त्यांनी अशी काही जमीन निवडली होती, की दुष्काळामुळे आसपासच्या सर्व विहिरी कोरडचा पडल्या होत्या, पण आमच्या दोन्ही विहिरींना मात्र भरपूर पाणी होतं. इंदौरजवळ असल्याने आज ही जमीन म्हणजे सोन्याचा तुकडा झाली आहे. चुलत भावंडं आपल्या निढळाच्या घामाने वाडवडिलांकडून मिळालेल्या या भेटीचं चीज करताहेत हे पाहून समाधान वाटलं.

• • •

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे
संदर्भ शाखा (स्थळ प्रत)

## ५. राजधानी भोपाळ–सांची, विदिशा, भोजपूर

दुपारी सव्वातीनच्या माळवा एक्सप्रेसने भोपाळला जाण्यासाठी इंदौर सोडलं. आजोबांच्या कर्मभूमीला आणि वडिलांच्या जन्मगावाला रामराम करताना एक रुखरुख मात्र मनाला लागून राहिली होती. ती म्हणजे अतिशय आडवळणी असल्याने खांडेकरांच्या मूळ गावाला–पंथ पिपलोधाला जाऊ शकलो नाही याची.

रात्री ९ वाजता भोपाळ आलं. मध्यप्रदेशची ही राजधानी. भोपाळ म्हणताच अजूनही एकदम आठवते ती चार वर्षांपूर्वी प्रचंड हाःहाकार माजवलेली, हजारो जीवांचा बळी घेतलेली वायुगळतीची दुर्घटना. ही घटना घडलेला युनियन कार्बाईड कंपनीचा कारखाना रेल्वे स्टेशन-जवळच आहे.

भोपाळला जाणाऱ्यांनी एक नोंद करून ठेवण्यासारखी गोष्ट म्हणजे भोपाळ रेल्वे स्टेशनच्या मुख्य दरवाजासमोर अजिबात हॉटेल्स नाहीत. त्यामुळे ओव्हरब्रीज ओलांडून मोठा वळसा घालून हॉटेल शोधण्यासाठी विजयला तासाहून अधिक वेळ लागला. तोपर्यंत आम्ही फलाटावर अधांतरी अवस्थेत ताटकळत उभे. क्लोजसर्किट टी. व्ही. चालू होता, पण “ येवढा वेळ का लागला ” या काळजीने लक्ष कुठलं लागायला !

मात्र भोपाळ रेल्वे स्टेशनवरील मागच्या छोटया दरवाजातून बाहेर पडल्यास ही हॉटेल्स जवळ पडतात. हमिदिया रोड हा भोपाळमधील

हमरस्ता. याच रस्त्यावरील हॉटेल राजदूतला निवडले. (दर–तीन बेडस्‌साठी १४० रु. टी. व्ही. सकट). सामान–सुमान लावेपर्यंत साडेदहा वाजून गेले.

राजा भोजने ११ व्या शतकात वसविलेल्या भोजपाल गावाच्या जागी भोपाळ उभे असून आजच्या नगरीचा पाया द्रव्यलोभी धाडसी योद्धा दोस्त महंमद खान याने १८ व्या शतकाच्या सुरुवातीस घातला. इंदौरसारखंच खुद्द भोपाळमध्ये विशेष काही बघण्यासारखं नाही. पण भोपाळला जाण्याचं मुख्य आकर्षण म्हणजे तेथून ४५ कि. मी. वर असलेले सांची हे बौद्धधर्मीयांचे अत्यंत पवित्र तीर्थस्थान. भोपाळहून दर अर्ध्या–पाऊण तासाने सांचीसाठी बसेस आहेत. रेल्वेनेही सोयीस्कर रीत्या सांचीला जाता येते.

हॉटेल राजदूत बस–स्टँडजवळ असल्याने दुसरे दिवशी सकाळची सांचीसाठीची बस पकडली. तेथील बस–स्टँड किंवा रेल्वे स्टेशनपासून चालत जाता येण्यासारख्या अंतरावरील एका रम्य टेकडीवर या बौद्ध-धर्मीयांच्या पुरातन वास्तू विखुरलेल्या आहेत.

इ. स. पूर्व तिसऱ्या शतकात मौर्य राजा अशोकाने विदीशा–गिरीची (आजची सांचीची टेकडी) तेथील आश्रमवासियांना उपयुक्त असा एकांतवास, शांत, प्रसन्न वातावरण पाहून बौद्ध संप्रदायाची प्रतिष्ठापना करण्यासाठी निवड केली. शिवाय ही टेकडी दाट वस्तीच्या, श्रीमंत आश्रयदात्यांच्या विदीशा नगरीजवळही होती. अशोकाची पत्नी याच विदीशा नगरीतील होती. तिनेही बौद्ध धर्माचा स्वीकार केला होता. सम्राट अशोकाच्या नावाशी सांचीचं नाव निगडित आहे. त्याने येथे दगडी स्तंभ आणि विटांच्या स्तूपाची उभारणी केली. येथूनच त्याचा मुलगा महेंद्र धर्मप्रसाराकरिता सिलोनला गेला.

बुद्धाच्या पार्थिव अवशेषांवर अर्धवर्तुळाकृती पायावर बांधलेल्या, अर्धवर्तुळाकृती घुमट असलेल्या मंदिरास स्तूप म्हणतात.

ग्रेट स्तूप किंवा स्तूप नं. १ या सांचीतील सर्वांत मोठ्या (व्यास ३६.६ मी., उंची १६४ मी.) स्तूपाच्या बांधकामास सम्राट अशोकाच्या काळात सुरुवात होऊन ते नंतरच्या राज्यकर्त्यांकडून पूर्ण केले गेले. या स्तूपाभोवती नक्षीदार कठडा असून आत जाण्यासाठी चार दिशांना

चार अशी अप्रतिम कोरीव कारागिरीची, तोरणासारख्या कमानी असलेली भव्य प्रवेशद्वारे आहेत. इ. स. पूर्व पहिल्या शतकातील ही प्रवेशद्वारे अत्यंत कलात्मक असून त्यावर पशू, पक्षी, झाडे, इ. आकृत्या, निसर्गदृष्ये, जातककथांतील प्रसंग; बुद्ध, अशोक यांच्या जीवनांतील घटना, बौद्ध धर्माच्या इतिहासाशी संलग्न विषय इ. कोरलेले दिसतात.

या मुख्य स्तूपाच्या चार दरवाजांपैकी उत्तरेकडील दरवाजा हा प्रमुख. अजूनही चांगल्या स्थितीत जतन झालेल्या या प्रवेशद्वारावर बौद्ध धर्मचक्राबरोबर जातककथांमधील बुद्धासंबंधीच्या अनेक अद्‌भुत, अलौकिक गोष्टी दाखविण्यात आलेल्या आहेत. दक्षिणेकडील प्रवेशद्वारावर गौतमाच्या जन्माख्यायिका अप्रतिमरीत्या कोरण्यात आलेल्या आहेत. पूर्वेकडील प्रवेशद्वारावर तरुण राजकुमार गौतम सत्याच्या शोधार्थ वडिलांचा राजप्रासाद सोडताना दिसतो तर पश्चिमेकडील प्रवेशद्वार भगवान बुद्धाच्या सात अवतारांनी चित्रित झालेले आढळते.

बौद्ध धर्माच्या इतिहासात बुद्धाला मानवरूप न देता त्याचे अस्तित्व प्रतीकात्मकरीत्या दाखविण्यात येते. त्यामुळे एकाही प्रवेशद्वारावर भगवान बुद्धाची प्रतिमा आढळत नाही. त्याची उपस्थिती प्रतिकांतून समजते. जसे कमळ हे बुद्धजन्माचे, पिंपळाचे झाड बोधगयेला साक्षात्कार झाल्याचे, तर स्तूप हे भगवान बुद्धाच्या महानिर्वाणाचे प्रतीक दर्शवितात. काही ठिकाणी पावलांचे ठसे, सिंहासन यांच्या रूपांनी बुद्धाचे अस्तित्व दाखविले जाते.

सुंग काळात (इ. स. पू. २ रे शतक) अशोकाने बांधलेल्या वीटांच्या स्तूपाला दगडांनी आच्छादित करण्यात येऊन त्याचा विस्तार करण्यात आला. त्याच्याभोवताली कठडाही बांधण्यात आला. शातवाहनांच्या काळात (इ. स. पू. १ ले शतक) स्तूप नं. १ च्या भोवतालचे चार भव्य दरवाजे आणि स्तूप नं. ३ चे प्रवेशद्वार उभारण्यात आले. त्यानंतरच्या क्षत्रापच्या काळात बांधकामाची प्रक्रिया मंदावलेली दिसते. मथुरेहून आणवलेल्या बुद्धाच्या चार मूर्ती स्तूप नं. १ च्या चार दरवाजांकडे तोंड करून ५ व्या शतकात बसविण्यात आल्या. मंदिर नं. १७ आणि इतर काही इमारती ही गुप्त काळची भेट म्हणता येईल. बुद्धाच्या अनेक मूर्तींची आणि मंदिर नं. १८ ची उभारणी ७ व्या आणि ८ व्या शतकांत

केली गेली. अनेक मंदिरे आणि बौद्धविहार मध्ययुगकाळातील प्रतिहार आणि परमार राज्यकर्त्यांच्या माळव्यावरील भरभराटीच्या काळात बांधण्यात आले. यांपैकी ४५ नंबरचे मंदिर त्याचा आकार आणि शोभादायकतेसाठी खास उल्लेखनीय आहे.

ग्रेट स्तूपापासून अर्ध्या किलोमीटरवरील एका डोंगरकड्यावर इ. स. पू. दुसऱ्या शतकातील स्तूप नं. २ उभा असून त्याच्या भोवतालचा नक्षीदार कठडा अजूनही सुस्थितीत जतन झालेला आहे.

स्तूप नं. ३ ग्रेट स्तूपाजवळ असून त्याचे बांधकाम इ. स. पू. १५०–१४० च्या दरम्यान झाले. या स्तूपामध्ये भगवान बुद्धाचे पहिले दोन शिष्य सारीपुत्र आणि महामोगालेन यांचे प्रेतावशेष सापडले. त्यांच्या या अस्थी अलीकडेच बांधलेल्या जामो बौद्ध मंदिराच्या तळघरातील काचेच्या पेटीत जतन करून ठेवलेल्या आहेत. दरवर्षी २९ नोव्हेंबरला त्या आमजनतेला दर्शनासाठी ठेवल्या जातात.

ग्रेट स्तूपाच्या दक्षिणेकडील प्रवेशद्वाराजवळील इ. स. पू. तिसऱ्या शतकातील १३ मीटर्स उंचीचा, वर चौमुखी सिंह असलेला गुळगुळीत अशोक स्तंभ लक्ष वेधून घेतो. या अशोक स्तंभावर ब्राह्मी अक्षरांत दीक्षा घेतलेल्या बौद्धांनी मतभेद टाळावेत अशा आशयाचा आज्ञावजा मजकूर कोरण्यात आलेला आहे. सम्राट अशोकाने असे तीस स्तंभ भारतभर उभे केले, त्यांपैकी दहा आज अस्तित्वात आहेत.

सम्राट अशोकाने येथे अनेक मठही बांधले. बौद्ध विहारांचे अनेक अवशेष येथे दिसतात. ११ व्या शतकापर्यंत या ठिकाणी बौद्ध भिक्षू रहात. आता सांचीच्या टेकडीचा सर्व परिसर पुरातत्व संशोधन खात्याच्या ताब्यात असून तो सूर्योदय ते सूर्यास्त या वेळात सामान्य-जनांना पहाता येतो. टेकडीच्या पायथ्याशी भारतीय पुरातत्त्व संशोधन खात्याचे एक संग्रहालयही असून ते १० ते ५ उघडे असते.

सांचीला गेलं असता तेथून फक्त १२ कि. मी. वरील विदीशाला जाऊन येणं अगदी सहज शक्य होतं. भारतातील काही महत्त्वाच्या प्राचीन गावांपैकी एक म्हणजे विदीशा किंवा बेसनगर. शुंगांची एके-काळची पश्चिमेकडील साम्राज्याची वैभवसंपन्न राजधानी आणि ५ व्या व ६ व्या शतकांतील एक व्यापारउद्योगाने भरभराटीला आलेले ठिकाण.

येथील पुरातन वास्तू त्या शिल्पकाळातील शास्त्रविषयक प्रगतीवर प्रकाश टाकतात. विदीशा नगरीत शिरताच लागतो नानासाहेब पेशवा मार्ग. गावापासून चार कि. मी. वरील एका टेकडीतील सँडस्टोनच्या दगडात खोदलेल्या उदयगिरी गुंफा हे विदीशाचे मुख्य प्रेक्षणीय स्थळ. तेथे जाण्यासाठी टांगे मिळतात. टांगेवाल्याने जाऊन येण्यासाठी २५ रु. घेतले.

उदयगिरी गुंफा म्हणजे इ. स. ४–५ व्या शतकात खोदण्यात आलेल्या वीस लेण्यांचा समूह. यापैकी १, १८ आणि २० क्रमांकाच्या लेण्या डोंगरमाथ्यावर असून उरलेल्या पायथ्याशी आहेत. टेकडीवर जायचं म्हणजे चांगलंच पदभ्रमण झालं. मात्र वरती गेल्यावर आसमंताचा रम्य देखावा पाहून श्रमपरिहार झाल्यासारखे वाटले. २० आणि बहुधा १ क्रमांकाच्या लेण्या जैन आणि बाकीच्या हिंदूधर्मीयांच्या असाव्यात. ५ आणि ६ नंबरच्या लेण्यांत लक्षणीय कोरीव काम आढळते. पृथ्वीदेवीला दानवांनी फितवून पळवून नेले असता वराह अवतारातील विष्णू पापी नागाधि राजाच्या डोक्यावर पाऊल ठेवून आपल्या सुळचांनी तिला सागराबाहेर काढत असल्याचे रंगीत भित्तिचित्र हे येथील सर्वोत्कृष्ट शिल्प. शेषशाही विष्णूची प्रतिमाही लक्षात राहते.

सहा, सात आणि वीस क्रमांकांच्या लेण्यांत गुप्तकालीन संस्कृत शिलालेख असून ते गुप्त संवत ८२ (इ. स. ४०१ ते ६२) आणि १०६ (इ. स. ४२५ ते २६) काळातील आहेत. यांपैकी दोनमधील सात क्रमांच्या लेण्यांत गुप्त सम्राट चंद्रगुप्त दुसरा याने या जागेला त्याच्या विजयानंतर भेट दिल्याचा आणि ही लेणी त्याच्यासमवेत असलेला त्याचा प्रधान वीरसेन याने बांधले असल्याचा उल्लेख आहे. टेकडीच्या माथ्यावरील उत्तरेकडील अर्ध्या भागात एका मंदिराचे अवशेष आढळतात. महाराजा माधवराव शिंदे यांच्या काळात १९२१ साली या लेण्यांचे ग्वाल्हेर पुरातत्व खात्यातर्फे जतन करण्यात आले.

विदीशामधील म्युझियममध्ये बेसनगरमधील पुरातन वस्तूंचा उत्कृष्ट संग्रह पहायला मिळतो. लोघनगी रॉक, गुबाझका मकबरा, मंदिराच्या पायावर उभी असलेली बिजमंडळ मशिद, हेलिओडोरस पिलर ही

विदीशातील इतर काही भेट देण्यासाठीची ठिकाणे.

'खंबा बाबा' नावाने ओळखला जाणारा हेलिओडोरस पिलर हा एकसंध दगडाचा खांब भागभद्रच्या दरबारातील ग्रीक राजदूत हेलिओडोरस याने भगवान विष्णूच्या सन्मानासाठी इ. स. पू. ९० ते १४० काळात उभारला. अशोक स्तंभासारख्या दिसणाऱ्या या खांबावरील शिलालेखानुसार हेलिओडोरसने हिंदू धर्माचा स्वीकार केला असावा.

सांचीच्या ईशान्येकडे ४१ कि. मी. वर असलेले गायरासपूर हे मध्ययुगकालीन हिंदू वास्तुशिल्पशास्त्रकलेसाठी आणि भोपाळहून विदीशामार्गे ९० कि. मी. वर असलेले उदयपूर हे ११ व्या शतकातील परमार राजांची वास्तूशिल्पकला दर्शविणाऱ्या अवाढव्य निळकंठेश्वराच्या मंदिरासाठी प्रसिद्ध आहे.

मध्य प्रदेशची राजधानी भोपाळ हे अनेक ऐतिहासिक, सांस्कृतिकदृष्टया महत्त्वाच्या प्राचीन स्मृतिस्थळांच्या भेटीसाठी आदर्श असे गाव म्हणायला हवे. भोपाळच्या जवळपास रस्ता अगर रेल्वेने सहजतेने जाता येण्याजोग्या बऱ्याच पुरातन जागा आहेत.

भोपाळपासून ३० कि. मी.वरील भोजपूर येथे धारचा परमार राजा भोज (१०१०–९३) याने बांधलेले अतिभव्य शिवमंदिर आहे. जांभळ्या सँडस्टोनच्या दगडावरचे सुरेख नक्षीकाम असलेल्या या मंदिराला कळस नाही. पूर्वेकडील सोमनाथ म्हणून नाव मिळविलेले हे भोजेश्वर मंदिर कधीही पूर्ण होऊ शकले नाही. जर ते पूर्ण झाले असते तर 'यासम हे' म्हणण्याएवढे भव्य झाले असते. या अपूर्ण स्थितीतही १२ व्या आणि १३ व्या शतकांतील मंदिरांच्या वास्तूशिल्पकलेचा एक उत्तम नमुना म्हणून त्याच्याकडे पाहता येईल. २१.५ फूट चौरसाच्या जोत्यावरील या मंदिरातील शिवलिंग ७.५ फूट उंचीचे आणि १७.८ फूटांचा परीघ असलेले आहे.

भोजेश्वर मंदिराच्या जवळ असेच अपूर्णावस्थेत असलेले जैनांचे एक तीर्थस्थान आहे. येथील तीन प्रतिमांपैकी एक २० फूट उंचीची भव्य मूर्ती महावीराची असून उरलेल्या दोन पार्श्वनाथाच्या आहेत. या मंदिराच्या बांधकामाचा काळही भोजेश्वर मंदिराच्या काळातीलच असावा.

भोजपूरच्या पश्चिमेकडे एके काळी विस्तीर्ण सरोवर होते. आता

जुन्या प्रचंड धरणाचे काही अवशेष सोडल्यास तेथे काही नाही. या धरणाच्या जागेची निवड मोठ्या कौशल्याने केलेली दिसते. दोन मधल्या जागा वगळता सर्व बाजूंनी डोंगराच्या नैसर्गिक भितींनी ही जागा बंदिस्त होती. या सरोवरात २५० चौ. मैल पाणी साठविण्याची क्षमता होती. धरण बांधणीचे काम राजा भोजने केल्याचे मानण्यात येत असले तरी ते त्यापूर्वीचेही असावे. या अवाढव्य सरोवराचा नाश माळव्याच्या होशांग शाहने (१४०५–३४) केला. गोंड आख्यायिकांनुसार त्याच्या सैन्याला धरणाची भित फोडण्यासाठी तीन महिने लागले. धरणाचा तलाव पूर्ण रिकामा होण्यासाठी तीन वर्षे लागली; आणि नंतरची तीस वर्षं हा पट्टा वस्ती करण्यासाठी अयोग्य होता. असं म्हणतात की पाण्याचा प्रचंड साठा नष्ट झाल्यामुळे माळव्याच्या हवामानातही खूप बदल झाला.

विंध्य पर्वताच्या उत्तरेकडील कडांनी वेढलेले भीमबेटका गाव भोपाळच्या दक्षिणेकडे ४० कि. मी. वर येते. या डोंगराळ प्रदेशातील दाट जंगल आणि खडकाळ सुळक्यांच्या भागात अलीकडेच ७०० च्या वर अतिप्राचीन दगडी गुहांचा शोध लागला. येथील ५०० च्या वरील गुहांतील छत, भितींवरील रंगीत देखावे या गुहांमधून वास्तव्य करणाऱ्या इतिहासपूर्व मानवी आयुष्याचे चित्र रेखाटतात. प्रामुख्याने लाल, पांढरी आणि क्वचित् हिरवी, पिवळी रंगसंगती असलेल्या या देखाव्यांतून नाचगाणी, शिकार, प्राण्यांच्या झुंजी, घोडे, हत्तीस्वार युद्ध यांसारखे दैनंदिन जीवनातील प्रसंग चित्रित केले असून, त्यातील काही भित्तीचित्रे पाषाणयुगकालीन आहेत. भीमबेटका समूह म्हणजे पुरातत्त्वशास्त्राच्या दृष्टीने मानवी इतिहासाची जणू एक अमूल्य बखरच.

जुनं भोपाळ तसं अगदी घाणेरडं गाव. उघडी गटारे, अरुंद रस्ते, खेटून उभी असलेली जुनाट घरे, बाजाराचा गजबजाट. या भागात ऐतिहासिक मशिदी, काळाच्या पडद्याआड गेलेल्या राज्यकर्त्यांच्या खुणा बाळगणाऱ्या हवेल्या आहेत. यामध्ये भोपाळवर १८१९ ते १९२६ पर्यंत एकापाठोपाठ एक राज्य केलेल्या तीन बेगमांनी बांधविलेल्या वास्तूंचा प्रामुख्याने समावेश करावा लागेल. कुडसिया बेगम हिने १८३७ मध्ये जामा मशिद आणि तिची मुलगी सिकंदर जहाँ हिने १८६० मध्ये मोती

मशिद बांधली. हिंदुस्थानातील सर्वांत मोठी म्हणून गणना होणाऱ्या ताज–उल मशिदीच्या बांधकामास सिकंदर जहाँबेगमची मुलगी शहाजहाँबेगम हिने सुरुवात करून तिच्या मृत्यूनंतर ते पूर्ण करण्यात आले. पोस्ट सेवा, पाण्याची सेवा सुरू करण्याचे श्रेय भोपाळच्या या आठव्या राणीकडे जाते. शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी असलेल्या ‘ चौक ’ भागात शौकत महाल, सदर मंझिल, यासारख्या पूर्वकालीन वास्तू आहेत.

जुन्या भोपाळच्या दर्शनानं मुरडलेलं नाक सरळ झालं ते कमुआत्याकडे जाण्यासाठी आरेरा कॉलनीकडे जाणाऱ्या रस्त्याला लागल्यावर. मध्यभागी लावलेल्या झाडांनी दुभागलेले स्वच्छ, सुंदर रस्ते, मोठमोठे बगीचे, हिरवळी यांनी व्यापलेला भोपाळचा हा नवीन वसाहतींचा सुरेख भाग.

आखीव वसाहतीमुळे आरेरा कॉलनीतील कमुआत्याचे घर शोधायला वेळ लागला नाही. दिवाळीची सुट्टी म्हणून कमुअत्या घरीच होती. गावापासून हा भाग सुमारे १० कि. मी. दूर. म्हणून तिने खूप आग्रह करूनही तिच्याकडे उतरता आलं नाही; याबद्दल दिलगिरी व्यक्त करून दिवाळीच्या स्वादिष्ट फराळाच्या पदार्थांवर ताव मारला.

भोपाळचं हे रेखीव रूप आणखीन्‌च मोहक होतं, ते निळचाशार मोठ्या तलावापाशी आल्यावर. अपर / ग्रेट लेक किंवा बडा तालाब आणि लोअर लेक किंवा छोटा तालाब या ओव्हरब्रीजने एकमेकांना जोडलेल्या दोन रमणीय तलावांनी भोपाळवर सौंदर्याचा साज चढविला आहे.

सहा चौरस क्षेत्रफळात पसरलेले मोठ्या तलावाचे संथ नितळ, निळं पाणी, किनाऱ्यावरील टुमदार घरांची झालर, पायपिनीसारखा तलावाच्या कडेनी जाणारा रस्ता. मोकळ्या वेळी निवांतपणे बसावे अशी अतिव सुंदर जागा. जवळील शामला आणि इदगाह या टेकड्यांवरून शहराचा रमणीय देखावा दिसतो. सूर्यास्ताच्या वेळी तर या सरोवराचे दृश्य फारच मनोरम असते. अंधारानंतर या तलावातील संथ पाण्यात आसमंतातील हजारो दिव्यांचे पडलेले प्रतिबिंब परीराज्याचा आभास निर्माण करते. भोपाळ पहावं तर रात्रीच.

मोठ्या तलावाकाठच्या एका टेकडीवरील ४४५ हेक्टर्सच्या निसर्गरम्य परिसरात पसरलेला ‘ वनविहार ’ हे भोपाळमधील सहलीसाठी

अत्युत्तम म्हणावं असं स्थळ. नैसर्गिक रम्य वातावरणात येथे अनेक प्रकारचे वन्य प्राणी बघायला मिळतात. (दर मंगळवारी बंद).

बडा तालाबजवळील आणखी एका टेकडीवर 'भारत भवन' ही कलेला वाहिलेली प्रेक्षणीय संस्था आहे. सुप्रसिद्ध वास्तुशिल्पकार चार्लस् कोरिआ याने काढलेल्या आराखड्यानुसार बांधलेल्या या संस्थेत भारतीय ललित लोककला; शास्त्रीय, लोकसंगीत यांचे संग्रहालय, तसेच आदिवासीकला दालन पहायला मिळते. कलावंत मनाला तृप्त करणारी भारत भवन ही कलाकेंद्रित संस्था मध्यप्रदेशमधील असली तरी तेथे अखिल भारतीय स्तरावर कार्य चालते. राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय ख्याती मिळविलेल्या कलाकारांचे कार्यक्रम होत असतात. नाटक, नृत्य, संगीत, चित्रकारिता या सर्वांचा यात आंतर्भाव होत असतो. भारत भवनला पन्नास पैसे प्रवेश फी असून (शुक्रवारी मुक्त प्रवेश) ते शनिवार खेरीज दुपारी १ ते सायं. ७ पर्यंत लोकांना बघण्यासाठी खुले असते.

भारत भवनखेरीज भोपाळमधील 'म्युझियम ऑफ मॅन' हे वैशिष्टचपूर्ण संग्रहालयही पहाण्याजोगे आहे. येथे मानवाच्या इतिहासपूर्व ते आधुनिक काळापर्यंतच्या उत्क्रांतीचा अभ्यासपूर्ण आलेख प्रदर्शित करण्याचे काम जोरात चालू आहे. शासकीय पुरातत्व संग्रहालय, गांधी भवन अशी इतर काही संग्रहालये भोपाळमध्ये आहेत.

दुपारी मृगनयनी या राज्य सरकारी डिपार्टमेंटल स्टोअर्समध्ये चक्कर टाकली. कमुआत्याची मुलगी अनामिका तेथे नोकरीला असल्याने तिने तऱ्हेतऱ्हेच्या वस्तू दाखविल्या. त्यात कोणाही स्त्रीला मोहात पाडतील अशा होत्या म. प्र.च्या सुती, रेशमी, चंदेरी साड्या. मीही त्याला अपवाद ठरू शकले नाही. मोती, मणी यांच्या साहाय्याने वेलवेटवर केलेल्या कलाकुसरीच्या पर्सेस ही भोपाळची आणखी एक वैशिष्टचपूर्ण खरेदी. भोपाळ सोडतेवेळी लक्ष्मीपूजनाची धामधूम चालू होती. कशीतरी एक रिक्षा गाठून रस्त्यातील फटाक्यांना चुकवत कसंबसं स्टेशन गाठलं. स्टेशनवर मात्र अगदी शुकशुकाट होता. बाहेर एवढा धुमधडाका चालू असेल असं वाटतही नव्हतं. हमालही मिळवायला मुष्कील झालं. मिळालेल्या हमालाने उपकार केल्यासारखं सामान उचलतोय असं भासवून वर दिवाळीची बिदागीही उपटली.

• • •

## ६. वैभवशाली शिंदेशाहीचे ग्वाल्हेर, शिवपुरी

ग्वाल्हेरला जाण्यासाठी रात्री दहाची इंदौर–माळवा एक्सप्रेस पकडायची होती. रिझर्वेशन्स कन्फर्म्ड असली तरी मधलाच प्रवास म्हणून बसलेल्या लोकांना उठवण्यासाठी थोडी बाचाबाची करायला लागण्याची शक्यता नाकारता येत नव्हती.

गाडी वेळेत आली आणि तीही जवळजवळ रिकामीच. चढणारंही विशेष कोणी नव्हतं. आजकालच्या दिवसात रेल्वे रिकामी बघायला मिळणं हे एक महान् आश्चर्यंच म्हणायची वेळ आलीय. दिवाळी, त्यात अमावस्या म्हणून लोकांनी प्रवास करायचं टाळलं असावं. पहिल्या वर्गाच्या डब्यात तर आम्ही फक्त दोघे आणि आमची दोन अल्पवयीन मुले.

दरोडेखोरांसाठी कुप्रसिद्ध असलेल्या मुलखातून रात्रीचा प्रवास; आसपास दुसरं कोणी नाही. पहाटे साडेतीनला येणारं ग्वाल्हेर. आपल्याला जर जाग आली नाही तर दिल्लीच गाठली जायची. या भीतिपोटी झोपच लागली नाही.

ग्वाल्हेरला गाडी थोडी उशीरा, दिवसाउजेडी पोचावी असं वाटत होतं, पण कसचं काय. अगदी ठरल्यावेळी तिने बरोबर ग्वाल्हेर गाठलं. ग्वाल्हेर स्टेशनवर तर काम बंद असल्यासारखा सन्नाटा होता. हमालही कुठे दृष्टिक्षेपात नव्हता. आपलं आपण सामान उचलून प्रतिक्षालय

गाठलं. वेटिंग रूममध्येही फक्त आम्ही चौघेच. नाईलाजास्तव हरि हरि करत तांबडं फुटायची वाट बघत प्रतिक्षालयात बसून राहिलो झालं.

थोडं फट्‌फटू लागताच विजयने हॉटेल शोधण्याच्या मोहिमेवर कूच केले आणि सगळं ग्वाल्हेर शहर धुंडाळून विशेष चांगले हॉटेल न मिळाल्याने रेल्वे स्टेशन जवळचेच बऱ्यापैकी स्वच्छ असे हॉटेल सफारी पसंत केले. (दर डबल रूम १०० रु.). म. प्र. पर्यटन खात्याच्या गांधी रोडवरील मोटेल तानसेनमध्ये आयत्या वेळी गेल्याने जागा मिळाली नाही.

फार पुरातन काळापासून साहित्य, संगीत शिल्पाचे केंद्र असलेले ग्वाल्हेर म्हणजे एकेकाळची संस्थानी आणि आजच्या मध्य प्रदेशची सांस्कृतिक राजधानी.

शहरात प्रवेश करतेवेळीच प्रथम नजरेस पडतो तो, शेकडो वर्षांचा इतिहास ताठ मानेने सांगत उभा असलेला ग्वाल्हेरचा किल्ला. गाडीतून अनेकदा बघितलेल्या या किल्ल्याबद्दल अतिशय कुतूहल असल्यामुळे स्नान करून ग्वाल्हेर दर्शनासाठी रिक्षेने बाहेर पडताच प्रथम रिक्षा घ्यायला लावली ती या ऐतिहासिक भव्य स्मृतिस्थानाकडे.

एक अभेद्य, अजिंक्य म्हणून गणला गेलेला ग्वाल्हेरचा किल्ला म्हणजे जणु भारतमातेच्या गळ्यातील किल्ल्यांच्या रत्नहारातील एक अमोल रत्नच. या किल्ल्याने उत्तर भारताच्या इतिहासात महत्त्वपूर्ण भूमिका बजावली.

ग्वाल्हेरबद्दल अशी आख्यायिका सांगितली जाते, की आठव्या शतकात सूरजसेन नावाचा राजा येथे राज्य करत होता. कुष्ठरोगी असलेला हा राजा एकदा गोपगिरीवर (आजचा किल्ला) शिकारीसाठी गेला असताना त्याला ग्वालीपा नावाचा साधू भेटला. त्या साधूने तेथे असलेल्या तळ्यातील पाणी तहानलेल्या राजाला पिण्यास दिले असता त्याचा कुष्ठरोग बरा झाला या संत महात्म्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी त्याच्या नावाने ग्वाल्हेर गाव वसविण्यात येऊन हा किल्ला बांधण्यात आला आणि किल्ल्यातील तलावाला सूरजकुंड नाव देण्यात आले.


या सूरजसेनच्या घराण्याने १४ व्या शतकाच्या अखेरपर्यंत ग्वाल्हेरवर राज्य केले. या काळात तैमूरलंगने भारतावर केलेल्या आक्रमणानंतर उडालेल्या गडबड गोंधळात राजपूत तोमर घराण्याने ग्वाल्हेरवर आपली

सत्ता स्थापन केली. शेवटून दुसरा तोमर राजा मानसिंह याने किल्ल्यावर अनेक उल्लेखनीय स्मारके बांधली. त्यापैकी १४८६ ते १५१७ च्या दरम्यान बांधलेला मानमंदिर पॅलेस हा उत्तर भारतातील हिंदू वास्तूशिल्पशास्त्राचा एक उत्तम नमुना समजला जातो. राजा मानसिंहाने आपली स्वरूपसुंदर गुर्जरवंशीय राणी मृगनयनीसाठी १५ व्या शतकात उभारलेला गुर्जरी महालही तितकाच आकर्षक आहे.

शेवटच्या तोमर राजाच्या पानीपतच्या युद्धात झालेल्या पाडावामुळे दिल्लीचे तख्त बाबरला मिळाले. बाबर आणि त्याचा मुलगा हुमायून यांच्या दैवयोगात ग्वाल्हेर किल्ल्याचे महत्त्वाचे स्थान राहिले. १७८४ मध्ये मराठा सरदार माधवराव शिंदे यांनी हा किल्ला जिंकून आपल्या घराण्याचे राज्य प्रस्थापिले. १८५७ च्या भारतीय स्वातंत्र्य संग्रामात या किल्ल्याने पुन्हा एकदा महत्त्वाची भूमिका बजावली. झांशीची राणी लक्ष्मीबाई, सेनापती तात्या टोपे यांनी याच किल्ल्यातून इंग्रजांशी प्रखर लढत दिली. पुढे इंग्रजांनी हा किल्ला जिंकून आपल्याकडे ठेवला आणि ग्वाल्हेर शिंद्यांना दिले. शिंद्यांनी १८८६ मध्ये झांशी इंग्रजांना देऊन ग्वाल्हेरचा किल्ला आपल्याकडे घेतला. त्यानंतर भारताला स्वातंत्र्य मिळेपर्यंत तो शिंद्यांकडेच होता.


तीनशे फूट उंचीच्या सँडस्टोनच्या पहाडावर दोन मैल लांबीत ग्वाल्हेरचा हा किल्ला पसरलेला आहे. किल्ल्याच्या पश्चिमेकडील लांबच्या रस्त्याने वाहने वरपर्यंत नेता येत असली, तरी उत्तर-पूर्वेकडील मुख्य दरवाजाने जायचे झाल्यास वाहने खालीच उभी करावी लागतात. खड्या चढणीचे पाच दरवाजे ओलांडून मुख्य प्रवेशद्वारापाशी जाईपर्यंत बऱ्यापैकी दमछाक होते.


मोगल सम्राट औरंगजेबच्या नावावरून नामकरण झालेला आलमगिरी दरवाजा आणि एकेकाळी झोका जवळ असल्याने नाव पडलेला हिंदोळा दरवाजा ओलांडून उजवीकडे वळताच समोर दिसतो अत्युत्तम कलाकुसरीचा गुर्जरी महाल. या महालात सध्या पुराणवस्तू संग्रहालय आहे. मध्य प्रदेशमधील अनेक नमुनेदार पुरातन वस्तू, शिल्प, चित्रे यांचा नमुनेदार संग्रह असलेले हे म्युझियम दर सोमवारी आणि सार्वजनिक सुट्ट्यांच्या दिवशी बंद असते. दिवाळी म्हणून आम्हालाही फक्त



शिवपुरी–मध्य प्रदेश पर्यटक निवास ↑


↓ ओर्च्छा–बेटवा नदीकिनाऱ्यावरुन दिसणारे





ांशीचा किल्ला ↑

↓ जबलपूर–नर्मदेचा 'धुंवाधार' धबधबा, भेडा घाट



बाह्य दर्शनावर समाधान मानावे लागले.

नंतर लागते ते गणेश दरवाजाबाहेरील संत ग्वालीपाचे मूळचे पवित्र स्थान. एका धर्मवेड्याने तो मोडून तेथे मशिदीची स्थापना केली. अखंड भरीव दगडातून घडविलेले चतुर्भुज हे भगवान विष्णूचे मंदीर लक्ष्मण-दरवाजाबाहेर आहे. हाथिया पौर हा राजा मानसिंहाने उभारलेला ग्वाल्हेरच्या किल्ल्यातील शेवटचा दरवाजा. त्याकाळी या दरवाजा शेजारी दगडात खोदलेला हत्ती होता. किल्लेकोटाच्या भिंतीवर १५ व्या शतकात कोरलेल्या जैन तीर्थंकारांच्या मूर्ती असून, त्यातील सर्वोच्च ५७ फूट उंचीची आहे.

हाथी दरवाजातून आत जाताच लागतो, तो रंगीत टाईल्सच्या कामानी सुशोभित असा राजा मानसिंहाने बांधलेला मानमंदिर पॅलेस. अजूनही रंग टिकून असलेली एकेकाळचे वैभव सांगणारी या राज-वाड्याची भव्य दालने आता भकास वाटतात. याच्या गच्चीवरून खाली दूरवर पसरलेल्या ग्वाल्हेरचे मनोरम दृश्य दिसते. या राजप्रासादाच्या खाली असलेल्या अंधार कोठड्यांतून मोगलांच्या काळात कैदी ठेवण्यात येत असत. औरंगजेबने आपला भाऊ मुराद याला येथेच बंदीवासात ठेवले होते. नंतर त्याला ठार मारण्यात आले. आता हा भुलभुलैय्या मार्ग लोक चुकू नयेत म्हणून बंद करण्यात आला आहे. याच्याजवळ जोहर कुंड असून, त्यात रजपूत स्त्रिया सती जात असत. कर्ण महाल, जहांगीर महाल, विक्रम मंदिर, शहाजहाँ महाल, भीमसिंह राणाची छत्री ही या भागातील आणखी काही स्मृतिस्थाने.

मानमंदिर राजवाड्याच्या दक्षिणेकडे सुमारे १८३ मीटर्सवर ११ व्या शतकातील सास-बहु-दोन शेजारी शेजारी असलेली विष्णू मंदिरे आहेत. ती जैन मंदिरे असल्याचं म्हटलं गेलं असलं तरी त्यावरील प्रतिमा, कोरीव नक्षीकाम यावरून ती हिंदू मंदिरेच असल्याचं सिद्ध झालं आहे. तेथील शिलालेखावरून या मंदिराचं बांधकाम ग्वाल्हेरचा कछवा रजपुत राजा महिपाल याने १०९३ मध्ये पूर्ण केले. या मंदिरां-पैकी ३० मी. × २२ मी. क्षेत्रफळाचं मोठं मंदीर ‘ सास मंदीर ’ म्हणून ओळखलं जातं. येथेही सासूलाच मोठेपणाचा मान दिलेला पाहून गंमत वाटली. महिपाल राजाची आई विष्णूभक्त होती. तिच्यासाठी त्याने हे

मंदिर बांधले आणि त्याची बायको शिवभक्त होती. तिच्यासाठी छोटे मंदिर उभारले. बहु-मंदिराबाहेरून ग्वाल्हेरचा सुरेख देखावा दिसतो. सास मंदिरातील बऱ्याच मूर्तींची तोंडे मुस्लिम आक्रमकांनी विद्रूप केलेली दिसतात. शतकानुशतके चुन्याने लिंपून बुजवलेल्या अवस्थेत असलेलं हे मंदिर मेजर जे. बी. कीथ यांनी १८८१ साली हिंदुस्थानचे त्यावेळचे प्राचीन स्मारकांचे व्यवस्थापक कॅ. एच्. कोलर यांच्या मार्गदर्शनाखाली उघडकीस आणले.

तीन मीटर्सहून अधिक उंचीचे तेलीका मंदीर ही किल्ल्यावरची सर्वांत उंच इमारत. ९ व्या शतकातील तेलंगणा शैलीच्या या मंदिरात उत्तर आणि दाक्षिणात्य कलेचा समन्वय दिसतो.

किल्ल्याच्या मध्यवर्ती भागात प्राचीन सूरजकुंड असून, जवळच शिखांचे सहावे गुरू हरगोविंदसाहेब यांच्या स्मरणार्थ नवीनच बांधलेले रंगीबेरंगी चकचकीत टाईल्सचे अतिशय भव्य आणि स्वच्छ गुरुद्वार आहे. हरगोविंदसाहेब यांना जहांगिरने येथे नजरकैदेत ठेवलं होतं. पण त्यांना कैद केल्यावर तो आजारी पडला आणि त्याची प्रकृति खालावत गेली. म्हणून त्याने हरगोविंदसाहेबांची मुक्तता केली.

किल्ल्यावर दिसणारे बंगले, बराकी, ब्रिटिशांनी १८५८ ते १८८६ च्या दरम्यान बांधल्या. यापैकी बऱ्याच इमारतीत आता सिंदिया पब्लिक स्कूल आहे. इ. स. १८८५ मध्ये किल्ल्यावर सरदार स्कूल सुरू झाले. त्यात पूर्वी फक्त सरदार, उमरावांची मुलं शिक्षण घेत. नंतर सर्वांना प्रवेश देण्यात येऊ लागला.

इतिहास काळापासून ग्वाल्हेरला संगीत परंपरेचा वारसा देणारा संगीत सम्राट् तानसेन आणि सम्राट् अकबराचे अफगान प्रिन्स गुरु महंमद घौस यांच्या समोरासमोर असलेल्या कबरी किल्ल्याखाली आहेत. यापैकी सँडस्टोनवरील जाळीच्या नाजूक कलाकुसरीची महंमद घौसची प्रशस्त कबर म्हणजे मोगल वास्तूशिल्पाचा एक उत्कृष्ट नमुनाच. त्याच्या समोरील एका चौथऱ्यावरील तानसेनच्या छोटेखानी समाधीपाशी दरवर्षी नोव्हेंबर–डिसेंबरमध्ये होणाऱ्या संगीत सोहोळ्यात भारतभरचे गायक–वादक मोठ्या मानाने हजेरी लावून जातात.

ग्वाल्हेर आजही शिंद्यांचं म्हणूनच ओळखलं जातं. शहरावरील

खानदानी मराठा ठसा आजही जवळीक निर्माण करतो.

जयविलास पॅलेस म्हणजे शिंदे घराण्याचं निवासस्थान. या राजप्रासादातील ३५ दालनात १२ डिसेंबर १९६४ पासून सुरू करण्यात आलेले जीवाजीराव शिंदे म्युझियम असून, त्यातून हिंडताना शिंद्यांच्या पूर्वीच्या राजवैभवाची झलक पहायला मिळते. अर्थात् तिकीट काढून.

ग्वाल्हेर किल्ल्यावरून थेट जयविलास पॅलेसमध्ये गेलो, तर तेथील संग्रहालय दिवाळीच्या निमित्ताने बंद होते. रेल्वेमंत्री श्री. माधवराव शिंदे यांचा मुक्कामही दिवाळी म्हणून राजवाड्यातच असल्याने सुरक्षा दलाच्या दरवानांनी आत डोकावूनही दिले नाही. दूरवरून मोठ्या उत्साहाने येणारे लोक निराश होऊन परतत होते. दिल्लीला परदेशीय दूतवासात काम करणाऱ्या काही विदेशी लोकांचा एक ग्रुप मोठ्या उत्साहाने आला होता. हे लोकं आपल्याला आत का जाऊन देत नाहीत हे सुलभ संपर्क भाषेअभावी पटवून देणे त्यांच्या गाईडला मोठे मुष्कील होत होते. सुट्ट्यांच्या दिवसातच लोक सहलींना बाहेर पडतात. त्यावेळी प्रेक्षणीय स्थळे बंद ठेवणे हे काही पटत नाही. काहीही करून पर्यटकांना या सुविधा उपलब्ध करून देणं शक्य होणार नाही का ?

झाशीची राणी लक्ष्मीबाईंनी १८ जून १८५८ रोजी इंग्रजांशी प्राणपणाने लढताना अत्यंत घायाळ अशा अवस्थेत ग्वाल्हेर येथेच देह ठेवला. महाराणी लक्ष्मीबाईंना अग्नि देण्यात आलेल्या ठिकाणी ग्वाल्हेरच्या पुरातत्त्व खात्यातर्फे महाराजा जीवाजीराव शिंदे यांच्या कारकीर्दीत १९२९ साली त्यांचे स्मारक उभारण्यात आले. राणी लक्ष्मीबाईंचा घोड्यावर टांच मारलेला स्फूर्तिदायक पुतळा पहात असताना या कर्तृत्ववान स्त्रीचा अतुलनीय पराक्रम, देशासाठीचे बलिदान पुन्हा एकवार आठवून नतमस्तक झाले. कविवर्य भा. रा. तांबे यांच्या तेथे लिहिलेल्या काव्यपंक्ती वाचताना गहिवरून आले.

रे हिंद बांधवा थांब या स्थळी अश्रू दोन ढाळी ॥
ही पराक्रमाची ज्योत मावळे इथे झाशीवाली ॥

महापराक्रमी अद्वितीय स्त्रीला आंदराजली वाहून हॉटेलवर परत गेलो. जेवून थोडी विश्रांती घेऊन परत ग्वाल्हेर दर्शनासाठी बाहेर पडलो.

ग्वाल्हेर शहर हे लष्कर, ग्वाल्हेर आणि मुरार अश्या पूर्वीच्या तीन वस्त्यांचं मिळून बनलेलं आहे. स्टेशनपासून सुमारे पाच कि.मी. अंतरावर लष्कराच्या मध्यभागी चौक असून त्याला 'बाडा' म्हटले जाते. बाडा भागात चोहोबाजूंनी भव्य सरकारी इमारती असून, मध्यभागी असलेल्या रेखीव बागेत जयाजी महाराज शिंदे यांचा करारी मुद्रेचा पुतळा उभा आहे.

'बाडा' तून रमतगमत हिंडत असताना लष्कर पोस्ट ऑफिसचा मोठा फलक नजरेस पडला. रमेश काकांचे घर लष्कर विभागातच असल्याने तेथे कसे जाता येईल हे तेथील एका पोलिसाला विचारले. माझे चुलत काका श्री रमेश खांडेकर हे ग्वाल्हेरमधील एक सामाजिक कार्यकर्ते आणि राज्यसभेचे माजी सदस्यही. एवढ्या प्रतिष्ठित व्यक्तीचा पत्ता विचारूनही तो पोलीस आम्हाला संशयित मुद्रेने न्याहळत म्हणाला, "तुम्ही येथे नवखे दिसताय. संध्याकाळचं अंधार पडल्यावर असं पायी अजिबात भटकू नका, फार धोक्याचं आहे. वाहनाने ताबडतोब हॉटेलवर परत जा. मी स्थानिक माणूस म्हणून सांगतोय्."

त्या पोलिसाचे हे उद्‌गार ऐकून सकाळी वाचलेल्या राणी लक्ष्मी-बाईच्या समाधीवर लिहिलेल्या–

"ज्योती जलाई आजादीकी देकर कुर्बानी ।
युगयुगतक इतिहास कहेगा तेरी शौर्य कहानी ।।"

या काव्यपंक्ती आठवल्या. आजच्या स्वतंत्र भारतात झांशीच्या राणीच्या शौर्याचे पोवाडे मोठ्या भूषणाने गाणाऱ्या ग्वाल्हेरमध्ये आपल्याला रात्री साधं निर्धास्तपणे हिंडताही येऊ नये याबद्दल विषाद वाटला.

ग्वाल्हेरहून ११२ कि. मी.वर ग्वाल्हेर-मुंबई महामार्गावरील हिरव्या-गार डोंगरखाईत वसलेल्या निसर्गरम्य शिवपुरीबद्दल बरंच काही ऐकल्याने तेथे जायची फार उत्सुकता होती. शिंदे घराण्यातील राजे–लोकांचे शिवपुरी हे उन्हाळी निवासस्थान. त्याच्याही आधी शिवपुरीचे दाट जंगल ही मोगल सम्राटांची शिकारीची आवडती जागा होती.

शिवपुरीला धावती भेट देऊन सायंकाळी पुन्हा ग्वाल्हेरला परतावे या हिशोबाने सकाळच्या लवकरच्या बसने प्रयाण केले. सुंदर रस्ता रुक्ष शिवपुरीच्या बकाल स्टॅण्डवर घेऊन येताच, रम्यत्वाच्या कल्पनांच्या ठिकऱ्या उडाल्या. बाह्य गावठाणाच्या (कु) रूपावरून माघारी फिरावं

असं वाटत होतं. पण म्हटलं आता आलोच आहोत तर येथील अभयारण्य तरी पाहून जाऊ. म्हणून तेथपर्यंत जाण्यासाठी टांगा ठरविला.

आसमंतातील हिरवी सळसळ हळू हळू वाढू लागली. वाटेत अतिशय आकर्षक तांबडी कौलारू टुमदार बैठी घरकुलं दिसताच इतकं सुंदर हॉटेल कोणतं आहे याची चौकशी करायला आत शिरलो. हा होता मध्यप्रदेश पर्यटन खात्याचा पर्यटक निवास – टुरिस्ट ग्राम. स्वप्नवत वाटणाऱ्या एखाद्या भारतीय आदर्श खेड्याचा उत्कृष्ट नमुना म्हणावा असे हे टुरिस्ट ग्राम. झोपडीवजा आधुनिक सुखसोयींनी युक्त अशा या निवासस्थानांच्या अंतर्गत सजावटीत खेड्यातील वातावरण निर्मिती करण्यात आलेली आहे. दारं-खिडक्यांवर बांबूचे कलाकुसरीचे काम; हंथरा–पांघरायला आदिवासींनी विणलेल्या चादरी, शाली, कंदिलांना दिवे लावलेले टेबल लँप्स; टीपॉय ऐवजी चौरंग. या टुरिस्ट ग्राममधील भारावून टाकणारं ताजंतवानं वातावरण; मुख्य म्हणजे सरकारी कर्मचाऱ्यांत अभावानेच दिसणारी तेथील व्यवस्थापकांची अगत्यशील वागणूक. यामुळे पोरं तेथून हालायला तयार होईनात. एवढ्या सगळ्यांचे दरही खिशाला परवडणारे होते. साध्या डबलरूमला ठराविक नाष्ट्यासह फक्त १३० रु. दर दिवसाला. त्यात निरंजनचा वाढदिवस आणि मनालीची भाऊबीज यामुळे त्यांचा हट्ट पुरा करणं भाग होतं. खरं म्हणजे पोरांच्या नावाखाली आम्हालाच तेथे रहावंसं वाटत होतं. त्यामुळे बरोबर काहीही सामान नसतानाही एक दिवस मुक्काम करायचा ठरवून टांगेवाल्याला परत पाठवून दिलं. इतक्या दिवसांच्या धकाधकीच्या प्रवासानंतर थोडी विश्रांतीची आवश्यकता होतीच; आणि त्यासाठी टुरिस्ट ग्रामसारखं शांत, रम्य स्थळ मिळालं होतं. सरव्यासागर तलावाकाठच्या मोहक परिसरातील या पर्यटक निवासाचे कोणी मंत्री–महामंत्री महोदय न मिळाल्याने औपचारिक उद्घाटन झाले नव्हते. त्यामुळे एवढी नयनरम्य जागा शिवपुरीत आहे याची ग्वाल्हेरमध्येही अनेकांना कल्पना असलेली दिसली नाही.

टुरिस्ट ग्रामला लागूनच भदिया कुंड आहे. एका खडकातील नैसर्गिक झऱ्यातून बारा महिने छोट्या धबधब्यासारख्या पडणाऱ्या पाण्याचं नैसर्गिक कुंड तयार झालं असून, या पाण्यात आरोग्यवर्धक खनिजं

असल्याचं म्हटलं जातं. हिरव्यागार वृक्षराजींनी फेर धरलेला हा परिसर वनविहारासाठीची मनोरम जागा. येथे एक शिव मंदिरही असून तेथील चार गोमुखातूनही पाणी येत असतं.

टुरिस्ट ग्रामजवळ असलेल्या मोगल गार्डनमध्ये महाराणी सख्याराजे शिंदे आणि कै. माधवराव शिंदे या माता–पुत्रांच्या, हिंदू आणि मोगल-वास्तूशिल्पशास्त्राचा मनोहारी समन्वय साधणाऱ्या एकमेकांसमोर असलेल्या सुरेख समाध्या आहेत. आतमध्ये त्या दोघांचे संगमरवरी पूर्णाकृति पुतळे आहेत. लकलकीत पांढऱ्या संगमरवरावरील अप्रतिम कोरीव कारागिरीची कै. माधवरावांची समाधी पहाताना ताजमहालची आठवण येते. रंगीत संगमरवराचे तुकडे वसवून केलेले भिंतीवरील वेलबुट्टीचं अजोड नक्षीकाम, चांदीचे दरवाजे, आत घातलेली पांढरी शुभ्र आसने; यांनी सुशोभित अशा या माधवराव शिंद्यांच्या छत्रीच्या बांधकामास १९२६ मध्ये सुरुवात होऊन ते १९३२ मध्ये पूर्ण करण्यात आले. दोन समाध्यांमध्ये तलाव असून या तलावाकडे तोंड करून असलेली सख्याराजेंची समाधी त्यांचे सुपुत्र माधवराव यांनी बांधली. दोघांचे पुतळे राजवेषधारी असल्याने जिवंत वाटतात. मात्र सख्याराजेंच्या पुतळ्याला काळी बुबुळे नसल्याने तो थोडा विचित्र वाटला.

तळी, कारंजी, संगमरवरी नक्षीदार कठडे, व्हिक्टोरियन पद्धतीचे दिवे अशा उच्च अभिरुचींनी सजलेला येथील मोगल बगीचा एकेकाळी अतिशय लाजवाब असावा. सध्या त्याची देखभाल नीट न झाल्याने फुलझाडं सुकली होती, एकही कारंजं चालू नव्हतं; तळ्यातील पाण्यावर शेवाळं साठलं होतं.

भारतातील इतर ठिकाणांप्रमाणे शिवपुरीतील जंगलही बऱ्याच प्रमाणात कमी झालेलं असलं तरी माधव नॅशनल पार्कच्या रूपानं त्याचं आज जतन केलं जात आहे. मात्र वाघांच्या शिकारीसाठी ख्यातनाम असलेल्या या भागात सध्या एकही वाघ नाही असे म्हणतात. वर्षभर उघड्या असलेल्या आणि सुमारे १६० चौ. कि. मी. क्षेत्रफळात पसरलेल्या माधव नॅशनल पार्कमध्ये प्रामुख्याने दिसतात ते गोंडस हरिणे, चितळ, काळविटे यांचे कळप. या अभयारण्याकाठच्या चांदपाटा किंवा सख्यासागर या ११ कि. मी. परिघाच्या कृत्रिम सरोवरात हिवाळ्या-

मध्ये देशोदेशीचे अनेक स्थलांतरित पक्षी वास्तव्याला येतात. या सख्या-सागर सरोवराकाठी एक बोट क्लबही आहे. टुरिस्ट ग्राममधून जीपने, मिनी बसने अभयारण्याचा फेरफटका मारता येतो.

टुरिस्ट ग्राममधील मध्यवर्ती लाऊंजही अतिशय देखणे प्रशस्त होते. त्याला लागून असलेल्या स्वच्छ, प्रसन्न डार्यानिंग हॉलमध्ये अतिशय रुचकर जेवण मिळाले. सायंकाळी हिरवळीवर बसून स्वादिष्ट खाद्यपदार्थांचा आरामात आस्वाद घेण्यात मजा आली. मनसोक्त खेळायला मिळाले म्हणून निरंजन खूष. टुरिस्ट ग्रामधील एक दिवस कसा भूरंकन गेला त्याचा पत्ताही लागला नाही. शिवपुरी हृदयात घर करून राहिली, ती तेथील व्यवस्थापक अन्सारी, नक्वी, श्रीवास्तव यांच्याशी तात्काळ जमलेल्या मैत्रीमुळे.

एक दिवसाच्या आल्हाददायक विश्रांतीमुळे श्रमपरिहारच झाला आणि त्यामुळे अधिक उत्साहाने ग्वाल्हेर मुक्कामी परत निघालो. बस पकडण्याआधी १८५७ च्या स्वातंत्र्य संग्रामातील शूर सेनापती तात्या टोपे यांना आदरांजली वाहिली. तात्या टोपेंना फाशी देण्यात आलेल्या ठिकाणी त्यांचा पुतळा उभारण्यात आला असून, ही जागा गावाच्या मध्यवर्ती भागात आहे.

शिवपुरीच्या आसपासही अनेक प्रेक्षणीय स्थळे आहेत. शिवपुरीहून २१ कि. मी. वरील सुर्वया (पूर्वीचे सरस्वतीपट्टन्) येथील प्राचीन किल्ल्यात हिंदू मठ, मंदिरांचे अवशेष पहायला मिळतात.

नळ–दमयंतीचे नरवार गाव शिवपुरीपासून ५६ कि. मी. वर येते. तेथील टेकडीवरील मध्ययुगकालीन किल्ला, राजवाडा, सिकंदर लोदीची मशीद, मकारद्धाज तलाव ही काही प्रेक्षणीय स्थळे.

चंदेरी साड्यांसाठी प्रसिद्ध असलेली चंदेरी शिवपुरीपासून १२७ कि. मी. वर असून, ते बुंदेल राजपूत आणि माळव्यातील सुलतानांच्या वास्तू-शिल्पांसाठीही ख्यातनाम आहे. मोगल किल्ल्याबरोबर चंदेरीत ९ व्या आणि १० व्या शतकातील जैन मंदिरेही आहेत.

ग्वाल्हेरला परतल्यावर लगेच दुपारी पाय वळले ते परवा दिवाळी म्हणून बंद असल्याने निराश होऊन परताव्या लागलेल्या जयविलास पॅलेसकडे. शिंदे राजघराण्यातील लोकांचे सध्याचे निवासस्थान असलेल्या

या राजप्रासादातील ३५ दालनांत जिवाजीराव शिंदे म्युझियम असून त्यातून हिंडताना शिंद्यांच्या पूर्वीच्या राजवैभवाची झलक पहायला मिळते; अर्थात तिकीट काढून.

आतमध्ये माहिती देण्यासाठी बरेच मराठी भाषिक आहेत. या राजवाड्यातील दरबार हॉल अतिभव्य नेत्रदीपक आहे. सध्याचे माधवराव शिंदे यांच्या मुलीचा विवाह संपन्न होणार असल्याने रंगरंगोटी, साफसफाई चालली होती. एकही खांब नसलेल्या वैभवशाली दरबार हॉलच्या छतावर सोन्याचे नक्षीकाम केले असून, तेथील प्रत्येकी साडेतीन टन वजनाची दोन झुंबरे लगेच नजरेत भरतात. या झुंबरांचे वजन छताला पेलवेल की नाही याची चाचणी घेण्यासाठी दहा हत्तींना छतावर उभे करण्यात आले होते. पर्शियन गालीचे; इटली, फ्रान्सहून आणवलेले मौल्यवान् फर्निचर, उंची पडदे यांनी दरबार हॉल सजलेला आहे. या संग्रहालयातून हिंडताना जेवणाच्या टेबलावर पाहुण्यांना मद्य, सुकामेवा देण्यासाठी चांदीच्या डब्यांची छोटी रेल्वे, चांदीचे डिनर सेटस्, जन्माष्टमीला, कृष्णजन्मासाठी वापरण्यात येणारा इटलीचा काचेचा पाळणा, औरंगजेब, शहाजहान यांनी ल्यालेल्या तलवारी इ. गोष्टी लक्ष वेधून घेतात. याखेरीज भव्य शयनगृहे, चिखूराणीचे रत्नजडित चढाव, शिकारीतील बक्षिसे, राजघराण्यातील लोकांच्या तसबिरी, जगातील जवळजवळ प्रत्येक देशातून मिळालेल्या भेटवस्तू शिंद्यांच्या उच्च कलाभिरुचीपूर्ण वैभवाचे दिमाखदार प्रदर्शन करताना दिसतात. यापैकी कमलाराजे शिंदे यांनी स्वतःचे काढलेले पोर्ट्रेट लक्षात राहते.

भारतातील त्याकाळच्या राजे लोकांच्या श्रीमंती जीवनमानाचे ओझरते दर्शन जिवाजीराव शिंदे संग्रहालयातून हिंडताना होते. आमची मार्गदर्शक मुलगी आत्ताच्या महाराजांच्या वडिलांच्या, आजीआजोबांच्या, आत्याच्या वस्तू आवर्जून दाखवत होती. पण आईची मात्र कुठलीच दाखविली नाही. म्हणून तिला विचारलं, 'विजयाराजे विरोधी पक्षात आहेत म्हणून त्यांना असं बहिष्कृत करण्यात आलं आहे का?' त्यावर ती म्हणाली, 'नाही, त्यांचीही आहे ना!' म्हणून तिने मुद्दाम नेऊन एक तैलचित्र दाखविले. ती तसबीर होती विजयाराजेंची लग्नाच्या वेळची. त्या वीस वर्षांच्या असतानाची.

कला वथिका (रविवार आणि सार्वजनिक सुट्ट्यांच्या दिवशी बंद) आणि म्युनिसिपल म्युझियम (सोमवारी बंद) ही ग्वाल्हेरमधील इतर संग्रहालये. ग्वाल्हेरचे प्राणीसंग्रहालय रोज स. ८ ते ३ उघडे असते. ग्वाल्हेर पॉटरीज्, ग्वाल्हेर सूटिंग्ज हे आपल्याला परिचित आहेतच.

• • •

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे

## ७. मध्ययुगकालीन विश्वात–ओर्च्छा

ग्वाल्हेरहून सुमारे शंभर कि. मी. वर असलेली झांशी राजकीयदृष्टचा उत्तर प्रदेशात असली तरी पर्यटकांच्या सोयीच्या दृष्टीने झांशीचा समावेश मध्यप्रदेशमध्येच करावा लागेल. ग्वाल्हेर–झांशीच्या दरम्यान सारख्या बसेस धावत असतात. त्यापैकी सकाळच्या एका बसमधून झांशी गाठली. बस स्टँड अतिशय गलिच्छ. गावातही स्वच्छता बेताचीच. त्यामुळे बऱ्यापैकी तरी स्वच्छ हॉटेल मिळेल का अशी शंका होती; पण प्रकाश गेस्ट हाऊस म्हणून चांगले निवासस्थान डबलरूमला ७५ रुपये दरात मिळाले. सामान टाकून लगेच ऑटो रिक्षाने ओर्च्छाकडे निघालो. तेथे जाण्यासाठी टेम्पोही मिळतात. मध्ययुगकालीन इतिहास विश्वात नेणारे मध्यप्रदेशमधील ओर्च्छा झांशीपासून फक्त १५ कि. मी. वर आहे.

जुने राजवाडे, छत्र्या, स्मारके, मंदिरे आजही जसंच्या तसं जपणारी ओर्च्छा नगरी म्हणजे बुंदेला रजपुतांची एकेकाळची राजधानी. बुंदेला रजपूत राजा रुद्रप्रसाद याने १६ व्या शतकात ही रम्य बेटवा नदीकिनारी वसविली.

गाव तसं अगदी छोटंच. पण किल्लेकोटात अनेक राजप्रासाद असलेलं. यातील सर्वात मोठा आणि कलात्मक म्हणजे जहांगीर महाल. राजाबीरसिंगदेव याने हा सतराव्या शतकात आपला मित्र जहांगीर याच्या

ओच्छा भेटीच्या स्मरणार्थ बांधला. या पाठीमागची कथाही रोमांचकारी आहे. आपला पिता सम्राट अकबराविरुद्ध बंड करण्याच्या प्रयत्नात असलेल्या सलीमला राजा बीरदेव याने आश्रय दिला होता. अकबराच्या वतीने वाटाघाटी करायला आलेल्या अब्दुल फाजलचा शिरच्छेद बीरसिंगदेवने करून त्याचे डोके अकबराकडे पाठविले. पुढे सलीम जहांगीर बादशाह झाला आणि आपला आश्रयदाता बीरसिंगदेव याच्या भेटीला मुद्दाम आला. तेव्हा त्याच्या निवासासाठी बीरसिंगदेवाने हा महाल बांधला. नाजूक छत्र्या, जाळीदार नक्षीकामाचे कलात्मक घुमट, गवाक्ष, सज्जे यांनी सजलेला जहांगीर महाल म्हणजे बुंदेला वास्तूशिल्पकलेचा एक उत्तम नमुनाच. सध्या मध्यप्रदेश पर्यटन खात्याचे शीशमहल हे हॉटेल याच्या काही भागात आहे.

बीरसिंगदेवच्या पूर्वीचा धर्मनिष्ठ बुंदेल राजा मधुकर शाह याने राजमहाल बांधला. बाहेरील बाजू साधीच असलेल्या या पडीक वाड्याचा वरील भाग छत्र्यांनी सुशोभित आहे. आतमध्ये विविध धार्मिक विषयांवरील रंगीत भित्तीचित्रे आढळतात.

राय परवीन महाल या ओच्छातील आणखी एका पडीक अवस्थेतील महालालाही आपली एक रोमहर्षक कहाणी आहे. ओच्छाचा राजा इंद्रमणी (१६७२–७६) याची स्वरूपसुंदर कवयित्री आणि गायिका प्रेयसी राय परवीन हिच्या रूपगुणांवर भाळून सम्राट अकबराने तिला आपल्या दरबारात येण्याचा हुकूम सोडला. राय परवीनला नाईलाजास्तव दिल्लीला जावं लागलं. परंतु राय परवीनने अतिशय धीटपणाने अकबराच्या दरबारात राजा इंद्रमणीवरील आपल्या निस्सीम प्रेमाचं गाणं म्हटलं. तिच्या शुद्ध प्रेमाने प्रभावीत होऊन शहेनशहाने तिला ओच्छाला परत पाठविले. तिच्यासाठी इंद्रमणीने हा महाल बांधला. या वाड्यातही बुंदेला शैलीतील भित्तीचित्रे आहेत. राजमहाल आणि राय परवीन महाल यांना जोडणारा बोगदा असून त्यातून राजा इंद्रमणी परवीनकडे जात असे, असं म्हटलं जातं.

जवळ जवळ भग्नावस्थेत असलेला सुंदर महाल हा ओच्छाचा एक छोटा राजवाडा म्हणजे मुस्लीमांचे पवित्र स्थान आहे. धुर्जबन नावाच्या ओच्छाच्या एका राजपुत्राने मुसलमान मुलीशी लग्न केल्यानंतर इस्लाम

धर्माचा स्वीकार केला. उर्वरित आयुष्य त्याने धार्मिक कार्यात व्यतित केल्याने त्याला संत म्हणून पूज्य मानण्यात येऊ लागले.

ओर्च्छाचा पूर्वीचा आणखी एक राजपुत्र हरदौल याचीही देव म्हणून पूजा करण्यात येते. राजा बीरसिंग देवचा हरदौल हा मुलगा. आपल्या थोरल्या भावाच्या बायकोशी आपले काही अनैतिक संबंध नाहीत हे सिद्ध करण्यासाठी त्याने हौतात्म्य पत्करले. आजही बुंदेल खंडातील खेडेगावातून प्लॅटफॉर्मसारख्या बांधलेल्या जागांना पवित्र मानून हरदौल म्हणून पुजण्यात येते.

ओर्च्छाच्या रामराजा महालाचे मंदिरात कसे रूपांतर झाले त्याची मोठी विलक्षण आख्यायिका आहे. धर्मनिष्ठ राजा मधुकर शाह याला स्वप्नात झालेल्या दृष्टांतानुसार त्याने आपल्या राजधानीत श्रीरामांची मूर्ती अयोध्येहून आणली. मंदिर उभारणीचे काम चालू असल्याने ते पूर्ण होईपर्यंत त्याने ती राममूर्ती आपल्या राजवाड्यातच ठेवली. देवळाचे बांधकाम पूर्ण झाल्यावर त्यात प्रतिष्ठापना करण्यासाठी ही मूर्ती हलविण्याचा प्रयत्न केला असता ती जागची हालेनाच. तेव्हा राजाला दृष्टांतातील देववाणी आठविली की ' आपणास ज्या ठिकाणी प्रथम ठेवलं जाईल तेथेच आपण राहू. त्या जागेवरून हलणार नाही. ' त्यामुळे ही मूर्ती मंदिरात न जाता राजवाड्यातच राहिली आणि हा राजवाडा रामराजा मंदिर म्हणून ओळखला जाऊ लागला. उंच घुमट, राजवाड्यासारखं नक्षीदार वास्तूशिल्प असलेलं ओर्च्छाचं हे राम मंदिर असामान्यच म्हणावं लागेल. भारतातील हे एकमेव राममंदीर असं आहे की जिथे रामाला देव म्हणून नव्हे तर राजा म्हणून पुजले जाते.

भरभक्कम दगडी जोत्यावरचे भव्य चतर्भुज मंदीर मधुकर शाहने अयोध्येहून आणलेल्या राममूर्तीची प्रतिष्ठापना करण्यासाठी मुद्दाम बांधण्यात आले. परंतु राम तेथे न आल्याने राम नसलेले ओर्च्छाचे हे राम मंदिर वैशिष्टयपूर्ण झाले.

ओर्च्छातील लक्ष्मी–नारायण मंदिराची उभारणी १७ व्या शतकाच्या सुरुवातीस करण्यात आली. किल्लेकोट आणि मंदीर या दोन्ही वास्तूशिल्पकलेचे सुरेख मिश्रण असलेल्या या मंदिराच्या भिंती आणि छतांवर धार्मिक आणि धर्मातीत विषयांवरील चांगल्या स्थितीत जतन झालेली

रंगीत चित्रे आहेत. काही दिवसांपूर्वी या मंदिरातील लक्ष्मीची पंच-धातूची मूर्ती चोरीला गेल्याने ते उदास रिकामं वाटत होतं.

पूर्वी पाना–फुलांनी बहरलेली ‘ फुलबाग ’ बुंदेला राज्यकर्त्यांच्या उच्च अभिरुचीची साक्ष देत आज निरस कोरडेपणाने उभी असलेली दिसते. एके काळी या मोगलधर्तीच्या उद्यानाच्या मध्यभागी सुंदर कारंजी आणि चंदन कटोरा नावाचा वाटीच्या आकाराचा मोठा खोलगट हौद होता. या बागेजवळ जमिनीखाली बुंदेला राजांचे उन्हाळ्यातील निवास-स्थान होते. चंदन कटोऱ्यातील कारंजांतील पाणी या राजवाड्याच्या छतावर ठिबकण्याची अशी काही कल्पक योजना केलेली होती की तो उन्हाळ्यातही थंड रहावा.

मध्यप्रदेशामधील नद्यांवर विशेष धरणे नसल्याने की काय एवढा कमी पाऊस पडूनही त्यांना भरपूर पाणी होते. ओर्च्छाची बेटवाही अशीच छान भरलेली. खडकाळ दगडगोट्यांतून अवखळपणे खळखळत वाहणाऱ्या रम्य बेटवेच्या काठावरील कांचन घाटावर बुंदेला राजांच्या चौदा नक्षीदार छत्र्यांचा–स्मारकांचा समूह आहे. मध्ययुगकाळात भ्रमण करवून आणणाऱ्या ऐतिहासिक वास्तूंच्या पार्श्वभूमीवरील बेटवेचं मनो-हारी रूप तासन् तास बघत बसावं असं आहे.

महान क्रांतिकारक चंद्रशेखर आझाद हे ब्रिटिशांचा ससेमिरा चुकविण्यासाठी १९२६–२७ मध्ये एका साधूच्या वेषात ओर्च्छाजवळ अज्ञातवासात राहिले होते. ओर्च्छा–झांशी मार्गावर त्यांचे वास्तव्य असलेल्या ठिकाणी मध्यप्रदेश सरकारने या थोर स्वातंत्र्यसैनिकाचे औचित्यपूर्ण स्मारक उभारले आहे. उद्यानातील चंद्रशेखरांचा पूर्णाकृति ब्राँझचा पुतळा, संग्रहालय, ग्रंथालय यांच्याद्वारे स्वातंत्र्यवीरांच्या गत-स्मृति जतन करण्यात आलेल्या आहेत.

● ● ●

## ८. अजरामर झांशी

'मेरी झांशी नही दूंगी 'चे अजरामर कणखर बोल कानात घुमत असताना झांशीच्या किल्ल्यात प्रवेश केला. या किल्ल्याच्या वरपर्यंत वाहने जातात.

ओर्च्छाचा राजा बीरसिंग देवने इ. स. १६१३ मध्ये झांशीचा किल्ला बांधला. राणी लक्ष्मीबाईचे आजोबा या राजाचे मित्र होते. म्हणून त्याने हा किल्ला राणीच्या लग्नात गंगाधररावांना आंदण म्हणून दिला. गाईडच्या मदतीनेच किल्ला पाहणे चांगले. छोटा असला तरी तास–दीड तास हवाच.

गणेश मंदिरातील गणरायाचे नमन करून किल्ले दर्शनाला सुरुवात केली. सप्तधातूंची कडकबिजली तोफ, अष्टधातूंची भवानीशंकर तोफ या दोन्ही तोफा मोतीलाल यांनी बनविल्या आणि त्या चालविणारी मुख्य महिला तोपची होती मोतीबाई. ही मोतीबाई, मुख्य तोपची गुलाम गौसखाँ आणि अश्वप्रमुख खुदाबख्श हे राणीचे सैन्याधिकारी ४ जून १८५८ रोजी मारले गेले. त्यांच्या समाध्या येथे पहायला मिळतात. किल्ल्याच्या मुख्य प्रवेशद्वारात सलामी द्यायची तोफ दिसते. मुख्य दरवाजावर घंटा असून तिच्या दोरीचे टोक किल्ल्याखाली होते. (कोणाला तक्रार करायची झाल्यास अगर सूचना द्यायची झाल्यास.)

किल्ल्याच्या मध्यवर्ती ठिकाणी राणीचा पाच मजली राजवाडा असून

त्याचे दोन मजले जमिनीवर आणि तीन जमिनीखाली आहेत. जमिनी-वरच्या मजल्यांचे रूप इंग्रजांनी पूर्णपणे पालटवून विद्रुप करून टाकले आहे. या राजवाड्यासमोर गंगाधरपंतांचा दरबार भरत असे. अल्पवयीन मुलाला पाठीशी बांधून ज्या तटावरून राणीने घोड्यावरून उडी घेतली त्याला वंदन करताना रोमांच उभे राहिले. धन्य ती शूर साध्वी. किल्ल्यामध्ये कैद्यांना ठेवायच्या अंधार कोठड्या, फाशी देण्याची जागा दिसते. राणी लक्ष्मीबाईच्या कारकीर्दीत एकालाही फाशी देण्यात आलं नाही. एक सुरेख शिवमंदिरही किल्ल्यात आहे.

राणीच्या वास्तव्याने पुनीत झालेल्या आणि तिच्या थोर कर्तृत्वाने उजळून निघालेल्या झांशीच्या किल्ल्याच्या दर्शनाने मोठे पुण्य मिळाल्या-सारखे वाटले. किल्ल्यात हिंडताना तहान-भूक हरपून गेली होती सध्या पुरातत्व संग्रहालय असलेला राणीचा गावातील महाल पाहिल्यावर पोटात कावळे कोकलत असल्याची जाणीव झाली. एव्हाना सगळीकडची जेवायची वेळ होऊन गेली असल्याने चना-भटुरावर क्षुधा शांती केली. रात्र झाली तरी सारखी नजरेसमोर येत होती ‘ मेरी झांशी नही दूँगी ’ म्हणत घोड्याला टांच मारणारी तेजस्वीनी राणी लक्ष्मीबाई.


• • •

## ९. जगभराचं कुतुहल–खजुराहो


मध्यप्रदेशामधील मखजुराहो म्हणजे देशोदेशीच्या पर्यटकांचं आकर्षण. झांशीहून खजुराहोला जाण्यासाठी (१७२ कि. मी.) अनेक बसेस् असल्या तरी सकाळी ६, ७ आणि ८ अशा तीन आराम गाड्या झांशी रेल्वे स्टेशनवरून सुटतात. सातची बस पकडायची म्हणून घाईघाईने गेलो, तो त्या बसने केव्हाच पलायन केले होते. आठची बस उभी होती. तीत स्थानापन्न होईपर्यंत ती साडेसातलाच निघाली आणि बसस्टँडवर जी जाऊन उभी राहिली ती साडेआठपर्यंत. पॅसेंजर येण्याची वाट पहात जरा निघाल्यासारखी वाटे की पुन्हा थांबे. स्पृहणीय ऐतिहासिक भूमीला अभिवादन करत पावणेनऊला एकदाची झांशी सोडली. वाटेत कुणीही हात केला की त्याला आत सामावले जाई. यामुळे थबकत, थांबत खजुराहोला पोचायला दुपारचा दीड वाजला.

आज चार–पाच हजार वस्तीचं छोटंसं गाव असलेलं खजुराहो एके काळी राजधानीचं वैभवसंपन्न ठिकाण होतं. चंदेला राजघराण्यातील राजांनी ९ ते १३ व्या शतकांत येथूनच मध्य भारतावर राज्य केलं. पूर्वी या परिसरात खजुराची मुबलक झाडे होती. तसेच या गावाच्या प्रवेशद्वारापाशी खजुराची दोन सुंदर झाडे होती म्हणून त्याचे खजुराहो नामकरण झाले असावे असे म्हटले जाते.


आजची खजुराहोची स्थानिक लोकवस्ती फक्त पर्यटकांना लागणाऱ्या



खजुराहो-पायातील काटा काढणारी सुंदरी



खजुराहो –भित्तीशिल्पाचे एक रूप



खजुराहो–कांदरिया महादेव मंदीर

सुविधांच्या अनुषंगाने आहेत. गावात रहाण्यासाठी कमीअधिक दराची हॉटेल्स आहेत आणि मुख्य म्हणजे त्यांची नावं बसस्टँडवरील एका फलकावर पर्यटकांच्या माहितीसाठी मुद्दाम लिहिलेली आहेत. शिवपुरीच्या टुरिस्ट व्हिलेजमधील एक व्यवस्थापक श्री. अन्सारीने आग्रहाने सांगितल्याप्रमाणे मध्यप्रदेशच्या टुरिस्ट बंगल्याच्या दिशेने सायकल-रिक्षाने निघालो. मध्यप्रदेश पर्यटन विभागाची पायल, राहील, टुरिस्ट बंगला आणि टुरिस्ट व्हिलेज अशी चार निवासस्थाने खजुराहोत आहेत.

रस्ता जगप्रसिद्ध मंदिरावरूनच जात होता. दगडी शिल्पाचे अवाक् करणारे अप्रतिम नमुने पाहाण्यासाठी जगाच्या कानाकोपऱ्यातून शेकडो पर्यटकांनी तेथे गर्दी केली होती. त्यांच्यातील आपण एक कधी होऊन जातोय असं झालं होतं. पण आधी बूड टेकायला जागा मिळणं महत्वाचं होतं.

खजुराहोची मंदीरं पूर्व, पश्चिम आणि दक्षिण अशा तीन समुहांत विभागलेली आहेत. सर्वात मोठ्या अशा पश्चिम समुहाजवळ मध्यप्रदेश पर्यटन महामंडळाचा आम्ही जात असलेला टुरिस्ट बंगला होता. अन्सारीच्या शब्दामुळे लगेच जागा मिळाली. मोकळा परिसर, स्वच्छ, सुंदर, प्रशस्त खोल्या. दरही किफायतशीर. डबल रूमला नाष्ट्यासह दर दिवशी १३० रुपये; तर चार बेडस्च्या रूमला नाष्टा सोडून फक्त ८० रुपये. जेवा–खायची चांगली सोय. तेथील व्यवस्थापक ठाकूरशीही लागलीच चांगली दोस्ती जमली. जेवण केल्यावर लगेच हाकेच्या अंतरावर असलेल्या मंदिरात जावं वाटत होतं. पण घाईगर्दीनं ही शिल्प पहाण्यात काहीच मजा नसल्याने दुसरे दिवशी निवांतपणाने जायचं ठरविले.

ग्वाल्हेरच्या अनुभवामुळे संध्याकाळी पाय मोकळे करायला बाहेर पडावं की नाही असा संभ्रम पडला होता. तसे ठाकूरला विचारता तो म्हणाला, " निर्धास्त जा. खजुराहो इतके दुसरे सुरक्षित स्थळ मध्यप्रदेशमध्ये नाही. विदेशी गोऱ्या मुलीसुद्धा रात्रीच्या इथे एकेकट्या भटकू शकतात. " आणि खरोखरच अनेक परदेशी सायकलवरून रात्री उशिरापर्यंत हिंडताना दिसले. जरा जरी असुरक्षितता जाणवली तरी हे परदेशी लोक अजिबात येणारच नाहीत. विलायती लोक खजुराहोच्या शिल्पाच्या ओढीने नुसते येतच नाहीत तर काही येथे स्थायिकही होतात.

पश्चिम समुहातील मंदिरासमोर राज कॅफे नावाचे इंडियन आणि चायनीज पदार्थ देणारे रेस्टॉरंट एक स्वीस बाई गेली पंधरा वर्षे चालवत आहे.

सूर्यास्तानंतर मंदिराच्या आवाराची दारं बंद झाली. अंधार होताच बरेचसे पर्यटक आपापल्या आश्रयस्थानी गेले. काळोख्या शांत सायंकाळी तेथील एका हॉटेलमध्ये आरामात कॉफीचे घुटके घेत बसलो असताना समोरच्या दिव्यांच्या प्रकाशात उजळून निघालेल्या शिल्पांचा उज्ज्वल पूर्वइतिहास आठवणींच्या रूपाने नजरेसमोर चमकू लागला.

धर्म, अर्थ, काम आणि मोक्ष या हिंदू समाजसंस्थेच्या चार मूलभूत तत्त्वांवर आधारित असलेल्या खजुराहोच्या सुंदर कलाकृतींची निर्मिती इ. स. ९५० ते १०५० च्या दरम्यान चंदेला राजकर्त्यांकडून केली गेली. त्यावेळच्या एकूण ८५ मंदिरांपैकी आज फक्त २२ शिल्लक आहेत. पन्ना खाणीतील दगडांपासून बांधण्यात आलेल्या या उंच कळसाच्या मंदिराच्या भितींवरील कोरीव मूर्तीसौंदर्य म्हणजे शिल्प आणि वास्तूकला शैलीचा एक लाजबाब आविष्कारच. स्त्री–पुरुषांच्या शिल्पांतून प्रकट होणारे उन्मादक काम-भावनाविष्कार हे यांचे खास वैशिष्टच.

देशोदेशीच्या लोकांना आकर्षित करणारी एवढी शृंगारिक चित्रे कशी काढली गेली असावीत याबद्दल अनेक मतप्रवाद आहेत.

स्त्री आणि पुरुष यांचे प्रणयी आलिंगन म्हणजे आत्मा आणि परमात्मा–ईश्वराचे अंतीम मीलनच. एका प्रवादानुसार ही शृंगारिक चित्रे मंदिरावर वीज पडू नये म्हणून काढण्यात आली असावीत. याचं कारण देताना असं सांगण्यात येतं की इंद्र हा पर्जन्यदेव स्वतः कामगुणांचा चाहता असल्याने तो कसल्याही प्रकारचे नुकसान करणार नाही. काहींच्या म्हणण्याप्रमाणे योग आणि भोग हे दोन वेगळे मार्ग मोक्ष या अंतिम ध्येयाकडे नेतात. 'संभोगातून समाधीकडे' वर श्रद्धा ठेवणारे हे लोक.

काही थोडच्यांचे मते या शृंगारिक प्रतिमा तांत्रिक धार्मिकविधीच्या संकेतदर्शक आहेत. तर आणखी काहींच्या मतानुसार उपासना करण्यासाठी येणाऱ्यांना आत्मशुद्धीसाठी त्यांचा उपयोग व्हावा. या लोकांच्या म्हणण्याप्रमाणे प्रणयी प्रतिमांमुळे आराधनेसाठी प्रत्यक्षात मंदिरात

जाण्या-पूर्वी उपासकाच्या मनोकामनांवरील ताब्याचीच परीक्षा घेतली जाते. देवाला प्राप्त करावयाचे असेल तर बाहेरचं हे इतर सर्व विसरून जायला हवं. जीवनातील उघडं सत्य म्हणूनही या प्रतिमांचा संबंध जोडला जातो. संपूर्ण जीवनदर्शनच खजुराहोच्या मंदिरांवरील प्रतिमांतून होत असल्याने गृहस्थाश्रमात प्रमुख महत्त्वाची भूमिका बजावणाऱ्या कामभावनेला वगळून कसं चालेल, म्हणूनही शृंगारिक शिल्पांची निर्मिती झाल्याचं म्हटलं जातं.

जाणकारांची अनेक मते असली तरी एक गोष्ट मात्र सत्य वाटते की, त्या काळी आजच्यासारखी कामाविषयी उघड बोलण्यावर काही बंधनं नसावीत. त्या काळच्या लोकांची जीवनाकडे बघण्याची वृत्ती जास्त निकोप असावी. त्यामुळेच त्यांनी कामभावनेला योग्य ते स्थान उघडपणे दिले.

प्रेमी युगुलांच्या मिथुनातील वेगवेगळ्या उत्कट प्रतिमांमुळे खजुराहोबद्दल सर्वसामान्य माणसाला औत्सुक्यपूर्ण कुतुहल असते. आम्हीही त्याला अपवाद नव्हतो; परंतु अर्धवट वयाच्या मुलांसमवेत ही शृंगारिक शिल्पे कशी पहावीत हा प्रश्न सारखा सतावत होता. काय करावं या विचारात अंथरुणावर पाठ टेकली.

आधी थोडं लांबचं पाहून घेऊ म्हणून मूळच्या खजुराहो खेड्याजवळ असलेल्या पूर्व गटातील मंदिरांपासून सुरुवात केली. यासाठी सायकलरिक्षा २५ रुपये घेतात, तर टॅक्सी ४ तासांना ६० रुपये घेते. गाईडचा दर वेगळा. साधारणतः १२–१५ रु. तास. मनोवस्था काहीशी दोलायमानच होती.

‘खजुराहोच्या मंदिरात सामान्यपणे अर्धमंडप, मंडप, महामंडप आणि गाभारा असे चार भाग आढळतात. ही मंदिरे चिरेबंदी चौथऱ्यांवर असून त्यांच्या भोवताली भित नाही. मंडपाची छोटेखानी छते उत्तरोत्तर उन्नत होत जाऊन गाभाऱ्याच्या उत्तुंग शिखरास मिळून एक भव्य शिखर बनवितात. अनेक छोटे मुगुट एकावर एक ठेवावेत असे हे शिखर मनोरम दिसते. मंदिराच्या बाह्यांगावर चारही बाजूस तसेच गाभाऱ्याबाहेरील भितींवर उत्कीर्ण मूर्ती कोरलेल्या असून, त्यात देवदेवतांखेरीज प्रामुख्याने अप्सरा, नर्तिका, रमणीय स्त्रिया, दांपत्य, मैथून,

नाग, शार्दुल इत्यादींचा समावेश होतो. दागदागिने ल्यालेल्या, विविध कामाविष्कारांचे उत्कटभाव प्रकट करणाऱ्या सर्वांगसुंदर स्त्रिया हे या देवळातील शिल्पकलेचे वैशिष्टय म्हणता येईल. चंदेला घराण्याचे सुरुवातीचे राजे विष्णुपूजक आणि नंतरचे शिवभक्त असले तरी ते सहिष्णूही असल्याचे तेथील जैन आणि बौद्ध मंदिरांवरून वाटते.' येथे घेतलेला गाईड सांगत होता.

मनात चाललेला विचार याने पटकन वाचला आणि अनुभवी वडिलकीच्या नात्याने आपणहून सल्ला दिला, की 'मैथुनावस्थेतील सर्वाधिक कामुक शिल्पे असलेल्या पश्चिम समुद्रातील मंदिरात तुम्ही गाईड न घेता हिंडा. मलाही मुलंबाळं आहेत. माझे केस पांढरे झालेत म्हणून मुद्दाम सांगतोय. आमचे लोक वयाचा, अल्पवयीन मुलांचा जराही विचार न करता मीठमसाला लावून शिल्पसौंदर्य उघडं करतात.'

पूर्वेकडील समूहात प्रामुख्याने जैन मंदिरे असल्याने की काय तेथे स्त्री-पुरुषांच्या मैथुनाच्या शृंगारिक प्रतिमा अगदी कमी आहेत. नाहीच म्हटल्या तरी चालेल. सर्व जैन मंदिरात पार्श्वनाथाचे मंदीर सर्वांत मोठे आणि कलात्मक असून गाभाऱ्यात पहिले जैन तीर्थंकार भ. आदिनाथ यांची मूर्ती आहे. पार्श्वनाथ, आदिनाथ या प्रमुख मंदिरांखेरीज बाकीची नंतर बांधली गेली असावीत. कारण तेथे सिमेंटने जोडकाम केलेले दिसते. मूळची मंदिरे इंटरलॉक पद्धतीने जोडलेली आहेत. या मंदिराच्या बाहेरील भिंतीवर दैनंदिन जीवनातील प्रसंग, नाजूक दागिन्यांनी अलंकृत अप्सरा, पत्र लिहिणारी प्रेमिका, पायातील काटा काढणारी नर्तिका, शृंगारप्रसाधनात रममाण झालेली कामिनी, मधाचे धनुष्य आणि फुलाचे बाण घेतलेले कामदेव-रती, इत्यादी प्रतिमा दिसतात. कामाचे प्रतिक शार्दूल जागोजाग कोरलेलं असून ते चंदेला राजांचे राजचिन्ह होते. या समुहात ब्रह्मा, वामन मंदिरे आणि खजुराहो गावाच्या दक्षिणपूर्वेकडे अवशेषरूपांनी शिल्लक असलेले घंटाई मंदीर यांचा समावेश होतो.

गावापासून सुमारे पाच कि. मी. वर असलेल्या मंदिरांच्या दक्षिणेकडील समूहात दोन मंदिरे आहेत. त्यापैकी दुल्हादेव हे शिवमंदिर असून त्याच्या भिंतींवर काही अतिशय सुंदर अलंकृत अप्सरा, वृक्षांभोवती कामक्रीडांत रममाण झालेल्या स्त्रिया, इत्यादींच्या प्रतिमा कोरलेल्या

आढळतात. या मंदिराजवळून वाहणाऱ्या नदीला एकदा पूर आल्याने एका वरातीला थांबावे लागले. त्यात वराचे निधन झाले. नंतर वऱ्हाडी मंडळींनी केलेल्या शंकराच्या प्रार्थनेमुळे वराला परत जीवदान मिळाले म्हणून या मंदिराचे नाव दुल्हादेव पडले अशी आख्यायिका आहे.

दुसरे चतुर्भुज मंदीर. येथे अतिनाजूक गुंतागुंतीचं कोरीव काम केलेली भगवान विष्णूची भव्य मूर्ती पहायला मिळते.

खजुराहोच्या मंदिरांचा पश्चिमेचा समूह हा सर्वांत महत्त्वाचा. येथील मंदिरात ३१ मीटर्स उंचीवरील (लांबी १०२ फू., रुंदी ६७ फू., उंची १०२ फू.) कंदारिया महादेवाचे मंदीर सर्वांत मोठे आणि सुन्दर असून त्याच्या आत शिवलिंग आहे. याच्या बाह्य भिंतीवरील कोरीव कामात जीवनातील विविध अंगाचे चित्रण आढळते. या मंदिराच्या प्रवेशद्वारात संपूर्ण कोरीव कारागिरीने भरलेले तोरण असून, त्यावर निरनिराळी वाद्ये वाजविणारे वादक, प्रेमी युगुले, देवदेवता आदींची चित्रे चितारलेली दिसतात. मुख्य मंडपाचे छत आणि खांब यावरील अत्युच्च दर्जाचे कोरीव नक्षीकाम कंदारिया महादेव मंदिराच्या सौंदर्यात भर घालते.

कंदारिया महादेव मंदिराच्या उत्तरेस देवी जगदंबी हे कालीमंदीर असून त्याच्या पूर्वेकडे तोंड करून चित्रगुप्त मंदीर आहे. या मंदिराच्या गाभाऱ्यात सूर्यदेवाची पाच फूट उंचीची सप्तअश्वाच्या रथात स्वार झालेली मूर्ती आहे. या मंदिराच्या बाहेरील भिंतीवर कोरलेल्या शाही मिरवणुका, युवतींची नृत्ये, शिकार, हत्तीयुद्ध यासारख्या देखाव्यांमधून चंदेला राजपरिवाराच्या श्रीमंत चैनीच्या राहणीमानाचे दर्शन घडते.

उत्तरेकडील टोकालाच एका समाईक चौथऱ्यावर विश्वनाथ आणि नंदी यांची एकमेकांसमोर असलेली मंदिरे आहेत. विश्वनाथ मंदिराचा आराखडा कंदारिया महादेवाच्या मंदिरासारखाच असून त्याच्या पायऱ्यांच्या दोन्ही बाजूंना हल्ला करण्याच्या पवित्र्यातील सिंह आणि हत्तींच्या जोड्या आहेत. समतोल मापांतील सुडौल, सौंदर्यशाली सूर–सुंदरी, अप्सरांच्या विविध कामासनांतील लावण्यमय कोरीव मूर्ती हे या मंदिराचे वैशिष्टच.

विश्वनाथ मंदिराच्या पश्चिमेस पार्वती मंदिर असून ते मूळचे विष्णू मंदीर असल्याचे मानण्यात येते. आता येथे मगरीवर उभी असलेली

गंगेची मूर्ती पहायला मिळते.

पार्वती मंदिराच्या दक्षिणेकडे पंचायतन शैलीचे ‘लक्ष्मण’ नावाचे भव्य विष्णू मंदीर आहे. कोरीव कारागिरीने सुशोभित अशा तोरणातून मुख्य मंदिरात गेल्यावर लक्ष्मीची सालंकृत मूर्ती दिसते. तिच्या डाव्या बाजूस ब्रह्मदेव आणि उजवीकडे शिवदेव असून वर नवग्रह आहेत. दरवाजावर देव–दानवांचे समुद्रमंथन, विष्णूचे दशावतार यासारखी दृश्ये कोरलेली असून गाभाऱ्यात त्रिमुखी विष्णुची चतुर्भुज मूर्ती आहे. या मूर्तीचे मधले मुख मानवाचे व इतर दोन नरसिंह आणि वराहाची आहेत. लक्ष्मण मंदिराची उभारणी राजा यशोवर्मनच्या काळात इ. स. ९३० ते ९५० च्या दरम्यान झाली. या मंदिराचा महामंडप आणि खांबाच्या वरच्या भागातील स्त्रियांच्या कोरीव मूर्ती म्हणजे शिल्पकलेचा एक अद्‌भुत नमुना मानला जातो. लक्ष्मण मंदिराच्या चौथऱ्याच्या बाहेरच्या बाजूस असलेल्या नक्षीकामाच्या पट्टयात घरेलू जीवनातील तसेच शृंगारिक प्रसंग चितारलेले आहेत. यातील काही शृंगारिक प्रणय-प्रसंगांची दृष्ये कुविख्यात असून आजच्या कामजीवनाविषयीच्या संकल्पना आणि मनावरील संस्कार यामुळे ती बीभत्स वाटतात; निदान मला तरी वाटली. विशेषकरून प्राण्यांसमवेतचा संभोग, एकावेळी अनेकांशी संभोग यासारखी प्रतिमा दृष्ये बघताना किळसवाणा संकोच वाटत होता.

लक्ष्मणमंदिरासमोर फक्त मंडप असलेल्या छोटयाशा वराह मंदिरात नऊ फूट उंचीचा वराहाचा दगडी पुतळा असून त्याच्या अंग-प्रत्यांगावर देव–देवतांच्या प्रतिमा कोरलेल्या आहेत. यांची संख्या ७६४ असल्याचे सांगितले जाते. वराहाच्या पायापाशीच्या चबुतऱ्यावर पृथ्वीदेवीची अर्धवट तुटलेल्या अवस्थेतील प्रतिमा आणि सर्पराजाचे भक्तिमुद्रेतील अवशेष दिसतात.

आजही पूजाअर्चा होत असलेले मातंगेश्वर शिव मंदीर लक्ष्मण मंदिराला लागून परंतु पश्चिम समूहातील मंदिरांच्या आवाराबाहेर असून त्यातील गुळगुळीत शिवलिंग आठ फूट उंचीचे आणि सुमारे साडे-तीन फूट व्यासाचे आहे. खजुराहोतील सर्वात साध्या अशा या मंदिराचे बांधकाम चंदेला राजा हर्षदेवने केले.

पांढऱ्या-पिवळसर सँडस्टोनवर कोरलेली, पावसामुळे शेवाळं साठून

अनेक ठिकाणी काळवंडलेली खजुराहोची मंदिरे सूर्योदय ते सूर्यास्त उघडी असतात आणि साधारणतः अर्ध्या दिवसात आरामात बघून होतात. पश्चिम समुहातील मंदिरासमोर अगदी छोटे पुरातत्त्व संग्रहालय आहे. यातील एका बाजूने हसताना व दुसऱ्या बाजूने रडताना दिसणारी अप्सरा, सिंहाचा हल्ला परतविताना भरत, नृत्याच्या आविर्भावातील गणेशाची उभी मूर्ती, शिकारीचा प्रसंग, दगड वाहून आणतानाचे दृष्य, इत्यादी खोदकामाचे नमुने लक्षात राहतात. पश्चिम समुहातील मंदिराच्या प्रवेश तिकिटावर हे संग्रहालय शुक्रवारखेरीज १० ते ५ पर्यंत पहाता येते. या पुरातत्त्व संग्रहालयातर्फे शुक्रवार आणि इतर सार्वजनिक सुट्ट्या सोडून रोज दोन वेळा ( सकाळी ९ आणि दुपारी ४.३० ). पश्चिम समुहातील मंदिरांची मार्गदर्शकासह व्याख्यान सहल आयोजित करण्यात येत असल्याचे वाचले होते. चौकशी करता त्यांच्याकडे सध्या कोणी व्याख्याता नसल्याने ती बंद असल्याचे सांगण्यात आले. पश्चिम समुहातील मंदिरासाठीचा प्रशिक्षित गाईडस्‌चा अधिकृत दर आहे चार तासांना ४८ रुपये.

खजुराहोच्या विख्यात मंदिरांच्या दर्शनाने तृप्त होऊन पोटाला शांत केले. थोडचा विश्रांतीनंतर पश्चिम समुहातील काही निवडक मंदिरे परत एकदा सावकाशीने पाहिली आणि याच्या आवारातील विस्तीर्ण मखमली हिरवळीवर मनसोक्त बसून त्यांचे शिल्पसौंदर्य पुनः पुन्हा लुटले.

दरवर्षी मार्च महिन्याच्या दुसऱ्या सप्ताहात खजुराहोला ‘ लोकरंजन खजुराहो ’ हा पारंपारिक लोककलांचा नृत्य महोत्सव होतो. मंदिरातील शिल्पे आपल्या नृत्याद्वारे जिवंत करणाऱ्या कलाकारांची नृत्ये पहाण्यासाठी देशोदेशीचे रसिक त्यावेळी येथे आवर्जून जमतात. कधी कधी गर्दी इतकी वाढते की रहायला जागा न मिळाल्याने अनेकांना झाडाखाली मुक्काम टाकायची वेळ येते.

• • •

## १०. मौल्यवान ‘ पन्ना ’

हिऱ्या–मोत्याचं आकर्षण नाही असे लोक विरळाच. भारतातील हिऱ्याची एकमेव खाण खजुराहोपासून फक्त ४५ कि. मी. वर पन्ना येथे आहे. सर्व नैसर्गिक खडचांत मौल्यवान अशा हिऱ्यांचं उत्पादन कसं होत असेल याचे औत्सुक्य असल्याने दुसरे दिवशी सकाळी टॅक्सी करून पन्नाला निघालो.

पन्नाला जाणारा रस्ता मोठा निसर्गरम्य आहे. हिरव्या जंगलातून – विशेष करून सागाच्या – जाणारी ती रमणीय वाट कधी संपूच नये असं वाटत होतं. खजुराहोपासून ३२ कि. मी.वर केन नदीकाठी १९८१ साली पन्ना अभयारण्याची निर्मिती करण्यात आली. हे जंगल म्हणजे एकेकाळी पन्ना, छत्रपूर आणि बिजावर संस्थानांच्या राजे लोकांचे शिकारीसाठीचे आवडते स्थान होते. ५४३ चौ. कि. मी. मध्ये पसरलेल्या पन्ना अभयारण्यात हरिणे, काळवीटे, चितळ, जंगली म्हशी, अस्वले यांसारखे अनेक लहान-मोठे प्राणी, विविध जातींचे पक्षी असून १९८३ च्या शिरगणतीनुसार तेथे २१ वाघ होते. मध्य प्रदेशमधील सर्वांत मोठ्या कान्हा अभयारण्यात या ट्रीपमध्ये नंतर जायचे असल्याने या अभयारण्याच्या बाहेरून पन्नाच्या दिशेने पुढे निघालो. अभयारण्यात वाघासारखे मोठे प्राणी दिसतीलच याची कधीच खात्री नसल्याने नुसतं डोकावण्यात काहीच अर्थ नसतो. पन्ना अभयारण्याची सफर करू इच्छि-

णाऱ्यांनी रिजनल मॅनेजर, म. प्रदेश स्टेट टुरिझम डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन (टेलि. ५१) यांच्याशी किंवा आपापल्या हॉटेल व्यवस्थापकांशी संपर्क साधावा.

नॅशनल मिनरल डेव्हलपमेंट कॉर्पोरेशनच्या (एन्. एम्. डी. सी.) ताब्यात असलेली पन्नाची हिऱ्याची खाण कोणालाही रोज सकाळी ९ ते ११ या वेळात पाहता येते. पन्ना गावापासून प्रत्यक्ष खाण १८ कि. मी. दूर आहे. आम्ही टॅक्सीने गेलो असल्याने प्रश्न नव्हता. पण स्वत:चे वाहन नसणाऱ्यांनीही तसं काळजी करायचं काही कारण नाही. दर तासा दोन तासांनी असलेल्या एन्. एम्. डी. सी.च्या बसेस तुम्हाला पन्ना बसस्टँडवरून खाणीपर्यंत फुकटात घेऊन जातात.

खाण पहाण्यासाठीच्या प्रवेशाचे काही किरकोळ सोपस्कार पार पडल्यावर जवळील कॅमेरा सुरक्षा कर्मचाऱ्यांकडे सोपवून आत गेलो. बरोबर कोणीही मार्गदर्शक मिळत नाही. आमच्या सुदैवाने आमच्या टॅक्सी ड्रायव्हरचे सासरे या खाणीत काम करत असल्याने त्याने आपल्या मेव्हण्याला गाईड म्हणून बरोबर घेतले होते.

हिरे असण्याची शक्यता असलेल्या मोठमोठ्या दगडांचे सर्वत्र ढिगारे लागलेले दिसले. जमिनीतील खडक फोडून हे दगड बाहेर काढण्यात येत असल्याने तेथे मोठा खड्डा पडला आहे. पावसाळ्यात हा खड्डा पाण्याने भरत असल्यामुळे खडक फोडून वर आणणं अशक्य होतं. हिऱ्यांचे उत्पादन पावसाळ्यात थांबू नये म्हणून इतर वेळी जास्त खडक फोडून असा साठवला जातो.

या दगडात एखादा छोटासा हिऱ्याचा तुकडा गवसेल का ते मोठ्या आशाळभूतपणे पहात होतो; पण ते करडे-काळपट पथ्थर थोडे चमकून हसायलाही तयार नव्हते.

हिरे काढण्याची प्रक्रिया तशी अगदी साधीच आहे. मोठे दगड यंत्राच्या साहाय्याने फोडून त्यातून हिरे असण्याची शक्यता असलेली जाड वाळू यंत्रांकरवी अलग केली जाते. बारीक रेती पाण्याबरोबर वाहून जाते. नंतर ही जाड वाळू बायकांकरवी बादल्यांत भरून निवडण्याच्या जागी आणली जाते. येथे ही वाळू चक्क फरशीवर पसरून

आपण गहू–तांदूळातून खडे काढतो तसे हिऱ्यांचे खडे बाजूला काढले जातात. हे निवडण्याचं कामंही बायकाच करतात. दहा निघाले की निवडणं थांबवून सापडलेल्या हिऱ्यांचं वजन, दर्जा इत्यादींची नोंद करण्यात येते आणि परत पुढच्या आणखी दहा हिऱ्यांसाठी वाळू निवडणं सुरू होतं. दिवसात सर्वसाधारणपणे शंभर हिरे मिळतात. पसाभर हिरे एकदम काढले तर त्यापैकी एखादा खिशात टाकण्याचा मोह कोणाला होऊ नये म्हणून ही टप्प्याटप्प्याची पद्धत अवलंबण्यात येत असावी. पांढरे पिवळसर आणि कमी प्रतीचे औद्योगिक कामात उपयोगी पडणारे काळे, तपकीरी असे तीन प्रकारचे हिरे येथे मिळतात. उंच जाळी लावलेल्या जागी हे काम चालते. जाळीबाहेरून हिऱ्यांचं निवडणं मोठ्या कुतुहलाने पहाणाऱ्या पाहुण्यांना ते मुद्दाम जवळ आणून दाखविले जातात.

पांढऱ्या हिऱ्यांना पैलू नसूनही चमक असते. पैलू पाडण्यासाठी ते मुंबईला पाठविले जातात. त्यासाठी कोटयावधी रुपयांचा विमा उतरविण्यात येतो. १५ ऑगस्टसारख्या राष्ट्रीय सणांच्या दिवशी सर्वात मोठा हिरा सापडविणाऱ्या कामगारास खास पारितोषिक देण्यात येते.

पन्नाच्या खाणीत १९६० पासून हिऱ्यांचे उत्पादन सुरू झाले. आज तेथे सुमारे ७५० लोक काम करतात. कर्मचाऱ्यांसाठी सर्व सुखसोयी, सुविधा असूनही बहुसंख्य सरकारी उद्योगांप्रमाणे हा उद्योगही इतके दिवस तोटयातच होता. मात्र १९८६–८७ चे उत्पादनाचे उद्दिष्ट वेळेआधी पूर्ण केले गेल्याबद्दल व्यवस्थापनातर्फे सर्व कर्मचाऱ्यांना व्ही. आय्. पी.च्या सूटकेसेस बक्षीस देण्यात आल्याचे समजले.

पन्नाला पूर्वी खाजगी मालकीच्या हिऱ्यांच्या खाणी होत्या. असं म्हणतात की येथे कुलकर्णी नावाच्या इसमाची हिरे सापडू शकतील अशी जमीन आहे. त्यातील काही जमीन विकत घेऊन त्यात खोदाई करून तुम्ही आपलं नशीब अजमावू शकता.

खाणीला लागणाऱ्या प्रचंड पाण्यासाठी एन्. एम्. डी. सी.ने स्वत: बंधारा घातलेला, हिरव्या झाडींनी लपेटलेला रमणीय तलाव आहे. या बंधाऱ्यावरून वाहणाऱ्या पाण्यात उत्पादन प्रक्रियेनंतर वाया गेलेले मातीमिश्रित पाणी मिसळून ते जवळील एका कडयावरून जवळजवळ

एक हजार फूट खाली कोसळते. पाण्यातील पांढरट मातीमुळे सिमेंटचाच धबधबा पडत असल्यासारखे वाटते. उत्पादन प्रक्रियेनंतर गाळासारख्या राहिलेल्या मातीचा एक प्रचंड डोंगर खाणीजवळ साठलेला आढळला. या मातीत हिऱ्यांचे कण असण्याची शक्यता असल्याने त्या मातीला मागणी असूनही तिची विक्री करण्यात येत नसल्याचे समजले.

एन्. एम्. डी. सी.च्या कँटीनमध्ये अतिशय स्वस्त खाद्यपदार्थ मिळतात. तास-दीड तासाच्या खाणीतील फेरफटक्यानंतर कँटीनमधील इडली सांबारवर ताव मारून पन्ना गावात गेलो. तेथील जैनमंदिर विशेषकरून पाहण्याजोगे (दु. १२ ते ६ बंद). पन्ना गावात म. प्रदेशचा पर्यटक निवासही आहे.

टॅक्सीने गेलो असल्यामुळे खजुराहो–पन्ना रस्त्यावरील अनेक प्रेक्षणीय स्थळे पाहता आली. यापैकी आवर्जून बघावेच असा आहे पांडव फॉल्स. विविधरंगी नैसर्गिक खडकांतून बाहेर पडणाऱ्या पाण्याचा हा मनोहारी धबधबा म्हणजे वनविहारासाठीची एक अत्यंत रम्य अशी जागा. बऱ्याच पायऱ्या उतरून खालती गेल्यावर रंगीत दगडगोटयातून वाहणाऱ्या पाण्याकाठी मजेत हुंदडावे असे हे स्थळ. धबधब्याकाठच्या खडकात असलेल्या गुहेत पांडवांचे वास्तव्य असल्याचे म्हटले जाते. आज तेथे एक म्हातारा साधू एकटाच राहतो. धबधब्याच्या पायथ्याशी एका इंग्लिश सिनेमाच्या शूटिंगसाठी सेटस्‌ची उभारणी चालू होती.

खजुराहोच्या वाटेवरील छत्रसाल महाराजांचा राजवाडा पहाण्यासाठी थोडं आत वळून जावं लागतं. येथेही त्याच इंग्रजी सिनेमाच्या शुटिंगची जोरदार तयारी चालू होती. मेणे, डोल्या, पंखे इत्यादी. पूर्वीचा काळ उभा करायचा असावा. टेकडीवजा उंचवटयावर असलेला छत्रसाल महाराजांचा हा भव्य वैभवशाली राजवाडा अतिशय प्रेक्षणीय आहे. बाजीरावची मस्तानी याच छत्रसाल महाराजांच्या दरबारात होती. स्नानगृहे बऱ्याच ठिकाणी दाखवली जातात. येथे मात्र राजा, राणी, पाहुण्यांसाठीचे पायखाने मुद्दाम दाखविले गेले.

केन नदीकिनारीच्या जंगलमय भागात पन्नाच्या महाराजांचे एका पिंपळाच्या झाडावर बांधलेले तीन मजली ' ट्री हाऊस ' बघायला मिळाले. बांबू आणि सागाच्या लाकडाच्या सहाय्याने बांधण्यात आलेल्या या

अद्वितीय घरात पन्नाच्या महाराजांची आगाऊ परवानगी काढली असता रहाता येते आणि अंधार पडल्यावर नदीवर पाणी पिण्यासाठी येणाऱ्या जंगली श्वापदांचे जवळून दर्शन घडू शकते. झाड हलेल तसं हालणाऱ्या या घराच्या तिसऱ्या मजल्यावर जाणे हाही एक चित्तथरारक अनुभवच होता. वरून आसमंताचे अति विलोभनीय दृश्य दिसते. आधी माहीत असते तर या अभिनव घरात एखादी रात्र तरी राहण्याचा रोमांचकारी अनुभव घेता आला असता. खजुराहोतील राज कॅफे चालविणाऱ्या स्वीस बाईच्या यजमानांनीही असेच एक शेतावरील ट्री हाऊस बांधले आहे. या स्वीस माणसाने पन्ना रस्त्यावरील मांडला गावी शेती विकत घेतली आहे.

खजुराहोला परतल्यावर परत एकदा पश्चिम समुहातील मंदिरात चक्कर टाकली. येथे प्लॅस्टर ऑफ पॅरिसच्या सुरेख मूर्ती अतिशय स्वस्त मिळतात; फक्त नीट पॅकींग करून घ्यायला हव्यात.

खजुराहोच्या परिसरातील ७ कि. मी. वरील वेणीसागर डॅम, २० कि. मी. वरील राने फॉल्स, ६४ कि. मी. वरील छत्रसाल राजांच्या मध्ययुगकालिन किल्ल्यातील धुबेला संग्रहालय इत्यादी ठिकाणेही वेळ आणि आवडीनुसार भेट देण्याजोगी आहेत.

मन तृप्त होईपर्यंत हिंडूनही गाव सोडताना म्हणावंसं वाटलं की खजुराहो आणि पन्ना ही काही नुसती वर्णन करण्याची अगर कल्पनेने पाहण्याची ठिकाणे नव्हेतच. ज्याने त्याने स्वत: अनुभूती घेण्याच्या या जागा आहेत.

खजुराहोपासून १७५ कि. मी. वर असलेल्या चित्रकुटच्या पर्वतावर पुराणकाळात अनेक चमत्कार घडलेले आहेत. या चित्रकुटच्या पवित्र भूमीवर ब्रह्मा, विष्णू आणि महेश या त्रिमूर्तींनी अवतार घेतले. याच चित्रकुटच्या दाट अरण्यात रामाने आपल्या वनवासाची चौदापैकी अकरा वर्षे व्यतित केली. अत्रीऋषी आणि सती अनुसुया यांनी येथेच तपश्चर्या केली. कवी तुलसीदास अनेक शतकांनंतर येथे आत्मिक शांतीच्या शोधार्थ आले. निसर्गसौंदर्याने बहरलेले चित्रकुट आजही अनेक निसर्ग-प्रेमी आणि धार्मिक पर्यटकांना आकर्षित करते.

• • •

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ७१०

# ११. संगमरवरी चमत्कार–भेडा घाट

खजुराहोहून जबलपूरला जलद जायचं तर सटण्यापर्यंत रस्त्याने जाऊन तेथून रेल्वे पकडायची. पण मुलां–सामानासकट बदलाबदली घुसाघुसी नको म्हणून थेटपर्यंत बसनेच जायचं ठरविलं आणि सकाळी साडेआठला असणाऱ्या एकमेव थेट बसने जबलपुरकडे मार्गस्थ झालो. खजुराहो–जबलपूर हे अंतर सुमारे २७५ कि. मी. त्यामुळे आठ एक तासात ते सहज पार करता येत असेल असं वाटत असलं तरी वाटेत कुठे विशेष खोळंबा झाला नाही तरी या बस प्रवासाला प्रत्यक्षात लागतात मात्र १०–१२ तास. परत आदल्या दिवशी बस किती वाजता येईल त्यावर तिच्या दुसऱ्या दिवशीच्या प्रयाणाची वेळ अवलंबून असते.

आपल्याकडे विलंब टाळण्यासाठी माल वाहतुकीवरील जकात कर रद्द करावा म्हणून आंदोलनं चाललेली आहेत. आणि मध्य प्रदेशमध्ये प्रवासी गाड्यांनाही यातून सुटका नाही. वाटेत लागणाऱ्या गावातील नगरपालिकेचे कर्मचारी वेशीवर आडवा बांबू लावून बसलेलेच असत. प्रत्येक गाव सुरू होण्याआधी कर देण्यासाठी बस थांबे आणि गाव सोडतेवेळी कर भरल्याची पावती दाखविण्यासाठी. हे सगळं कंडक्टरच करत असला तरी वेळ मात्र जातो प्रवाशांचाच. जबलपूरपर्यंत ८–१० गावे लागली; दोनदा पुलाचा टोल देण्यासाठी बस थांबली; दोन वेळा रेल्वे फाटकांनी आडविले; एके ठिकाणी तर झाड पडून रस्ता बंद

झाला होता. सुदैवाने रस्त्याच्या बाजूने बस कशी तरी पुढे काढण्यात ड्रायव्हर यशस्वी झाला. नाहीतर मुक्काम करायचीच पाळी होती. या सगळ्यामुळे सकाळी ८॥ ला निघालेलो आम्ही, ड्रायव्हरने गाडी आपल्या परीने वेगाने हाकूनही जबलपूर गाठायला रात्रीचे ८ वाजले.

वाटेत महैर गावी दुपारच्या जेवणाचा स्टॉप होता. धाब्यावर गरम गरम जेवणही मिळाले. मध्य प्रदेशमधील बहुसंख्य बस स्टँड मात्र अतिशय गलीच्छ, घाणीच्या साम्राज्यानी वेढलेले. पुरुष लोक तर स्वच्छतागृहापर्यंत जाण्याचेही कष्ट घेत नसत. बायकांना नाक मुठीत धरून नैसर्गिक गरज कशी तरी भागवावी लागे. राज्यसरकारी आणि खासगी दोन्ही बसेस एकाच स्टँडवर थांबत असल्याने सटण्यासारख्या व्यापारी शहरात तर गर्दीचा महापूर उसळलेला दिसला. बसेसही खच्चून, ओसंडेपर्यंत भरलेल्या, ' नाही ' हा शब्दच त्यांच्याकडे नसावा. रस्त्यात कुठेही हात वर केला तरी बहुदा आत घेतलं जातच असे. क्वचितच बस न थांबता पुढे जाई.

वाटेत लागलेल्या कटणी गावातील भरवस्तीत असलेल्या छोटया सिमेंट कारखान्याच्या भट्टयांमुळे सबंध आकाश धुराने व्यापून गेलं होतं. सततच्या या प्रदुषणात तेथील लोक कसे रहात असावेत ?

कमालीच्या अस्वच्छतेमुळे, खाद्यपदार्थांवर घोंघावणाऱ्या माशांमुळे चहासुद्धा घ्यावासा न वाटणारा हा बसप्रवास कधी एकदा संपतोय असं झालं होतं.

जबलपूर म्हणजे मध्य प्रदेशमधील मोठं शहर. त्यामुळे आपण आता स्वच्छ जागी चाललो आहोत या सुखद समजुतीत असताना बस एका बोळकांडीतील अंधाऱ्या जागी थांबली. जबलपूर आलं म्हणून खाली उतरवलं गेलं मुख्य स्टँडपासून बरंच आडबाजूला. बस डेपोत निघून गेली. स्थानिक लोकंही पटापट पांगली. विजयला हॉटेलच्या शोधार्थ जावं लागलं. राहता राहिलो गटाराजवळील त्यातल्या त्यात स्वच्छ कोपऱ्यात सामानासह तात्कळत उभी असलेली मुलांसह मी आणि चांगलं गिऱ्हाईक मिळेल या आशेवर उभे असलेले दोन सायकल रिक्षावाले.

शेजारीच पानाचं दुकान होतं. त्यामुळे टवाळ माणसांची आवकजावक सतत चालू होती. काळोख, अपरिचित, उदास गाव, सारखी आम्हाला

ऱ्याहळणारी अनोळखी चेहऱ्याची संशयास्पद माणसं, विजयला परतायला होणारा विलंब, अजाण निरंजन आणि अर्धवट वयाची मनाली यामुळे त्या ठिकाणी उभं रहायची मनातून भीती वाटू लागली.

सूर्य, सत्कार सारखी जवळची बऱ्यापैकी हॉटेल्स भरलेली असल्याने आणि इतर आम्हाला पसंत पडण्यासारखी नसल्याने विजयला यायला उशीर लागला होता. रात्रीचं सायकल रिक्षाने उगाच कुठे जास्त शोधायचं म्हणून स्टँडजवळ असलेल्या हॉटेल अशोकमध्ये रहायचं ठरविलं. दर थोडा जास्त होता (डबल रूमला रोजी १५५ रु., मुलांसकट २०० रुपये) पण नवीन जागी रात्रीच्या अवेळी हॉटेल शोधत हिंडण्यात थोडा धोका वाटला.

दोन तारांकीत हॉटेल अशोक होतं. मात्र फार छान आणि मुख्य म्हणजे स्वच्छ. त्यांच्या प्रशस्त, नेटक्या डायनिंग हॉलमध्ये रात्री जेवल्यावर पोटं भरल्याचं समाधान मिळालं; आणि मग उद्योगधंद्यानी भरभराटीला आलेल्या या शहराबद्दल आठवू लागलं...

बाराव्या शतकात गोंड राजाच्या राजधानीचे ठिकाण असलेले जबलपूर नंतर कालचुरी राजघराण्याचे स्थान झाले. त्यानंतर १८१७ मध्ये ब्रिटिशांनी ताबा मिळवेपर्यंत ते मराठ्यांच्या अंमलाखाली होते. ब्रिटीश आमदानीतील खुणा वसाहती, बरॅक्स यांच्या रूपाने कॅन्टोन्मेंट भागात पहायला मिळतात. आजही जबलपूर बऱ्याच शासकीय कचेऱ्या असलेलं एक महत्त्वाचं शहर आहे.

जबलपूरसंबंधी कितीही वाचलं, ऐकलं तरी या शहराचं नाव काढताच प्रथम आठवतो तो संगमरवरी निसर्गाविष्काराचे नेत्रदीपक दर्शन घडविणारा नर्मदेवरील वैभवशाली भेडा घाट.

दुसरे दिवशी सकाळी उठल्या उठल्या भेडा घाट गाठला. शहरापासून भेडाघाटापर्यंत (२३ कि. मी.) माणसं कोंबत टेंपो सतत धावत असतात. (भाडे माणशी ४ रु.) बस स्टँडपासूनच टेंपो निघत असल्याने जागा मिळण्याचा प्रश्न नव्हता; फक्त टेंपो भरेपर्यंत थांबावं लागतं.

भेडा घाटच्या थोडं पुढे नर्मदा एका कड्यावरून खाली उडी घेताना एक अतिव सुंदर धबधबा–धुंवाधार–निर्माण करते. पांढऱ्याशुभ्र फेसाळत्या पाण्याचा धुंवाधार धबधबा उंचीने छोटा असला तरी अतिशय

अप्रतिम आहे. दगडगोटयांवरून कसरत करत, तुषारांचा पाऊस अंगावर घेत, जलबिंदूंच्या धुक्यात वेढलेला धुँवाधार जवळून पाहणे हा एक रोमांचकारी अनुभव, यासाठी नशिबाने मात्र थोडी साथ द्यायला हवी. याची उंची कमी असल्याने पावसाळ्यात किंवा इतर वेळी नदीचं पाणी वाढल्यास हा त्यात लुप्त होऊन जातो आणि मग उसळत्या धबधब्याच्या उसळत्या शोभेऐवजी पाण्याचा महासागर बघण्यावरच समाधान मानावे लागते. पंधरा दिवसापूर्वी नर्मदेला पाणी आलं असल्याने धुँवाधार त्यात लपून गेला होता. आज मात्र त्याचं विलोभनीय रूप पहायला मिळालं. पायऱ्या चढून गेल्यावर खाण्यापिण्याची, संगझिऱ्याच्या दगडाच्या वस्तूंची दुकानं लागली होती. इथे मात्र पाण्याचं दुर्भिक्ष. पिण्याचं पाणी खालून, दूरवरून आणावं लागत होतं.

धुँवाधारला मोठ्या आवेशाने गाजावाजा करत उडी मारणारी नर्मदा नंतर संगमरवरी डोंगरकडयांच्या बंधनात जखडल्यावर एकदम शांत होते. गगनाला गवसणी घालू पाहणारे नर्मदेच्या तटाचे हे संगमरवरी खडक शोभासौंदर्याच्या एका आश्चर्यचकित करविणाऱ्या अभूतपूर्व चमत्काराचे नयनरम्य दर्शन घडवितात. नर्मदेच्या संथ, नितळ पाण्यात या खडकांच्या पडलेल्या चित्रविचित्र पडछाया मनोहारी जलदृष्य चितारतात. दिवसा चकचकत्या सूर्यकिरणात हे दृश्य आणखीनच झळाळून उठते; तर चांदण्या रात्री या खडकांची शोभा काही औरच दिसते. संगमरवरी खडकांचे सौंदर्य जवळून पाहण्यासाठी नोव्हेंबर ते मे पर्यंत बोटींच्या सुविधा असून रात्रीच्या नौकाविहारासाठी प्रकाशझोताची सोय करण्यात आलेली आहे. पावसाळ्यात मात्र ही नैसर्गिक संगमरवरी शिल्पे पाण्याखाली जातात.

भेडा घाटचा तासाभराचा नौकाविहार (प्रत्येकी ३ रुपये) ही एक विलक्षण अनुभूती. पांढऱ्याशिवाय गुलाबी, निळसर रंगछटांनी नटलेला हा खडक काही ठिकाणी गडद रंगाच्या भेगा, भोकं यांनी उठावदार झाला आहे. खडकांचे दिसणारे वैविध्यपूर्ण आकार, सौन्दर्यविशेष याकडे पर्यटकांचे लक्ष वेधण्यासाठी गाईडचे धावते समालोचनही या जलविहाराच्या वेळी चालले होते. एके ठिकाणी खडकांची अशी काही भिंत समोर उभी ठाकली की अजिबात पत्ता लागेना की नदीचं पात्रं उजवी-

कडे वळतंय की डावीकडे. येथील खडकातून संगमरवरी दगडाचे उत्पादन करायला कायद्याने बंदी असल्याने निसर्गाचं हे नाविन्यपूर्ण अद्‌भूत रूप लोकांना नयनसुख देऊ शकतंय.

भेडा घाट काठच्या एका टेकाडाच्या पायऱ्या चढून गेल्यावर चौसष्ठ योगिनी मंदीर येते. संगमरवरी खडकातून शांतपणे वाहणाऱ्या नर्मदेच्या आणखी एका मनोरम रूपाचे येथून दर्शन होते. दहाव्या शतकातील दुर्गादेवीच्या या मंदिरात दगडावरील सुरेख कोरीव कारागिरीच्या देवतांच्या मूर्ती असून त्याचा मागोवा कालचुरी कालखंडापर्यंत जातो. गोंड आख्यायिकांनुसार हे प्राचीन मंदीर गोंड राणी दुर्गावतीच्या राजप्रासादाशी भुयारी मार्गाने जोडलेले होते.

नर्मदेतील अविस्मरणीय नौकाविहार आटपून काठावरील हॉटेलमध्ये चहा पिण्यासाठी बसलो असताना मालकाने ते हॉटेल पंधरा दिवसांपूर्वी पाण्याखाली होते असे सांगितले. किनाऱ्याकडून रस्त्यावर जाणाऱ्या पायऱ्यांच्या दुतर्फा संगमरवरी मूर्ती व इतर वस्तूंची दुकाने नुकतीच लागायला लागली होती. त्यांचा सिझन आता सुरू होणार होता. एक संगमरवरी गवळणीची मूर्ती स्मृति म्हणून विकत घेऊन रमणीय भेडा घाटचा निरोप घेतला. फ्लड लाईटस् बसविण्याचे काम चालू असल्याने रात्रीच्या नौकाविहाराची सुविधा सुरू झाली नव्हती.

भेडा घाटला विशाल रूप धारण करणाऱ्या नर्मदेचे उगमस्थान–अमरकंटक आहे. जबलपूरपासून रस्त्याने २४६ कि. मीटर्सवर हिंदूंचे एक पवित्र तीर्थक्षेत्र समजले गेलेले अमरकंटक विंध्य पर्वतात १०६५ मीटर्स उंचीवर वन्य गर्द छायेत असून जबलपूरहून तेथे बसने जाता येते.

• • •

# १२. चुकलेलं ‘ कान्हा ’

मध्य प्रदेशाचा १/३ भाग जंगलांनी व्यापलेला असल्याने तेथे अनेक लहान–मोठी अभयारण्ये पहायला मिळतात. त्यापैकी जबलपूरपासून अनुक्रमे १७३ आणि १९४ कि. मी. वर असलेली कान्हा आणि बांधोगड ही प्रमुख. ही अभयारण्ये जून ते ऑक्टोबर अखेरपर्यंत पावसाळ्यामुळे बंद असतात.

एके काळी भारताच्या व्हॉईसरॉयचे शिकारीसाठीचे जंगल म्हणून ख्यातनाम असलेलें आणि आता आशियातील सर्वात सुस्थितीतील जंगल म्हणून नावाजलेले कान्हा पहाण्याची जबरदस्त इच्छा होती. ९४० चौ. कि. मी. पेक्षा जास्त क्षेत्रफळात पसरलेल्या या अभयारण्यात १९७४ मध्ये व्याघ्र प्रकल्पाची निर्मिती करण्यात आली. कान्हात वाघ बहुधा हमखास बघायला मिळतोच असं म्हटलं जातं. अवाढव्य अरण्यातील वाघाचं स्थान कर्मचाऱ्यांकरवी निश्चित हेरून वॉकी-टॉकीद्वारे कळविलं जातं आणि मग त्या ठराविक जागी पर्यटकांना वाघाचे दर्शन घडविण्यासाठी मुद्दाम नेण्यात येतं. हरिणे, बारशिंगे तर सर्वत्र मुक्तपणे वावरत असतात. म. प्रदेश पर्यटन खात्याची उत्तम निवासे आणि त्यांच्याचतर्फे जीप अगर हत्तीवरून पार्कमध्ये हिंडण्याच्या सुविधा, यामुळे कान्हाला जायची फार उत्सुकता होती.

कान्हा उघडण्याच्या दिवशीच १ नोव्हेंबरला जायचे ठरवून त्यानुसार

प्रवासाचा आराखडा अगोदरच आखला होता. जबलपूर रेल्वे स्टेशनवरील राज्य पर्यटन ऑफिसमध्ये चौकशी करता त्यांच्या कान्हाच्या कंडक्टेड टूरस् अजून सुरू झाल्या नसल्याचं कळलं. त्यांचे तेथील पर्यटक निवास सुरू झालेत की नाही ते कळायला मार्ग नव्हता. तशी आम्हाला कान्हाला रहायची विशेष काळजी नव्हती. कारण खजुराहोच्या टुरिस्ट बंगल्यातील एक व्यवस्थापक श्री. ठाकूर दोनच दिवसांपूर्वी कान्हाला बदलून गेला होता आणि त्याने आमची कुठेच व्यवस्था होऊ शकली नाही तर स्वतःच्या खोलीवर करण्याचे आश्वासन दिले होते.

जबलपूरहून कान्हाला जाणारी राज्य परिवहन मंडळाची फक्त एक बस सकाळी ११ वाजता होती. ती पोचणार संध्याकाळी सहाला. पुढील प्रवासाची आरक्षणे आधीच केली असल्याने कान्हाला आम्ही फक्त एकच दिवस देऊ शकत होतो. त्यामुळे लगेच दुसऱ्या दिवशीच्या सकाळी अकराच्या बसने कान्हा सोडावेच लागणार होते. अकराची बस गाठायची म्हणजे पहाटे साडे पाचला निघणारी ५-५॥ तासांची कान्हा दर्शनाची ट्रिप घेणं शक्य नव्हतं. मग या अभयारण्यात हिंडणार कधी अन् कसं ?

टॅक्सीने गेलो तर लवकर पोहचू आणि कंडक्टेड टूरस् सुरू झाल्या नसल्या तरी पार्कमध्ये हिंडणंही शक्य होईल या हिशोबाने एका टॅक्सीवाल्याला सांगून ठेवलं. संपूर्ण दिवस कान्हाची माहिती मिळविण्यासाठी पिंजून काढला. डोक्यात फक्त होतं कान्हा आणि कान्हाच.

अनेकांना कान्हासंबंधी विचारलं. त्यावरून असं समजलं की कान्हा जरी औपचारिकरित्या १ नोव्हेंबरला उघडत असलं तरी पर्यटकांसाठीच्या सुविधा सुरु व्हायला दहा-बारा तारीख उजाडते. रस्ते नीट नसतात, पावसाळ्यात वाढलेलं गवत कापलेलं नसतं, त्यामुळे स्वतःच्या वाहनाने गेलं तरी गवतात लपलेले प्राणी दिसतीलच याची काहीच खात्री नसते. येवढे पैसे (टॅक्सी दर २ रु. प्रति कि. मी.) खर्च करून प्राणी न बघताच परत येणे म्हणजे भोज्याला शिवून येण्यासारखं होणार होतं. शिवाय पर्यटन खात्याच्या पॅम्फलेटमध्ये वाचलं तर कान्हा साठीचा सर्वोत्तम मोसम म्हणजे फेब्रुवारी ते जून महिने आणि चांगले प्राणी बघण्यासाठी कमीत कमी तीन दिवस मुक्काम करायला हवा.

सारासार विचार करून कान्हा डोक्यातून काढून टाकलं. कान्हाला

परत भेट म्हणून ठाकूरचा निरोप घेतला होता. आमच्यासाठी रूमचे रिझर्वेशनही करून ठेवायला सांगितलं होतं; आणि आता येऊ शकत नसल्याचे त्याला कळवायला काही मार्ग नव्हता.

सायंकाळी जबलपूरमधील चौराहा भागात पायी हिंडलो. येथे राहुल, शिवालय, सम्राट, अँबेसेडॉर यासारखी मध्यम प्रतीची अनेक चांगली, हॉटेल्स असल्याचे आढळले.

कधी कधी अगदी विचित्र लोकं प्रवासात भेटतात. हॉटेस अशोक-मधील आमच्या शेजारच्या खोलीतील एक सरदारजी ओणवा होऊन सारखा आमच्या खोलीत डोकावून पहात होता. त्याचा त्यात काही हेतू असेल, नसेल. पण व्यवस्थापकांकडे त्याच्या या वर्तणुकीविषयी सांगताच त्यांनी तातडीने त्याची खोली बदलली. त्यांच्या दृष्टीने हॉटेलचं नाव राखणं महत्त्वाचं होतं.

कान्हा रद्द केल्याने आरामात उठलो. हॉटेल अशोक समोर असलेल्या मोठ्या मैदानावर स्कुटर्स रेसेसची धामधूम चालली होती. सावकाशीनं आवरून गोंड राजा मदन शाह याने इ. स. ११**१६** मध्ये खडकाळ टेकडीवर बांधलेला मदन महाल पहाण्यासाठी खाली उतरलो.

'मदन महाल जाना है भाई, क्या लेंगे' एका सायकलरिक्षावाल्याला विचारताच त्याने चार रुपये सांगताच स्वस्ताईची कमाल वाटली. आस-पास एकही टेकडी दिसत नव्हती. 'कसं काय असं' म्हणत सायकल-रिक्षात चढलो. दहा मिनिटांत त्याने एका रेल्वे स्थानकापाशी आणून सोडलं आणि उतरा म्हणू लागला तेव्हा टयूब पेटली की ते होते मदन महाल नावाचे जबलपूरचे उपनगरी स्टेशन. थोडा वेळ बाचाबाची करून तेवढेच आणखी पैसे घेऊन त्याने कसंतरी मदन महाल किल्ल्याच्या पायथ्याशी नेऊन पोचवलं.

एका टेकडीवरील प्रचंड अवाढव्य वाटोळ्या दगडावर उंचावर बांधलेला मदन महाल बघण्यासाठी चांगली पायपीट करून, वाटेतील दगड–गोटे तुडवत जावं लागतं. वाटेत एक मोठा बॅलन्सिग रॉकही लागतो. मदन–महालच्या आतमध्ये तसं पहाण्यासारखं काही नाही. वरून शहराचं आणि आसमंताचं विहंगम दृश्य दिसतं. मात्र मदन–महालचा परिसर तसा एकाकी असल्याने एकट्या दुकट्याने जाण्यात

अर्थ नाही.

मदन–महाल खेरीज जबलपूरमध्ये भेट देण्यासारख्या इतर काही जागा म्हणजे गोंड राजा संग्राम शाहने १४८० ते १५४० च्या दरम्यान बांधलेल्या मध्ययुगकालीन वास्तू–संग्रामसागर आणि बाजनमठ, राणी दुर्गावती मेमोरियल व म्युझियम, म. गांधींची रक्षा नर्मदेत विसर्जित केलेला तिलवारा घाट, १२ व्या शतकातील मालादेवी मंदीर, पिसान हरि जैन मंदीर, रूपनाथ, इत्यादी.

नोव्हेंबर सुरू झाला तरी जबलपूरला चांगलंच गरम होत होतं. उन्हाळ्यात तर काय भट्टी होत असेल याची कल्पनाही करवली नाही.

• • •

## १३. अल्हाददायक निसर्गरूप–पचमढी

जबलपूरच्या रखरखीत उकाड्यातून अल्हाददायक थंड हवेच्या पचमढीच्या भेटीने मध्य प्रदेशच्या प्रवासाची सांगता होणार होती. मध्य प्रदेशमधील हे मनमोहक निसर्गरमणीयतेने बहरलेले थंड हवेचे ठिकाण. मुंबई–हावडा मार्गावरील पिपरिया स्टेशनपासून सुमारे ५० कि. मी. वर सातपुड्याच्या हिरव्यागार पर्वतराजीतील १०६७ मीटर्स उंचीच्या पठारावर पहुडलेलं आहे.

पिपरियाला जाण्यासाठी जागा मिळायला सोईस्कर पडते असे कळल्याने पहाटे ५ ची पॅसेंजर पकडायची होती. मध्यरात्री ३–३॥ ला टॅक्सी–रिक्षा वगैरे मिळाली नाही तर पंचाईत नको म्हणून रात्रीच रेल्वे स्टेशनवर मुक्कामाला जायचं ठरविलं.

सकाळ–दुपार जबलपूरमध्ये फिरून सायंकाळी रविवारचा दूरदर्शन वरील ‘ सनी ’ चित्रपट बघितला. खाऊन–पिऊन स्टेशनवर जायला निघालो तो हॉटेल अशोक समोरील रस्ता पोलिसांनी वाहतुकीसाठी रोखलेला. जबलपूरला अनेकदा काही ना काही कारणांनी दंग्यांचा उद्रेक होत असल्याचे ब-याच वेळा वर्तमानपत्रात वाचल्याने अशाच काही गडबडीमुळे शहरात कर्फ्यू असावा या स्वत: करून घेतलेल्या कल्पनेमुळे खोलीमधूनच फोनवरून टॅक्सी मागवली, मोठ्या रस्त्याला टॅक्सी लागल्यावर सर्वत्र अलबेल असल्याचे दिसले. नंतर असं कळलं की उषा

उत्थप आणि पार्टीचा कार्यक्रम असल्याने गर्दीमुळे तो रस्ता बंद करण्यात आला होता. सायकलरिक्षाने जेथे ५–१० रुपयांत स्टेशनवर गेलो असतो तेथे टॅक्सीसाठी ३५ रुपये मोजावे लागले; केवळ नीट चौकशी केली नाही म्हणून.

स्टेशनवरील सुंदर रिटायरिंगरूममध्ये आता पहाटेपर्यंत आरामात पसरायचे या खुषीत आत गेलो तो सर्व रूम्स भरलेल्या. काल याच वेळी पचमढीच्या गाड्यांची चौकशी करायला आलो होतो तेव्हा जवळ-जवळ सगळ्या खोल्या रिकाम्या होत्या. आणि आज यांना व्यापणारे लोक एकदम कुठून आले काही उमगेना. कॉमन हॉलमध्ये फक्त एक बेड खाली होता. निरंजनच्या रात्रीच्या झोपेसाठी काही तरी सोय करणं भाग होतं म्हणून तो बिछाना घेऊन निरंजन बाबासमवेत तेथे झोपला. मी आणि मनाली स्त्रियांच्या वेटिंगरूममध्ये होल्डॉलवर आडव्या झालो. पाठ टेकायला मिळाली तरी झोप मात्र दबकत दबकत थोडा वेळच लागली. रात्री बारानंतर पॅसेंजरची तिकिटे मिळणार असल्याने बेड मिळूनही विजयच्या झोपेचंही खोबरं झालं.

लोकांनी सांगितल्याप्रमाणे गाडीला गर्दी विशेष नसल्याने चांगली जागा मिळाली. वाटेत नाष्टा ताजी गरम भजी आणि जिलेबी (ही येथील खासियत असावी; द्रोणातून जिलब्या विकायला होत्या) यांच्या रुचीपालटाने झाला. मध्यप्रदेशमध्ये सर्वत्र तऱ्हेतऱ्हेची भजी मात्र फार छान मिळतात.

साडेनऊ वाजता पिपरियाला पोहचलो. पिपरिया स्टेशनच्या मुख्य दरवाजाच्या विरुद्ध दिशेने पचमढीला जाणाऱ्या बसेस सुटतात. पॅसेंजर भरले की चालली. अशी या बसेस्ची स्थिती. पचमढीला जाणारी एक बस उभीच होती. (दर प्र. ७.६० रु.) आणि एक जीपही (दर प्र. १० रु.). बसने वर जायला सुमारे दोन तास लागतात, तर जीप तासाभरात वर नेऊन सोडते.

लवकर पोहचू म्हणून जीपमध्ये बसलो. पुढच्या जागा स्थानिक लोकांनी अगोदरच पटकावल्या होत्या. 'थोडं अंतरच जायचंय' म्हणून प्रवासी कोंबले जात होते. पचमढी जवळ येऊ लागली तशी दोन्ही बाजूची झाडी वाढू लागली. वळणावळणांच्या रस्त्यावर ड्रायव्हर इतक्या जोराने

गाडी हाकत होता की निरंजनला उलटी झाली. वाटेत एक जीप उलटी होऊन पडलेली दिसली. आपलं असं काही होणार नाही ना या विवंचनेत पचमढी आलं. नेहमीच्या लोकांनी त्यांना त्यांच्या इच्छित स्थळी उतरावयास सांगितले; आणि जीपमधील लोकांच्या सांगण्यानुसार ड्रायव्हर आम्हाला न्यू हॉटेलवर घेऊन गेला. रंगरंगोटीसाठी ते हॉटेल बंद असल्याने आम्ही ड्रायव्हरला बस स्टँडवरील टुरिस्ट इन्फर्मेशन सेंटरवर सोड सांगितले.

खरं म्हणजे पचमढी गावात शिरतेवेळीच बस स्टँड लागतो; आणि सर्व प्रवाशांना तेथेच सोडले जाते; पण या जीपवाल्याने आम्हाला इतर प्रवाशांना सोडण्यासाठी म्हणून गावात घुमवून आता तो प्रत्येकी पंधरा रुपये मागू लागला. स्थानिक माहितगार लोकांनी तर दहा ऐवजी आठच रुपये दिलेले पाहिले होते. नवख्या माणसाला जास्तीत जास्त लुटण्याची ही प्रवृत्ती फार बोचते.

म. प्रदेश पर्यटनखात्याच्या बस स्टँडवरील त्या इन्फर्मेशन ऑफिसरने गेल्या गेल्या 'काय चहा घेणार का' विचारलं. सरकारी नोकर चहा देणार का ऐवजी चहा घेणार का विचारतोय हे ऐकूनच त्याच्यातील काहीतरी वेगळेपणा जाणवला. प्रदीप पराशर त्याचं नाव. थोडी वाढलेली दाढी, खांद्यावरून पट्टे असलेली फुल पँट, अमेरिकन वळणाचे उच्चार, सरकारी कर्मचाऱ्यांत अभावानेच दिसणारं अगत्य. पहिल्याच भेटीत पराशरचं कुठे तरी नातं जडून गेलं. पचमढीची माहिती देऊन त्याने आमची सोय ४० टुरिस्ट होममध्ये केली आणि त्यांच्याच बसने आम्हाला तिकडे रवानाही केले.

मध्यप्रदेश पर्यटन खात्याची बरीच निवासस्थाने पचमढीत असली तरी '४० आवास होम' ही सगळ्यात स्वस्त आणि मुख्य म्हणजे सोयीस्कर. बस स्टँडच्या अगदी जवळ. दोन कॉटस्‌सह एक खोली; छोटं स्वयंपाकघर; पाठीमागच्या आवारात संडास, बाथरूम; पुढे व्हरांडा यासहित या चाळवजा बैठ्या जागेचा दर होता दिवसाला फक्त २० रुपये. भरपूर मोकळी जागा, हिरवळ, प्रशस्त डायनिंग हॉल असलेली ही निवासस्थाने खरोखरच चांगली म्हणावीत अशी आहेत. तेथील व्यवस्थापक सुभाष अगरवाल हा मोठा बोलघेवडा माणूस. मग त्याच्याशी

मैत्री जमवण्यात कितीसा विलंब लागणार ?

स्नान, जेवण करून थोडी विश्रांती घेऊन सायंकाळी पाचची धुपगडची पर्यटन खात्याची ट्रीप त्यांच्या मिनी बसने घेतली. (प्रत्येकी १५ रु.)

धुपगड हे सातपुडा पर्वतातील १३५० मीटर्स उंचीचे सर्वोच्च शिखर. गावापासून ८ कि. मी.वर असलेल्या धुपगडला पूर्वी शेवटचे काही अंतर चालत जावे लागे. आता मात्र अतिशय अरुंद, वेडयावाकडया अवघड वळणाचा रस्ता वाहनाने वरपर्यंत घेऊन जातो. ही दूरदर्शनची कृपा दूरदर्शन मनोऱ्यामुळे भारतात अनेक ठिकाणी बऱ्याच उंचीपर्यंत रस्ते झालेले आहेत.

संध्याकाळच्या कलत्या उन्हात पचमढीचा परिसर तांबडया, जांभळया, पिवळया रंगछटांनी रंगू लागला होता या रंगांचे विविध आकारांचे सूर्यकिरणांत चकाकणारे सँडटोनचे डोंगरकडे, पाचूमय रंगाच्या झाडीतून जाणारे वाळूचा गालीचा पसरल्यासारखे वाटणारे निस्तब्ध रस्ते. पद-भ्रमंतीची आवड असणाऱ्यांना खुणावणाऱ्या दऱ्याखोरी, खाली उतरून चालतच रहावे असे वातावरण. पण धूपगडचा सूर्यास्त चुकवायचा नसल्याने बस सोडवली नाही.

रस्त्याला खडया चढणीची एवढी अवघड वळणे होती की क्षणोक्षणी बस खाली घरंगळते की काय याची भीती वाटावी. आम्ही जीव मुठीत घेऊन बसलो असताना ड्रायव्हरने मात्र मोठया कौशल्याने बस धुपगडच्या माथ्यावर आणून उभी केली. भारतीय सैन्यदलात नोकरी केलेला हा ड्रायव्हर होता. मोठा मिठ्ठास बोलणारा, पर्यटकांना आडवाटेने जाऊन मदत करणारा.

धुपगडवरून सुरेख सूर्यास्ताबरोबर सातपुडा पर्वतराजींचा आणि झाडांच्या हिरव्या लाटात दडलेल्या पचमढीचा अतिशय मनोहारी देखावा दिसतो.

पुराणातील आख्यायिकांनुसार पचमढी हे नाव तेथे असलेल्या पांडवांच्या पाच गुहांमुळे पडले असावे. वनवासाचा काही काळ पांडवांनी येथे व्यतीत केला असल्याचे म्हटले जाते. आजच्या पचमढीचा शोध कॅप्टन फॉरसिथ याने या भागात झालेला बंडखोरीचा उठाव दाबून

टाकण्यासाठी १८५७ मध्ये आला असताना लावला.

धुपगड माथ्यावर आसमंताचे विलोभनीय दर्शन घडविणारे पॉईंटस् असून, त्यात एक सूर्योदय पॉईंटही आहे. मात्र सूर्योदयाचे वेळी पर्यटन खात्याची ट्रीप नाही. थंडगार वारा सुटलेला असताना वर गरमागरम चहा मिळाल्याने मजा आली.

परत आलो तो ४० आवास होम 'बाबू मोशाय' लोकांनी गजबजून गेले होते. म. प्रदेश पर्यटन खात्याने त्यांच्याच बसने आयोजित केलेल्या मध्यप्रदेशच्या सहलीला हे बंगाली लोक आले होते. म. प्रदेश पर्यटन खात्यातर्फे अशा सहलींचे नेहमी आयोजन केले जाते आणि त्यात जास्तीत जास्त लोक कलकत्त्याचे असतात असं बोलताना समजलं.

पर्यटन खात्यातर्फे पचमढीच्या रोज तीन सहलींचे आयोजन केले जाते. धुपगडखेरीज सकाळी साडे सातची महादेव आणि दुपारी अकराची बी फॉलसची सहल. यासाठी कमीत कमी सहा प्रवासी लागतात. तरच ट्रीप निघते.

तिथल्या तिथे बस येत असल्याने तिथूनच जायचे ठरविले. ड्रायव्हरही मोठ्या आपुलकीने सर्व दाखवत असल्याने दुसरे दिवशी सकाळी महादेवकडे निघालो.

आपल्या पूर्वजांनी मोठ्या कल्पकतेने देवस्थानांची स्थापना अशा ठिकाणी केलेली आहे की देवदर्शनासाठी येणाऱ्याला त्या भूप्रदेशाचे अनायासे दर्शन घडावे. विशेषत: शंकराची स्थाने तर थोड्या आड-बाजूला, डोंगरमाथ्यावर जास्त करून असल्याने कष्टाचेही महत्त्व पटावे. पचमढीतील महादेवही असेच वैशिष्ट्यपूर्ण आहेत. यांपैकी सात-पुड्यातील दुसऱ्या क्रमांकाच्या उंचीचा (१३३६ मीटर्स) महादेवाचा डोंगर धार्मिक आणि राजनैतिक हालचालींचे महत्त्वाचे केंद्र होऊन राहिला आहे.

याबद्दल अशी आख्यायिका सांगितली जाते की एकदा भगवान शंकरांनी भस्मासूरावर प्रसन्न होऊन त्याला वर दिला की तो ज्याच्यावर हात ठेवील त्याचे भस्म होऊन जाईल. पार्वतीवर मोहित होऊन भस्मा-सूर भगवान शंकरानाच मारण्यासाठी त्यांच्या मागे लागला. त्याच्या भीतीने भगवान शंकर घाबरून पळाले आणि या भागातील छोटा

महादेव, जयशंकर, चौरागड, गुप्त महादेव इ. ठिकाणी छपत–छपत शेवटी महादेवाच्या गुंफेत लपले. तेव्हा भगवान विष्णूंनी मोहिनीचे रूप घेऊन भस्मासूराचे भस्म केले.

१८५८ च्या नोव्हेंबरमध्ये ह्याच चौरागड आणि महादेवच्या डोंगरांमध्ये सेनापती तात्या टोपेंनी सैन्य एकत्रित केले होते. जुलै १८५९ मध्ये ठाकूर भभूतसिंहने याच पर्वतश्रेणींमध्ये इंग्रजी हुकमतीविरुद्ध विद्रोह केला होता. म्हणूनच पचमढीचा महादेव म्हणजे नुसते धार्मिक पर्यटन स्थळ नाही तर शेकडो वर्षांपूर्वीपासूनचे पुण्यस्थळ आहे.

बडा महादेवपाशी पूजा साहित्याची दुकाने लागली होती. पायऱ्या चढून गेल्यावर उंच टेकाडावरील गुहेत जमा झालेल्या नैसर्गिक पाण्याकाठी या महादेवाची पिंड आहे. मोठी गुहा आणि उपलब्ध पाण्यामुळे बराच काळ आत दडून राहता येणे शक्य होत असावे. दर शिवरात्रीला येथे मोठी यात्रा भरते.

बडा महादेवपासून दहा-पंधरा मिनिटांचे चालत अंतरावर गुप्त महादेव आहे. या गुहेच्या बाहेरून एका वेळी फक्त एकच माणूस जाऊ शकेल इतकी अरुंद छोटी वाट दिसली. भिंतीचा आधार घेत भीतभीतच आत गेल्यावर एका छोट्या गुहेत नैसर्गिक शिवलिंग, एक माणूस बसू शकेल एवढी जागा आणि बाहेरील सर्व हालचाली अगदी स्पष्टपणे दिसत होत्या. गुप्त महादेवाची गुहा म्हणजे जणु दरवाजावरील ‘ पिप होलच ’ बाहेरून आतले काहीही दिसत नाही; पण आतून मात्र बाहेरील सर्व काही गुप्तपणे न्याहाळता येतं. पुजेअर्चेच्या कर्मकांडात अडकवून घेतल्यामुळे आमच्याबरोबरचे इतर सहप्रवासी निसर्गाचे हे रूप वेळेअभावी पाहूच शकले नाहीत. मूर्तरूप ईश्वराचे दर्शन घेण्यात वेळ घालविण्यापेक्षा निसर्गरूपाने दिसणाऱ्या परमेश्वराचे दर्शन निदान धावत्या भेटीत तरी घ्यावेच असं मला वाटतं.

महादेवाच्या डोंगरापासून चार किलोमीटर्सवर असलेला चौरागड (उंची १३०६ मीटर्स) हा काहीसा कठीण चढाचा; पदभ्रमणाची आवड असणाऱ्यांनी मात्र मुद्दाम जावं असा. याच्या मुख्य शिखराकडे नेणाऱ्या पायऱ्यांच्या वाटेवर अनेक शिवभक्तांनी शतकानुशतके उभारलेले त्रिशूळ दिसतात.

(महादेवच्या वाटेवर पचमढीच्या इतर अनेक पॉईंटस्‌चे दर्शनही या सहलीत घडविण्यात आले)

'हंडीखो' हा दाट हिरव्या झाडीने भरलेला पॉईंट. ३०० फूट खोलीचा, डोळे फिरविणारा. येथील दरीतून दूरवर कोठेतरी पाणी वहात असल्याची जाणीव लक्ष देऊन ऐकले असता होते. दरीची खोली एवढी आहे की, दगड फेकला असता सुमारे पाच सेकंदानी तो खाली पोचण्याचा आवाज येतो.

कॅप्टन फॉरसिथला जेथून प्रथम पचमढीच्या नयनरम्य पठाराचे दर्शन झाले तो प्रियदर्शनी पॉईंट आजही सर्वात सुंदर म्हणून गणला जातो. त्याच्या नावात मात्र बरेच बदल झाले. पहिल्यांदा फॉरसिथ, नंतर सुदर्शन आणि आता प्रियदर्शनी ही त्याची नावे.

पांडव राहिले होते असे मानण्यात येते, त्या पाच गुंफा गावातील एका टेकडीवर असून, वरून गावाचे छान दृष्य दिसते.

दुपारच्या वेळी पचमढीचा लाल सँडस्टोन रागाने जळून उठल्याचा भास होतो. त्याची दाहकता कमी होते ती डोंगरांना मिठ्या मारत खोलवर दऱ्यांत जाणाऱ्या हिरव्या झाडीमुळे. रंगीत सँडस्टोनमुळे पचमढीचे सौन्दर्य आणखीनच खुलते.

दुपारी बी फॉल्सच्या ट्रिपमध्ये पचमढीच्या निसर्गसौंदर्याचे अजून एक रूप पहायला मिळाले. या धबधब्याकडे जाणारा मधला काही रस्ता अतिशय खराब असल्याने आम्हाला मिनीबस सोडून शेवटचे काही अंतर चालत काटावं लागणार होतं. दोन्ही बाजूला रम्य झाडी असल्याने चालणंही सुखद वाटत होतं म्हणा. एवढ्यात एक जीप पाठीमागून आली आणि त्यातील माणसांनी आम्हाला लिफ्ट दिली. जीप्स शेवट-पर्यंत जाऊ शकत असल्याने भुर्रकन धबधब्याजवळ येऊन पोहचलो. दाट वनराजींनी वेढलेल्या या धबधब्याला येथे उंची विशेष नाही. मात्र याच्या पायथ्यापर्यंत उतरण्यासाठी घनदाट अरण्यातून पायऱ्यावजा वाट आहे. डबे घेऊन आल्यास दिवसभरच्या वनविहारासाठी अतिशय मनो-हारी अशी जागा. थोडं पदभ्रमण, थोडं निसर्गनिरीक्षण, थोडी मजा सर्वच एकत्र व्हावं असं ठिकाण. आखीव ट्रिपबरोबर आल्याने तळापर्यंत उतरून या धबधब्याच्या संपूर्ण प्रपाताचा, सौंदर्यास्वाद निवांतपणे घेणं

शक्य नव्हतं.

आम्हाला जीपमध्ये लिफ्ट दिलेले होते मुंबईचे कर्नाड कुटुंबीय. मिसेस कर्नाड या मुंबईमधील एका महाविद्यालयात समाजशास्त्राच्या व्याख्यात्या होत्या. आदिवासींमधे त्यांना विशेष रस. त्यांची मुलगीही त्याच विषयाची विद्यार्थिनी. त्यामुळे छान कंपनी मिळाली. सहसा आपण एखाद्या मोठ्या लोकप्रिय व्यक्तीच्या जवळचे आडनाव ऐकले की ते कोण तुमचे विचारतो. आम्ही मात्र नेहमी विचारला जाणारा हा प्रश्न मुद्दाम विचारला नाही आणि निरोप घेताना त्यांच्याकडून कळलं की श्री. वसंत कर्नाड हे चित्रपट क्षेत्रातील गिरीश कर्नाड यांचे सख्खे बंधू होते. तेही याच व्यवसायाशी संबंधित होते.

रजत प्रताप, डचेस् फॉल इ. पचमढीचे धबधबेही मनमोहक निसर्गरमणीयतेने वेढलेले आहेत. नानाविध वनस्पतींशी हितगुज करत कोणाच्या पायथ्यापर्यंत जाण्यात दमछाकीची आगळीच मजा. तर मोठमोठ्या दगडगोट्यांवरून कोणाच्या माथ्यापर्यंत पोचण्यात वेगळ्याच धाडसाचे समाधान. धबधब्यांमुळे निर्माण झालेल्या अप्सरा विहार, जमुना कुंड यासारख्या पाणवठ्याच्या रम्य जागा म्हणजे सहली, वनविहारासाठीची आदर्शवत ठिकाणेच.

पचमढी म्हणजे वनस्पती, प्राणी–पक्षी, भूगोल प्रेमिकांच्या दृष्टीने जणू स्वर्गच. जंगली आंबा, बाभूळ, इत्यादींच्या राया, महुआ, साल, इत्यादींची जंगले, शेवाळ (मॉस), नेचे (फर्न), दगडफुल (लिचेन) यांचे नानाविध प्रकार.

पचमढीचं भूस्तरशास्त्र तर फारच वैचित्र्यपूर्ण आहे. मोठमोठ्या बोल्डर्समधील सांधे–फटींतून पावसाचं पाणी खाली झिरपून डोंगर कपारींतून पाण्याची कुंडे तयार झालेली आहेत. अशाच एका कुंडापाशी जटाशंकर हे महादेवाचं आणखी एक स्थान आहे. जटाशंकरला कंडक्टेड टूर नव्हती; पण ते ४० आवास होमच्या तसं जवळ असल्याने सकाळी लवकर ते पाहून पचमढी सोडायची ठरविले.

बंगाली लोकांच्या सहलीचे निमित्ताने पर्यटन खात्यातील बरेच अधिकारी रात्रीचे जेवणाचे वेळी डायनिंग हॉलमध्ये जमले होते. त्यात पराशरही होता. गप्पा मारायला थोडा निवांतपणा मिळाला. बोलता

बोलता पराशरने आपली कर्मकहाणी ऐकवली. विश्वास ठेवायला अवघड जावं असा त्याचा विलक्षण जीवनप्रवास ऐकताना थरारून जायला झालं.

सनातनी ब्राह्मण एकत्र कुटुंबातील हा मुलगा. १६ वर्षाचं वय, शिक्षण विशेष नाही. घरातील कटकटी आणि आर्थिक चणचण याला कंटाळून जगात कुठेतरी नशीब काढण्यासाठी घराबाहेर पडला. खिशात होते फक्त काही सुट्टे रुपये. पण जिद्द मात्र महादांडगी. वेळ प्रसंगी झाडपाला खाऊन रहायचीही तयारी होती. हा जो चालत निघाला तो सहा महिन्यांनी प. जर्मनीत पोचला; आणि एका बेकरीत कामाला राहिला. कष्टाळू वृत्तीमुळे त्यात त्याने प्रावीण्य मिळविले आणि बेकरी मालकाचा लोभही. पण हा परदेशी दिलेल्या मुदतीपेक्षा आधिक काळ आपल्या देशात रहातोय हे तेथील सरकारच्या लक्षात येताच त्यांनी त्याला ताबडतोब देश सोडून जायचा हुकूम दिला. पराशरने नाईलाज़ाने जर्मनीच्या शेजारच्या देशाचा आश्रय घेतला खरा; पण महिनाभरातच साठवलेली पुंजी संपून गेली.

परत त्याने जर्मनीतील त्याच्या बेकरी मालकाला फोन करून काही-तरी मदत करण्याची विनंती केली. तो मालकही भला आणि पराशरवर प्रेम करणारा म्हणून त्याने परत स्वत:कडे ठेवून घेतले. त्याने अमेरिकेच्या तिकीटापुरते पैसे साठेपर्यंत नोकरी केली आणि अमेरिकन व्हिसासाठी अर्ज केला. त्याच्या सुदैवाने त्याला तो मिळालाही.

अमेरिकेत हा गेला तेव्हाही याच्या खिशात फक्त दहा एक डॉलर्स होते. शिकागोला एका मित्राकडे आठ दिवस निवारा मिळाला. पण कायमचा कोण देणार ? जर्मनीतील बेकरीमधील अनुभवावर अमेरिकन नोकरी मिळवायचा त्याने प्रयत्न केला पण या दोन्ही देशातील बेकरींच्या पद्धतीत जमीन–अस्मानाचा फरक असल्याने त्याला बेकरीत नोकरी मिळू शकली नाही.

शेवटी नाईलाजास्तव त्याने मोलमजुरीची कष्टकारक कामे करावयास सुरुवात केली. अमेरिकेत कष्टाला किंमत असल्याने पैसाही बऱ्यापैकी मिळायला लागला. पण परत आणखी एक प्रश्न उभा राहिला अमेरिकन व्हिसा कसा वाढवून मिळवायचा. ग्रीन कार्ड कसे मिळवायचे ? ते सुलभतेने मिळण्यासाठी लागणारे उच्च शिक्षण अथवा रक्ताचे नाते-

वाईक नाहीत. याला तर अमेरिका सोडायची नव्हती.

मग या पठ्ठ्यानं शिकागो युनिव्हर्सिटीत एक नोटीस लावली. तरुण मुलगी आवश्यक. फक्त दोन तासाच्या कामासाठी दोन हजार डॉलर्स मोबदला देण्यात येईल. इच्छुकांनी दिलेल्या टेलिफोनवर संपर्क साधावा. तीन—चार मुलींनी फोन केला. त्यातील एकीला निवडून तिच्याशी रजिस्टर्ड लग्न केले. काही दिवसांनी रीतसर घटस्फोट मिळेल या बोलीवर. बायकोच्या अमेरिकन राष्ट्रीयत्वामुळे नवऱ्यालाही ग्रीन कार्ड मिळते. त्यासाठी हा तथाकथित लग्नाचा उपद्व्याप. पण अमेरिकेतील कोर्ट नुसत्या रजिस्ट्रेशनवर विश्वास ठेवत नाही. फसवून बळजबरीने लग्न करायला लावलं नाही ना याची खात्री करून घेण्यासाठी असे लग्न रीतसर एकमेकांच्या इच्छेनुसार झालं आहे हे कोर्टात सिद्ध व्हावं लागतं.

पराशरला कोर्टाचं समन्स आलं. बायकोसकट कोर्टात हजर व्हा म्हणून. बायको तर पैसे घेऊन निघून गेली. आता कोणाला कोर्टापुढे हजर करायचे ? त्याची परत झोप उडाली. त्याने परत आणखी एक शक्कल लढविली. एकट्यानेच कोर्टात जाऊन सांगितले की आम्ही उच्च कुलीन सनातनी हिंदू ब्राह्मण. आमच्यात लग्न झालेल्या बाईला गोषा घुंगट असतो. लग्न झाल्यावर ती परपुरुषापुढे पडदा सोडून येत नाही. माझी बायको आता हिंदू झाल्याने तिला कोर्टासमोर येण्यापासून सूट देण्यात यावी. आपण या समर्थनावर कदाचित विश्वास ठेवणार नाही पण अमेरिकन कोर्टाने ठेवला आणि पराशरला अमेरिकेत रहायला परवानगी मिळाली.

बरेच दिवस कष्टकारक कामं केल्यावर पुढे त्याला अशी कामं करायचा कंटाळा आला. पैसाही बऱ्यापैकी साठला होता म्हणून त्याने एक ट्रॅव्हल एजन्सी सुरू केली. कमीत कमी कमिशनमधे ही सेवा सुरू केल्याने गिऱ्हाईकांचा ओघ वाढू लागला. डेन्व्हरसारख्या अमेरिकेतील अंतर्भागात त्याने या व्यवसायाच्या शाखा सुरू केल्या. तेथे अमेरिकन कंपन्या विशेष जात नसल्याने धंदा जोरात सुरू झाला. पैशाचा पाऊस पडू लागला.

पराशरच्या ट्रॅव्हल कंपनीचा आर्थिक उत्कर्ष इतरांच्या डोळ्यात सलण्याएवढा वाढला. एक परदेशी एवढे धो धो पैसे मिळवतोय हे तेथील

लोकांना सहन न होऊन त्यांनी त्याच्यावर अनैतिक मार्गाने पैसे मिळवत असल्याचे खोटे-नाटे आरोप करायला सुरुवात केली. तेथील कायदे-कानुही परदेशियांच्या बाजूने विशेष नसल्याने काही आरोप कोर्टात सिद्ध झाले असते तर त्याला तुरुंगातच जायची वेळ आली असती. म्हणून याने अमेरिकेतील गाशा गुंडाळून १०-१२ वर्षात जमा केलेली भरपूर माया कनवटीला बांधून भारतात प्रस्थान ठेवले.

मध्यंतरीच्या काळात त्याने दुसऱ्या एका अमेरिकन बाईशी खरेखुरे लग्न केले. दोन मुले झाली. तिच्याशी घटस्फोटही झाला. मुलं आईकडे असली तरी याच्याशी थोडाफार संबंध ठेवून आहेत म्हणे.

इकडे भारतात आल्यावर वडिलांपश्चातच्या घरातील बहिणींची लग्ने इ. प्रापंचिक जबाबदाऱ्या पार पाडल्यानंतर त्याने स्वतःही परत लग्न केले. इकडेही त्याला दोन छोटी मुलं आहेत.

पराशर भारतात परतला ती वेळ होती आशियाडची. आशियाई स्पर्धेसाठी अनेक परदेशी भारतात येण्यास उत्सुक असणार हे हेरून त्याने या प्रवाशांना सबंध विमान चार्टड् करून भारतात आणून स्वस्तात कसे हिंडवता येईल यासंबंधीची एक योजना त्यावेळच्या पंतप्रधान इंदिरा गांधींना सादर केली. ती त्यांना फार आवडली म्हणे. बाईंना आपली योजना पसंत पडली म्हणजे आता त्यासाठी परवानगी मिळणारच हे गृहीत धरून त्याने दिल्ली, श्रीनगर सारख्या मोठमोठ्या शहरात ऑफिसेस सुरू केली.

परदेशी प्रवाशांना चार्टड् विमानानी आणून भारतात भटकवायची पराशरची ही योजना इतकी स्वस्तात होती की ती अमलात आली तर आपल्या व्यवसायावर विपरीत परिणाम होईल अशी भीती इतर विमान कंपन्यांना वाटली आणि म्हणून त्यांनी मंत्रालयात, पैसे चारून याची फाईल दाबून टाकली. त्यामुळे पराशरचं लक्षावधी रुपयांचं नुकसान झालं. अमेरिकेतून आणलेला पैसा बुडीत खाती जमा झाला.

पराशर रस्त्यावर आला आणि आता म. प्रदेश पर्यटन खात्यात द्वितीय श्रेणीचा अधिकारी म्हणून काम करत आहे. या नोकरीत तसं स्थैर्य नाही. बदलीची सतत टांगती तलवार डोक्यावर असल्याने बायका-मुलांना घरी ठेवावं लागत आहे. अजूनही त्याच्या योजनेची फाईल

मंत्रालयात विचाराधीन धूळ खात पडून राहिली आहे म्हणे.

इतकं असूनही हा पठ्ठ्या मात्र आनंदी आहे. पराशरची ही अजब जीवन कहाणी ऐकताना जेवण थंड होऊन गेलं. वाटलं, याने सांगितलेलं सगळं खरं असलं तर याने हे सर्व सहन करण्याची चिवट ताकद कुठून मिळविली असावी ? केल्याने देशाटन ... म्हणतात ते हेच असावं का ?

सकाळी उठल्या उठल्या जटाशंकरची वाट धरली. दोन्ही बाजूला झाडी, निर्मनुष्य रस्ता. थोडं अवघडच वाटत होतं. पण चाल सोडली नाही. पायऱ्या उतरून गेल्यावर डोंगराच्या तळघरातील एका गुहेत नैसर्गिक शिवलिंग आहे. शेजारीच पाण्याचं मोठं कुंड आहे. पिंडीच्या वर डोंगरातून खाली लटकणारे छोटे लवणस्तंभ शंकराच्या जटेसारखे दिसत असल्याने याचं जटाशंकर नाव पडलं. येथील खडकांचं रूप रौद्र भीषण असं आहे. वर मोठमोठाले अजस्त्र दगड डोंगरापासून सुटल्यासारखे वाटत असल्याने ते आत्ताच पडून आपल्याला पाताळात ढकलतील की काय अशी भीती खाली जाताना वाटत असते.

पचमढीच्या रमणीय निसर्गाविष्कारांनी अनेकांना भुरळ पाडली आहे. कॅ. फॉरसिथचा पचमढीचा अहवाल सांगतो की, झाडांच्या समुहांचे सर्वत्र जणू मेळावेच भरले असावेत असे उद्यानांचे दृश्य नजर खेचून घेत होते. अरण्यातील उघड्या जागांवर पसरलेल्या हिरवळींवर जंगली फुलं बहरलेली होती. यामुळेच त्याकाळच्या होशांगबादचा चीफ कमिशनर सर रिचर्ड टेंपल यांनी या निसर्गरम्य पठाराचा सॅनेटोरिअम म्हणून उपयोग करून घेता येईल का ते पाहण्यासाठी कॅ. फॉरसिथला १८६२ मध्ये पुन्हा एकदा पचमढीला पाठविलं. त्यानंतर पचमढीच्या अनेक सौंदर्य स्थळांचा शोध घेण्यात येऊन त्याचा विकास करण्यात आला. परंतु ब्रिटिशांना हे स्थळ आमजनतेला खुले न करण्याएवढं मौल्यवान वाटलं.

आजही थोड्याफार फरकाने पचमढीची स्थिती तशीच आहे. पचमढीने अजूनही आपल्या मोह घालणाऱ्या सृष्टीसौंदर्याचं निसर्गदत्त रूप जोपासलं आहे. येथे खासगी हॉटेल्स काढायला परवानगी नाही. त्यामुळे गगनाला गवसणी घालणाऱ्या वैभवशाली इमारती, पर्यटकांचा गदारोळ, गल्लाभरू, उथळ उथळ मौजमजा नाहीच म्हटलं तरी चालेल.

सरकारी निवासस्थाने फारच स्वस्त आणि मस्त. म्हणूनच वाटतं, शहरी गजबजाटापासून दूर, निसर्गाच्या सान्निध्यात किफायतशीर दरात काही काळ व्यतित करण्यासाठी पचमढीसारखं थंड हवेचं ठिकाण भारतात इतरत्र नसावं.

● ● ●

# १४. सहलीचं पान मिटताना

पचमढी सोडताना पाऊल जड झालं होतं. भेटलेल्या नवीन मित्रांचा निरोप घेणं नको वाटत होतं. म. प्रदेश पर्यटन खात्याच्या निवासस्थानातील सर्वच तरुण व्यवस्थापक मदतीचा हात सतत पुढे करणारे. आताही सुभाष अगरवालने एस. टी.त जागा राखून ठेवण्यासाठी सांगून ठेवलं होतं. सांगितलं तर ४० आवास होमपाशीही बसेस थांबतात.

पचमढी–इटारसी थेट बस नसल्याने बदलाबदलीचा मार्ग होता. जागा नाही मिळणार म्हणून इटारसीला जाणारी दुपारी दोनची पॅसेंजर पकडण्यासाठी सकाळी दहाच्या बसने घाईघाईने पचमढी सोडली. इटारसीहून रात्री बाराला झेलम होती.

पिपारिया स्टेशनवर येऊन बघतो तो ती पॅसेंजर चार तास उशीरा येत असल्याचं समजलं. ती समजा आणखी उशीरा आली आणि नंतरच्या कलकत्ता–मुंबई जलद गाडीत जागा मिळाली नाही किंवा तीही उशिरा असली तर झेलम चुकायची. तो धोका पत्करायला नको म्हणून बसस्टॉपकडे मोर्चा वळवला.

पिपरियाहून इटारसीला जाणारी थेट बसही लगेच नव्हती म्हणून इटारसीच्या अलीकडे अर्ध्या तासाच्या अंतरावर असलेल्या होशांगबादपर्यंतची बस घेतली. बसचा गलिच्छ प्रवास नको म्हणता म्हणता परत तोच नशिबी आला. होशांगबादलाही झेलम पकडता आली असती; पण

आमचं रिझर्वेशन इटारसीपासून असल्याने इटारसीपर्यंत जाणं भाग होतं. नाहीतर तेवढ्या अंतरासाठी वेगळं तिकीट काढा, सामानासकट कसंतरी घुसा, इटारसीला रिझर्वेशनची बोगी शोधा इ. कटकटी कराव्या लागल्या असत्या; त्याही थोड्या वेळात.

होशांगबाद हे म. प्रदेशमधील एक मोठे औद्योगिक गाव. येथे परत टपावरून सामान उतरून इटारसीच्या बसवर चढवावं लागलं. तरी बरं, बसमध्ये जागा कशी तरी मिळतेच. शिवाय होशांगबाद–इटारसीच्या दरम्यान सतत बसेस आहेत.

इटारसीचा बस स्टँड रेल्वे स्टेशनपासून दूर. मग सायकल रिक्षा करणं आलंच. एका प्रवासात सामान चढविण्या-उतरविण्याचा खेळ किती वेळा करायला लागला. प्रत्येक वेळी हमाली वेगळी आहेच. इटारसी स्टेशनवर क्लोकरूममध्ये सामान टाकून जरा हू ऽ ऽ श केलं.

वाजले होते सायंकाळचे पाच. आता मध्यरात्रीपर्यंत निश्चिती होती. त्यात परत अनियमितपणाबद्दल नियमित असणारी झेलम आज कशी वागते यावर ताटकळण्याचा वेळ अवलंबून होता. मध्यप्रदेशमधील काही प्रमुख स्थळी हिंडताना तीन आठवडे कसे निघून गेले ते कळलंही नाही आणि आता शेवटचे हे काही तास महाकंटाळवाणे वाटू लागले.

स्टेशन बाहेर रुचकर पदार्थ देणारं स्वच्छ हॉटेल असल्याने थोडा वेळ तरी बरा गेला. त्या दिवशी नशीब मात्र फार चांगलं होतं. हमालालाही ते जाणवलं; कारण कधीही वेळेवर न येणारी झेलम चक्क ठरल्या वेळी अवतीर्ण झाली होती.

निसर्ग आणि मानवनिर्मित विविध आविष्कारांनी समृद्ध असलेल्या भारतातील या सर्वात मोठ्या राज्याच्या सहलीची इतिश्री करताना येथील अजूनही आपलं खूप बघायचं राहिलं आहे याची रुखरुख होती.

पुण्याकडे जाण्यासाठी झेलमने शिट्टी दिली तरी मन मात्र गुंतलं होतं, कान्हा, बस्तर, पंथ पिपलोदा यांच्या भेटीचा योग लवकरात लवकर कसा आणता येईल याच्या बेरीज–वजाबाकीची मांडामांड करण्यात.

•••

मराठी ग्रंथसंग्रहालय ठाणे
७४१०
क्र. २९४७०

REFBK-0025909

REFBK-0025909